रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ९६ ▌पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि.१२ सप्टेंबर २०२५
किंमत ४ ₹

## इको कारची संरक्षण भिंतीला धडक

**पोलादपूर :** तालुक्यातील भुयारी मार्गाकडे जाणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावरील मुंबई बाजूकडून गोवा दिशेने जाणाऱ्या इको कारने संरक्षक भिंतीला जोरदार धडक दिल्याने अपघातात झाला. यामध्ये कार कलंडून एक प्रवासी ठार तर अन्य पाच जण जखमी झाले. गुरूवारी पहाटे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. मृतासह अन्य पाच जखमी प्रवासी पुणे जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. मुंबई बाजूकडून गोवा दिशेने जात असताना इको कार चालक लिंगप्पा कटप्पा पातारे (वय २८, रा. निगडी,पुणे) हा त्याच्या ताब्यातील इको कार (एमएच१४ केएस ०२३१) घेऊन भोगाव हद्दीत भरधाव वेगाने जात असताना त्याचे पान २ वर








# शासनाच्या जीआरला केराची टोपली

**प्राथमिक शाळेच्या इमारतीबाहेर अंगणवाडी काढण्यासाठी लेखीपत्राने सूचना**

**पोलादपूरची प्राथमिक शाळा नगरपंचायतीकडे वर्ग करण्याची आवश्यकता**

। शैलेश पालकर ।
। पोलादपूर ।

पोलादपूर ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर होऊन दहा वर्षांचा कालावधी लोटला आहे. मात्र अद्यापही पोलादपूरमधील प्राथमिक शाळेचे नगरपंचायतीकडे हस्तांतरण झाले नाही. परिणामी, मुलांची प्राथमिक शाळा आणि कन्या शाळेच्या एकत्रित इमारतीमध्ये विद्यार्थी पटसंख्या घटून खासगी शाळांकडे पटसंख्या वाढविण्याचा कल दिसून येत आहे. अशातच, शाळेच्या इमारतीमध्ये असलेल्या अंगणवाडीला इमारतीबाहेर काढण्यासाठी मुख्याध्यापिकेने लेखीपत्राने सूचना बजावून शासनाच्या जीआरला शाळा व्यवस्थापन समितीच्या ठरावाने केराची टोपली दाखविल्याचे स्पष्ट केले आहे.



रायगड जिल्ह्यात ३१५१ अंगणवाडी केंद्र असून त्यापैकी २४५४ केंद्रांसाठी इमारत उपलब्ध आहे. ६९७ अंगावाडी केंद्रांना इमारतीअभावी भौतिक सोयी सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. या अंगणवाडी केंद्रातून ६ महिन्यांपासून ६ वर्षांपर्यंतच्या बालकांचे पोषण व आहार, आरोग्य तसेच पूर्व प्राथमिक शिक्षण यासारख्या सेवा पुरविल्या जातात. गर्भवती आणि स्तनदा मातांना पौष्टीक आहार आणि आरोग्य सल्ला, ग्रामीण महिलांना आरोग्य आणि आहाराबद्दल जागरूक करणे, गर्भनिरोधक सेवांबद्दल माहिती व सल्ला पुरविणे आदी कामे केली जातात. तालुक्यात ३ ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीमध्ये प्रवेश घेण्यास पात्र बालकांची संख्या ५६९ एवढी असून एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागात ११८ अंगणवाडी केंद्र आहेत. यापैकी स्वतःच्या इमारतीमध्ये ८८ अंगणवाडी केंद्र भरत असून प्राथमिक शाळेमध्ये १६, समाजमंदिरामध्ये ५ आणि खासगी इमारतीमध्ये ९ अंगणवाडी केंद्र आहेत म्हणजेच ३० अंगणवाडी केंद्रांना स्वतःच्या इमारती नाहीत.

शहराच्या ग्रामपंचायतीचे रूपांतर पान २ वर

## नवी मुंबई विमानतळाला मिळाला मुहूर्त
# ३० सप्टेंबरला होणार उद्घाटन?

**■ केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाची तयारी सुरू**

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

बहुप्रतीक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या ३० सप्टेंबरला उद्घाटन होणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. विमानतळ उद्घाटनाच्या अनुषंगाने केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडून सुमारे ४५० सुरक्षा रक्षक आणि कमांडंट तैनात करण्याच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या आदेशानंतर हालचालींना वेग आला आहे.

पनवेल तालुक्यातील उलवे येथे सुमारे १,१०० हेक्टरवर देशातील पहिले ग्रीन फिल्ड विमानतळ असलेल्या नवी मुंबई विमानतळाचे काम पूर्णत्वास येत आहे. जुलै महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमानतळाचा पाहणी दौरा केला होता. त्या वेळेस ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत काम पूर्ण करण्यासाठी अखेरची मुदत विमानतळाचे पान २ वर



## वे|ध|क

## अल्पवयीन मुलाने केला लैंगिक अत्याचार

**रसायनी :** उरणमध्ये राहणाऱ्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलाने इन्स्टाग्रामवरून ओळख झालेल्या रसायनी येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण करून तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिल्यानंतर अल्पवयीन मुलाने पीडित मुलीसोबत लग्न करण्यास नकार दिला. उरण पोलिसांनी या प्रकरणातील अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. तसेच त्याच्यावर पुढील कारवाई सुरू केली आहे. मुलगी रसायनी येथे राहण्यास असून तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा१६ वर्षीय अल्पवयीन मुलगा उरण मध्ये राहण्यास आहे. या दोघांनी आपले शिक्षण अर्धवट सोडले असून या दोघांची जानेवारी २०२४ मध्ये इंस्टाग्रामवर ओळख झाली होती. त्यानंतर त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले होते. पीडित मुलीच्या आई वडिलांना काही महिन्यापूर्वी याबाबतची पान २ वर

## गुजरातच्या हातात महाराष्ट्राचं राजभवन

**मुंबई :** भारताच्या उपराष्ट्रपतीपदी सीपी राधाकृष्णन यांची निवड झाली आहे. ते महाराष्ट्राचे राज्यपाल होते. महाराष्ट्राच्या राज्यपालांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. आता त्या जागी नवीन राज्यपालांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत आता महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून अतिरिक्त कार्यभार स्वीकारणार आहेत. राष्ट्रपती भवनाने गुरुवारी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे याबाबत माहिती दिली. त्यात म्हटले आहे की, सी.पी. राधाकृष्णन यांची भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली आहे. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला आहे. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांची महाराष्ट्राचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. आचार्य देवव्रत हे त्यांच्या सध्याच्या जबाबदाऱ्यांसह महाराष्ट्राच्या राज्यपालपदाच्या जबाबदाऱ्या पार पाडतील. ही नियुक्ती तात्काळ प्रभावी होईल. हरियाणाच्या पानिपत जिल्ह्यातील समलखा तहसीलमध्ये जन्मलेले आचार्य देवव्रत हे एक प्रमुख भारतीय राजकारणी आहेत. ते २०१९ पासून गुजरातचे २० वे राज्यपाल पान २ वर

## पारंपरिक फेरी बोटी डिजिटल युगात

। रायगड । प्रतिनिधी ।

पारंपरिक फेरी बोटी आता डिजिटल युगात पाऊल ठेवत आहेत. भाऊचा धक्का ते रेवस, उरण, मोरा, तसेच गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा, एलिफंटा, अलिबाग या मार्गांवरील प्रवास आता अधिक सोयीस्कर, पारदर्शक व सुरक्षित होणार आहे. ई-तिकीट खरेदी प्रणालीसह बोटीची रियल टाइम माहिती प्रवाशांना लवकरच उपलब्ध होणार आहे. सागरी महामंडळाने यासाठी पुढाकार घेतला आहे.

मुंबई व आसपासच्या समुद्रकिनारी असलेली गावे, छोटे बंदर आणि पर्यटनस्थळासोबत जोडणाऱ्या पारंपरिक फेरी बोटी सेवा अनेक दशकांपासून प्रवासी वाहतूक करीत आहेत. गेल्या काही वर्षांत आधुनिक वॉटर टॅक्सी आणि रो-रो सेवा सुरू झाल्या असल्या तरी स्वस्त, सोयीस्कर आणि मोठ्या प्रवासी क्षमतेमुळे पारंपरिक फेरी बोटींची लोकप्रियता अजूनही कायम आहे. पान २ वर



**फेरी बोटी अपडेट होणार**

- ई-तिकीट प्रणालीद्वारे तिकीट खरेदी करता येणार.
- सुमारे १५० नोंदणीकृत बोटींना फायदा
- थेट सागरी महामंडळाकडे पैसे जमा होणार
- तिकिटावरील सागरी कर थेट जमा होणार
- उर्वरित रक्कम बोट मालकांकडे जाणार.
- पारदर्शकता व व्यवस्थापन सुधारणा होणार
- रियल टाइम माहिती उपलब्ध असणार
- सुरक्षा व सुविधा अपघात टाळण्यास मदत होणार.
- फेरी बोटी सेवा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडली जाणार

## यंदा चार इयत्तांना शिष्यवृत्ती

। रायगड । प्रतिनिधी ।

विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी, त्यांना सामान्य ज्ञानासोबत स्पर्धा परीक्षा आणि त्यांचे काहीसे स्वरूपही लक्षात यावे, म्हणून घेतली जाणारी शालेय शिष्यवृत्ती परीक्षा यंदा सलग चौथी, पाचवी, सातवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांसाठीही घेतली जाणार आहे. शालेय शिक्षणात पहिल्यांदाच एकाच वर्षांत सलग चार वर्षांतील विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा घेतली जाणार असून त्यासाठीचे आदेश लवकरच काढले जाणार आहेत.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शालेय स्तरावर चौथी आणि सातवीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले जात होते. मराठीसह उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, सिंधी, तेलुगू आदी आठ भाषांमध्ये ही परीक्षा घेतली जात होती; मात्र यात २०१६ मध्ये तत्कालीन शालेय शिक्षणमंत्र्यांनी बदल करून ही परीक्षा पाचवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांसाठी करण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयानुसार पहिली परीक्षा फेब्रुवारी २०१७ मध्ये झाली. पान २ वर

## मेळाव्याच्या माध्यमातून हजारो हातांना काम

**■ शेकापचे अतुल म्हात्रे यांच्या पुढाकाराने १६ रोजगार मेळावे**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शिक्षण असूनही रोजगार नसल्याने जिल्ह्यात बेकारीचे संकट उभे राहिले होते. शेकाप राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांनी बेरोजगार तरुणांना रोजगार देण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात १६ रोजगार मेळावे घेतले. या मेळाव्याच्या माध्यमातून एक हजार २०० बेरोजगारांना रोजगार प्राप्त झाला आहे. शेकापचे अतुल म्हात्रे यांच्यामुळे हजारो हातांना काम मिळाले आहे.

उच्चशिक्षित असलेले शेकापचे राज्य खजिनदार पेणमधील रहिवासी आहेत. आपल्या शिक्षणाचा फायदा येथील बेरोजगार तरुणांसाठी झाला पाहिजे, हा ध्यास पान २ वर

**शेकाप आयोजित भव्य रोजगार मेळावा**

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने पनवेल येथे आयोजित भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. शेकाप राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमाला मंगळवारी (दि.९) उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम उत्साहात आणि जल्लोषात यशस्वीरित्या पार पडला. या एक दिवसीय मेळावाच्या माध्यमातून तब्बल शंभरहून अधिक तरुणांना रोजगार देण्यात आला. यावेळी आनंद पाटील, प्रल्हाद पाटील, प्रकाश म्हात्रे, ॲड. रोशन पाटील, संजय सोनवणे, प्रशांत कांबळे, महेंद्र ठाकूर, राहुल बिराडे, विकी कदम तसेच अनेक बँकांचे व्यवस्थापक व कर्मचारी उपस्थित होते. ग्रामीण शहरी भागातील शिकलेल्या मुलांचे भवितव्य उज्ज्वल व्हावे, ही भावना मनाशी ठेवून शेकापतर्फे रोजगार मेळावे आयोजित केले आहेत. अनेकजण रोजगाराचे आश्वासन देतात. परंतू आम्ही फक्त आश्वासन देत नाही, मुलांचे करिअर घडवितो, असा विश्वास शेकाप राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांनी व्यक्त केला.

## पोलीस कर्मचाऱ्याने घेतला गळफास

**नवी मुंबई :** रबाळे येथील पोलीस शिपाई बेपत्ता झाल्याची घटना ताजी असताना आता सानपाडा येथे कार्यरत असणाऱ्या अन्य एका पोलीस कर्मचाऱ्याने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. आत्महत्येचे कारण अद्याप समोर आले नसलेतरी कौटुंबिक तणावातून आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. स्वप्निल लोहार असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. स्वप्नील हे सानपाडा पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई पदावर कार्यरत असून त्यांनी उलवा येथील राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. स्वप्नील यांचा विवाह काही वर्षांपूर्वी झाला असून त्यांना एक मुलगाही आहे. ते राहण्यास उलवा येथे असून सानपाडा पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. काही दिवसापूर्वी त्यांची पत्नी आणि मुलगा गावी गेले होते. सध्या ते घरात एकटेच पान २ वर

## सिडकोचे लाचखोर अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**■ नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अर्जाचा निकाल तक्रारदार यांच्या बाजूने देण्यासाठी सिडकोमधील उपनिबंधक कार्यालयातील लोकसेवकांनी लाचेची मागणी केली. बुधवारी सायंकाळी साडेतीन लाख रुपयांची लाच घेताना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यामध्ये ऑफिस असिस्टंट, सहकार अधिकारी, खासगी इसम व शिपाई या चौघांचा समावेश असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार तक्रारदार वाशी येथील रहिवासी आहेत.

तक्रारदार हे सोसायटीचे सेक्रेटरी म्हणून पान २ वर

**नागरिकांना आवाहन**

रायगड, ठाणे, नवी मुंबई जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी कोणत्याही शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खासगी इसम (एजंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी केले आहे. तसेच तक्रारीसाठी १०६४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधू शकता, असेही सांगण्यात आले आहे.

## जीआरला हात लावला तर...

**मनोज जरांगे पाटील यांचा इशारा**

। जालना । प्रतिनिधी ।

मराठा आरक्षणाच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्याच्या भूमिकेवरून मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे. तुम्ही मराठा आरक्षणाच्या जीआरला कोर्टात आव्हान दिले, तर आम्हीही ओबीसी आरक्षणाला कोर्टात आव्हान देऊ. आमचा जीआर खूप रक्त जाळून मिळवला आहे, त्यात फेरफार करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही मराठे कोट्यवधींच्या संख्येने रस्त्यावर दिसू, असा आक्रमक पान २ वर




**२ हजार कामगार व कुटुंबियांना मिळणार लाभ | आझाद कामगार संघटनेच्या पाठपुरावाला यश**

# स्वच्छतादूतांना मिळणार विम्याचे संरक्षण

। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।

पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना दोन लाखांचा विमा संरक्षण दिले जाणार आहे. नॅशनल इन्शुरन्स कंपनीला या पोटी १ कोटी ८० लाख ८० हजार रुपये अदा करून चलन जमा करण्याचे लेखी आदेश मनपा प्रशासनाने ठेकेदाराला दिले आहेत. त्यामुळे सुमारे दोन हजार स्वच्छता कामगार, त्यांची मुलं आणि आई-वडिलांना त्याचा लाभ मिळणार आहे. आझाद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी केलेल्या अखंडित पाठपुराव्याच हे अखेर यश आहे.

**दोन लाखांचा मेडिक्लेम कव्हर**

महानगरपालिकेकडून दोन लाखांचा मेडिकल कव्हर देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये संबंधित स्वच्छता विषयक कर्मचारी, पत्नी, दोन मुले आणि आई-वडिलांचा समावेश करावा अशा प्रकारचा प्रस्ताव आझाद कामगार संघटनेने दिला होता. तो मंजूर करून संपूर्ण कुटुंबालाच मेडिक्लेम कव्हर देण्यात येणार असल्याचा उल्लेख आदेशामध्ये आहे.

महापालिका प्रशासनाकडून स्वच्छता दूतांना बेसिक ११ हजार ५०० इतका मोबदला दिला जात आहे. त्याचबरोबर विशेष भत्ते ८६१० आणि एचआरए १००५ असे एकूण २१,११५ वेतन दिले जात आहे.. पान २ वर

> “पालिका क्षेत्रातील आरोग्य अबाधित ठेवणाऱ्या स्वच्छता दूतांना विमा कवच मिळावा, यासाठी आझाद कामगार संघटना अखंडितपणे पाठपुरावा केला. ईएसआयसीचा लाभ मिळत नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. शेवटी आमच्या मागणीवर प्रशासनाने निर्णय घेतला आहे. विमा कंपनीला पैसे अदा करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. महापालिकेच्या या भूमिकेचे आझाद कामगार संघटना, स्वच्छता विषयक कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने आम्ही स्वागत करून आभार मानत आहोत. – महादेव वाघमारे, अध्यक्ष–आझाद कामगार संघटना”



# कुणबी समाज आक्रमक

## मराठ्यांच्या दाखल्यांविरोधात तहसीलदारांना देणार निवेदन

। कोलाड । प्रतिनिधी ।

मनोज जरांगे यांच्या दबाबतंत्राला बळी पडून मराठा समाजाला नातेसंबंधातील कुळातील व्यक्तींना कुणबी, कुणबी मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे दाखले देण्यासाठी गाव पातळीवर तीन सदस्य समिती गठीत केली आहे. त्यांच्या चौकशीच्या आधारे सक्षम प्राधिकारी मराठा समाजातील व्यक्तीला कुणबी जातीचा दाखला देण्यासाठी शासनाने अधिसूचना काढून कुणबी-ओबीसी वर्गामध्ये घुसखोरी करून ओबीसीचे आरक्षण लाटण्याचा डाव आखला आहे. या विरोधात रायगड जिल्ह्यातील कुणबी समाज १५ सप्टेंबर रोजी स्थानिक पातळीवर सर्व तालुकास्तरावर तहसीलदारांमार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन देत बुधवारी १७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार असल्याचे रायगड जिल्हा कुणबी समाज कार्यकारिणी आयोजित बैठकीत ठराव घेण्यात आला आहे.




कुणबी समाजोन्नती संघ मुंबई सलग्न रायगड जिल्हा कुणबी समाज समन्वय समिती कार्यकारणी सभा रायगड शाखेचे अध्यक्ष शिवराम महाबळे यांच्या अध्यक्षतेखाली पुगाव येथे आयोजित करण्यात आली होती यावेळी मुंबई संघाने दिलेल्या आदेशाचे तसेच कोकणातील सात जिल्ह्यांना काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार त्याचे पालन करून हे निवेदन एकाच दिवशी सर्व तालुकास्तरावर देण्यात येणार असल्याचे बैठकीतून सांगण्यात आले.

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई सलग्न रायगड जिल्हा कुणबी समाज समन्वय समितीची सभा पार पडली, यावेळी कुणबी समाजाचे जिल्हाध्यक्ष शिवराम महाबळे, उपाध्यक्ष परशुराम आडगावळे, सचिव सचिन कदम, दामोदर ठाकूर, महेश पवार, रामचंद्र सकपाळ, मारुती खांडेकर, सीताराम साळवी, शरद गोळे, राजाराम तिलटकर, अनिल टिंगरे, म्हसळा, तळा, श्रीवर्धन, सुधागड असे पाच तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते तर महाड, पोलादपूर, मुरूड, अलिबाग, खालापूर, कर्जत पनवेल, उरण, माणगाव, पेण तालुक्यातील जिल्हा कार्यकारणी सदस्यांनी जिल्हा अध्यक्षांबरोबर संवाद साधून निवेदन देण्यात येतील असे कळविले आहे.

कोकणातील कुणबी समाज प्रखर आंदोलन करण्यासाठी आपल्या मातृसंस्था, मुंबई संघाच्या वतीने मुलुंड वसतिगृहातील प्रबोधन हॉलमध्ये याबाबत सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये सरकार विरोधात मुंबईमध्ये जेलभरो आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याची तारीख येत्या एक-दोन दिवसात जाहीर करण्यात येणार आहे. तत्पूर्वी संघ संलग्न सर्व तालुका व विभागीय शाखांच्या वतीने कोकणातील सात जिल्ह्यांमधील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर या सर्व तहसील कार्यालयावर निदर्शने करून तहसीलदारांमार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्याचे सदरच्या आयोजित बैठकीतून ठरविण्यात आले. या अनुषंगाने जिल्ह्यातील तालुका स्तरावरील कुणबी समाजाच्या अध्यक्षांना तसेच समाज बांधवांनी एकत्रित येऊन या लढ्यात सामील होऊन हे निवेदन सादर करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

बैठकीत विशेषतः उत्तर रायगडातील सात तालुक्यांचा कुणबी जात पडताळणी दाखला प्रश्नाबाबतदेखील रोहा तालुका शाखेचे अध्यक्ष तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्य रामचंद्र सपकाळ यांनी प्रश्न उपस्थित केला तर यासाठी कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संघ यांच्या नेतृत्वाखाली तसेच समाजाच्या विविध प्रश्नांसाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करत असल्याचे या बैठकीत आवर्जून सांगितले आहे.

## पथदिवे दुरुस्ती करणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल** : महामार्गावरील पथदिव्यांची देखभाल आणि दुरुस्ती करणाऱ्या कंत्राटदार कंपनीवर पालिकेच्या माध्यमातून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे उपाध्यक्ष सुनील शिरीषकर यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत ही कारवाई करण्यात आली आहे. सायन-पनवेल महामार्गावरील पनवेल पालिकेच्या हद्दीतील पथदिव्यांचे देखभाल आणि दुरुस्तीच्या काम ासाठी पालिकेच्या माध्यमातून कंत्राटदार कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्यक्षात मात्र महामार्गावरील अनेक पथदिवे बंद असल्याचे अनेकदा निदर्शनास आल्यानंतर शिरीषकर यांनी शहर अभियंता संजय कटेकर आणि विद्युत विभागाचे प्रमुख प्रीतम पाटील यांच्याकडे यासंदर्भात तक्रार करत कारवाई करण्याची मागणी केली होती. शिरीष कर यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत प्रशासनाकडून संबधित ठेकेदाराला कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली आहे. दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

## जलविद्युत प्रकल्पासंदर्भात पर्यावरणविषयक सुनावणी

। रायगड । प्रतिनिधी ।

प्रस्तावित साईडोंगर-१ उदंचन जलविद्युत प्रकल्पासंदर्भात पर्यावरणविषयक सार्वजनिक सुनावणी गौरकामत ग्रामपंचायत हद्दीत यशस्वी पार पडली. ही सुनावणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्र मंडळाच्या रायगड क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. सुनावणीच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के होते. त्यांच्या समवेत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी संजय भोसले, सहाय्यक प्रादेशिक अधिकारी रुतूजा भालेराव होते.

टोरेंट पीएसएच-३ प्रा. लि. या कंपनीतर्फ प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणात प्रकल्पाचा उद्देश, तांत्रिक तपशील, पर्यावरणीय प्रभाव व व्यवस्थापन आराखडा याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. सादरीकरणात विशेषतः जल, वायू, ध्वनी या संदर्भातील शास्त्रीय अभ्यास नोंदविला गेला. १०५ कोटी रुपयांचा पर्यावरण व्यवस्थापन आराखडा स्थानिक पातळीवर लागू केला जाणार आहे. त्यामध्ये आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, पायाभूत सुविधा, वृक्षारोपण, आपत्ती व्यवस्थापन अशा विविध बाबींचा समावेश आहे.

काही ग्रामस्थांनी स्थानिक भागातील दुर्गमता, रोजगाराचा अभाव, आणि सोयी सुविधांचा अपुरा विकास यावर भर देत अशा प्रकल्पांची नितांत गरज असल्याचे अधोरेखीत केले. सुनावणीत काही हरकती प्राप्त झाल्या असल्या तरी त्या संयमपूर्वक ऐकून घेतल्या. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व कंपनीच्या प्रतिनिधींनी समाधानकारक उत्तरे दिली. रोजगार, महिला बचतगट, स्थानिक पुरवठा साखळी आणि सामाजिक विकासावर भर द्यावा अशी अपेक्षा प्रकल्पाचे समर्थन करणाऱ्यांनी व्यक्त केली. हा प्रकल्प भविष्यात कर्जत, रायगड जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीस हातभार लावणारा ठरेल असा अनेकांनी विश्वास व्यक्त केला असल्याचे सांगण्यात आले.

पान १ वरून

## इको कारची संरक्षण भिंतीला धडक

गाडीवरील नियंत्रण सुटले. यामुळे भोगाव पुलावरील कठड्यावर कारने जोराने धडक दिली आणि कार कलंडून झालेल्या अपघातात १ ठार तर ५ जखमी झाले. या अपघातात अनिल देविदास कांबळे (वय ५५ रा.चहोली ता. हवेली जि. पुणे) याचा जागीच मृत्यू झाला तर धनराज प्रभाकर मगर (वय ४२), विकास शंकर चव्हाण (वय १८), मोहन गोरोबा चव्हाण (वय ४२), नागनाथ मल्लिकार्जुन कांबळे (वय ३५), वाहनचालक निंगप्पा कंटप्पा पातारे (वय २८) हे सर्व जखमी पुणे जिल्ह्यातील रहिवासी आहेत. यापैकी गंभीर दुखापत झालेल्या तिघांना खेड तालुक्यातील कळंबणी येथील रत्नागिरी उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार करण्यात आले तर दोन किरकोळ जखमी प्रवाशांवर पोलादपूर ग्रामीण रुग्णालय येथे उपचार करण्यात आले.

या अपघाताचे वृत्त समजताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार रवींद्र सर्णेकर, ठाणे अंमलदार सतीश कदम, पोलीस हवालदार नितेश कोंढाळकर यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून जखमींना तातडीने उपचारासाठी पाठविले. यासह कशेडी पोलीस मदत केंद्राचे पीएसआय गीमवणेकर, हेकॉ. माजलकर, चाटे व सोडमीस यांनीही घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली. पोलादपूर पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली असून या अपघातप्रकरणी अधिक तपास ठाणे अंमलदार सतीश कदम हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## शासनाच्या जीआरला केराची टोपली

नगरपंचायतीमध्ये झाल्यानंतर गेल्या वर्षापासून पोलादपूरच्या अंगणवाडी केंद्रातून नगरविकास विभागाच्या सूचनेनुसार बालकांचा आणि स्तनदा मातांचा पोषण आहार पाठविला जात आहे. तर ग्रामीण भागामध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या निकषांनुसार आहार सुरू आहे. तसेच २०१३ मध्ये मुलांची प्राथमिक शाळा आणि कन्या शाळेमध्ये एम्पथी फाऊंडेशनतर्फे बांधण्यात आलेल्या सुसज्ज आणि प्रशस्त एकत्रित इमारतीमध्ये पोलादपूर शहराची एक अंगणवाडी सुरू करण्यात आली आहे. यासाठी पुर्वी आयुक्तांचे पत्र प्रमाण मानले जात होते तर याबाबत २ जुलै २०२५ रोजी महिला बालविकास विभागातर्फे परिपत्रकाद्वारे एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील ज्या अंगणवाडी केंद्रांना स्वत:ची इमारत उपलब्ध नाही, अशी अंगणवाडी केंद्र नजिकच्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये स्थलांतरीत करण्याबाबत अधिकृत शासन निर्णय झाला आहे.

पोलादपूर येथील उच्च प्राथमिक प्राथमिक शाळेच्या बहुतांशी विद्यार्थ्यांच्या पालकांना शहरातील अन्य खासगी शाळांमध्ये दाखल होण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाने नेहमीच प्रयत्न केले असल्याने मुलांची शाळा आणि कन्या शाळ-ेची विद्यार्थी पटसंख्या नगण्य आहे. मात्र, या प्राथमिक शाळांसाठी शाळा व्यवस्थापन समिती असून ऑगस्ट २०२५ मध्ये या समितीने शासन निर्णयाविरोधात ठराव करून अंगणवाडी सेविका यांना लेखीपत्राद्वारे अंगणवाडी भरण्याची स्वतंत्र व्यवस्था प्रशासनामार्फत करण्याची सूचना करताना केंद्रप्रमुख यांच्यासाठी एक वर्ग खोली तसेच बालवाचनालयाच्या उपक्रमासाठी वर्गखोली लागणार असल्याचे कारण पुढे केले आहे. यामागे ही अंगणवाडी शैक्षणिक वर्ष सुरू असताना विस्थापित होऊन विद्यार्थ्यांच्या पालकांना पालकांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी अन्य खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये फी भरून प्रवेश घेण्याचा पर्याय स्वीकारावा लागावा, हा अंतस्थ हेतू दिसून येत आहे. पोलादपूर शहरातील विविध शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने खळबळ माजविणारी शाळा व्यवस्थापन समितीतील व्यक्तीदेखील अंगणवाडीची खोली खाली करण्यासाठी अंगणवाडी सेविकेला भेटल्याची माहिती यावेळी प्राप्त झाली. यामुळे शासन निर्णयाला मुख्याध्यापिका यांच्या पत्राने तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या ठरावाने केराची टोपली दाखविण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

यासंदर्भात पोलादपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी, अंगणवाडीला बुधवारी सायंकाळी भेट देऊन अंगणवाडीची वर्गखोली तळमजल्यावर हलविण्याची सूचना केली. मात्र, तळमजल्यालगत सुचविलेल्या वर्गखोलीचा परिसर गलिच्छ तसेच सरपटणाऱ्या जनावरांच्या मुक्तसंचाराचा असल्याने लहान बालकांचा जीव धोक्यात असल्याचे निमित्त पुढे करून खासगी शैक्षणिक संस्थांचे संचालक पुन्हा पालकांना आकर्षित करून या अंगणवाडीची पटसंख्या घटविण्याचा प्रयत्न करतील, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

एम्पथी फाऊंडेशनने उभारलेल्या प्रशस्त इमारतीसह पोलादपूर शहरातील अन्य खासगी व प्राथमिक शाळांचे नियंत्रण पोलादपूर नगरपंचायतीकडे शिक्षण विभाग अस्तित्वात नसल्याने नगरपंचायत ठेऊ शकत नाही. स्थानिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याबाबत नगरसेवक व राजकीय व्यक्तींची खासगीकरणाशी संलग्नता असल्याने दूर्लक्ष होत आहे. त्यामुळे थेट नागरिकांनीच प्राथमिक शाळा व अंगणवाडी यांच्या विद्यार्थी पटसंख्येसाठी पुढे येऊन प्रयत्न करण्याची आवश्यकता निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

## पारंपरिक फेरी बोटी डिजिटल युगात

रो-रो बोटींची तिकिटे ऑनलाइन खरेदी करता येतात; मात्र वर्षानुवर्षे प्रवासी सेवा देणाऱ्या पारंपरिक फेरी बोटी प्रवासासाठी ई-तिकीट सुविधा नव्हती. आता सुमारे १५० नोंदणीकृत फेरी बोटींना नव्या डिजिटल सुविधेचा फायदा मिळणार आहे. यापूर्वी फेरी बोटचालकांना प्रत्येक तिकिटांवरील सागरी कर (नेव्ही) सागरी महामंडळाकडे जमा करावा लागत होता. ई-तिकिटिंग प्रणालीमुळे आता तिकीट रक्कम थेट सागरी महामंडळाकडे जमा होईल, तर उर्वरित रक्कम बोट मालकांकडे वर्ग केली जाईल. या प्रक्रियेवर सागरी महामंडळाचे पूर्ण नियंत्रण राहणार आहे.

बोटींची सुरक्षिततागेटवे ऑफ इंडियावरून एलिफंटा बेटाकडे जाणाऱ्या एका लाकडी फेरी बोटीच्या अपघातानंतर समुद्री सुरक्षा ऐरणीवर आली आहे. या पार्श्वभूमीवर फेरी बोटचालक व संचालकांनी सुरक्षिततेसाठी बोट ट्रॅकिंग सिस्टीम बसवण्याचे निर्णय घेतले आहेत. ही प्रणाली भारतीय नौदलाकडून विकसित केली जात आहे.

या प्रणालीअंतर्गत समुद्रात कोणती बोट कुठे आहे, याची रियल टाइम माहिती सागरी महामंडळ आणि मुंबई पोर्ट ट्रस्टकडे उपलब्ध राहणार आहे. यामुळे अपघात टाळणे, प्रवासी सुरक्षितता सुधारणा आणि फेरी बोटींच्या सुरक्षिततेची हमी मिळवणे शक्य होणार आहे. ही प्रणाली पारंपरिक फेरी बोटी सेवा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा महत्त्वाचा टप्पा ठरेल. प्रवाशांना तिकीट खरेदी सोपी होईल आणि बोटींची सुरक्षितता सुनिश्चित करता येईल, असे सागरी महामंडळाचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

## स्वच्छतादूतांना मिळणार विम्याचे संरक्षण

नयमानुसार २१ हजाराहून अधिक कामाचा मोबदला मिळत असेल तर संबंधित ईएसआयसीच्या अखत्यारीत येत नाहीत. त्यामुळे संबंधितांना ही योजना लागू होत नाही. पनवेलचे आरोग्य आणि स्वच्छता राखणाऱ्या या दूतांना आरोग्य विमा मिळावा, या उद्देशाने आझाद कामगार संघटना गेल्या दोन वर्षांपासून पनवेल महानगरपालिकेकडे पाठपुरावा करत आहे. या मागणीसाठी महादेव वाघमारे यांनी महापालिकेसमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला होता. प्रशासनाकडून त्यांना चर्चेस बोलवल्यानंतर काही दिवसांसाठी आंदोलन स्थगित करण्यात आले होते. त्याची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने महापालिकेचे उपायुक्त वैभव विधाते यांनी साई गणेश इंटरप्राईजेसला लेखी आदेश निर्गमित केले आहेत. मेसर्स इफिसेंट ब्रोकर, इन्शुरन्स ब्रोकर प्रायव्हेट कंपनीने दिलेल्या न्यूनतर दर पत्रकानुसार नॅशनल इन्शुरन्स कंपनीला एक कोटी ८० लाख ८० हजार रुपये इतक्या रक्कम अदा करून त्या संदर्भातील चलन महापालिका प्रशासनाकडे सादर करावे. त्यानंतर प्रतिपुर्ती देयके महापालिका देईल असेही या आदेशामध्ये म्हटले आहे. याची प्रत आझाद कामगार संघटनेलाही देण्यात आली आहे

## ३० सप्टेंबरला होणार उद्घाटन?

काम करणाऱ्या सिडको आणि अदाणी कंपनीला दिली होती. तेव्हापासून युद्धपातळीवर विमानतळाचे काम सुरू होते. आता हे काम पूर्णत्वास आले असून, विमानतळावरील पहिल्या टर्मिनल इमारतीच्या अंतर्गत सजावटीचे कामही आटोपले आहे. धावपट्टीसह टॅक्सीवे आणि इतर मार्ग यापूर्वीच सज्ज होते. त्यामुळे येत्या ३० सप्टेंबरला नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विमानतळाचे उद्घाटन करण्यासाठी केंद्रीय सुरक्षा दलांनी तयारी सुरू केली आहे.

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलातर्फे १५ ते २२ सप्टेंबरदरम्यान ९१८ सुरक्षा रक्षक आणि १२ गस्टेड ऑफिसर उपलब्ध केले जाणार आहेत. एक कमांडंट आणि दोन असिस्टंट कमांडंट यांच्यामार्फत देखरेख केली जाणार आहे. एपीएस-१ आणि एपीएस-२ या रँकचे सुमारे ४८४ रक्षक नियुक्त केले जाणार आहेत. ब्युरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटीतर्फे (बीसीएएस) सर्व सुरक्षा दलांना सुरक्षेबाबतची नियमावली १५ सप्टेंबरपासून देण्यात येणार आहे. ३० सप्टेंबरला उद्घाटन झाल्यानंतर २५ ऑक्टोबरपासून प्रवासी सेवा सुरू होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले

अकासा एअर व इंडिगो या दोन विमान कंपन्यांना पहिले विमान उडवण्याचा मान मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात देशाअंतर्गत प्रवासी सेवा सुरु होणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने आंतरराष्ट्रीय आणि मालवाहतूक सेवा सुरू होईल, असे सूत्रांनी सांगितले.

## मेळाव्याच्या माध्यमातून हजारो हातांना काम

त्यांनी कायमच ठेवला आहे. जिल्ह्यात अनेक तरुण आहेत. परंतु नोकरी नसल्याने बेकारीचे संकट त्यांच्यामध्ये निर्माण झाले आहे. हे संकट दुर करण्यासाठी शेकाप राज्य खजीनदार अतुल म्हात्रे यांनी पुढाकार घेतला आहे. रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल, उरण, कर्जत, रोहा या पाच तालुक्यांमध्ये आतापर्यंत त्यांनी १६ रोजगार मेळावे घेतले. या मेळाव्यात हजारो युवक युवतींनी सहभाग घेतला. या रोजगार मेळाव्यातून जागेवरच पात्र ठरणाऱ्या युवक युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. आतापर्यंत एक हजार २००हून अधिक तरुणांच्या हाताला काम देण्याचे काम अतुल म्हात्रे यांनी केले आहे. त्यांच्यामुळे हजारो घरांना आर्थिक बळ मिळाले आहे.

## यंदा चार इयत्तांना शिष्यवृत्ती

त्यानंतर या परीक्षेतील स्तर हा पूर्वीप्रमाणेच चौथी आणि सातवीतील विद्यार्थ्यांसाठीच असावा, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानंतर इतर काही संघटनाही यासाठी पुढे आल्याने यंदा शालेय शिक्षण विभागाने २०१७ पूर्वी सुरू असलेल्या चौथी आणि सातवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. यासाठी विभागाकडून लवकरच सुधारित धोरण आणले जाणार आहे.

शालेय शिष्यवृत्ती परीक्षला १० लाखांहून अधिक विद्यार्थी बसतात. सुमारे १६ हजार विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरविले जाते. त्यानंतर ही शिष्यवृत्ती केंद्र सरकारकडून उपलब्ध करून दिली जाते. उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड मोठ्या प्रमाणात असल्याने इतर विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा, म्हणून इतर मागास वर्ग, सामाजिक न्याय आणि आदिवासी विभागाशी संबंधित असलेल्या विविध प्राधिकरणांकडून त्या-त्या घटकांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती कशी मिळेल, यासाठीच्या कक्षा वाढविण्यासाठीचे धोरण ठरविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## सिडकोचे लाचखोर अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

कार्यरत असताना चेअरमन नोमान चौधरी व इतर दोन सदस्य यांनी राजीनामा देऊन सोसायटीची कमिटी रद्द होण्याबाबत उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई येथे अर्ज सादर केला. सन २०२३-२४ मध्ये सोसायटीची वार्षिक सर्वसाधरण सभा उशीरा घेतल्याने सोसायटीच्या कमिटीवर कारवाई होण्यासाठी सोसायटीचे सभासद युसुफ चौधरी यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको, यांच्याकडे अर्ज सादर केला. अर्जाचा निकाल तक्रारदार यांच्या बाजूने देण्यासाठी उपनिबंधक कार्यालयातील लोकसेवक यांनी पाच लाख रुपयांची मागणी केली. याबाबत नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारदाराने तक्रार केली.

तडजोडअंती साडेतीन लाख रुपये देण्याचे ठरले. पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार वाघ, पोलीस हवालदार नितीन पवार,भरत गिरासे, चालक पोलीस हवालदार रतन गायकवाड, पोलीस नाईक योगेश नाईक,विशाल अहिरे, महिला पोलीस नाईक पल्लवी कदम, दिपाली सावंत, महिला पोलीस शिपाई योगिता चाळके या पथकाने बुधवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. या छाप्यात साडेतीन लाख रुपयांची लाच घेताना कर्मचाऱ्यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

नवी मुंबईमधील सिडकोतील सहकारी संस्था सहनिबंधक कार्यालयामधील ऑफिस असिसस्टंट राहुल कांबळे, सहकार अधिकारी धनाजी काळुखे, खासगी इसम किशोर मोरे व शिपाई महेश कामोठकर या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जीआरला हात लावला तर...

इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे.

अंबड तालुक्यातील अंकुश नगर येथील निवासस्थानी माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, भुजबळांना मराठा आणि सरकारची मने जुळलेली आवडत नाही. त्यांना फक्त ओबीसीच्या नावाखाली राजकीय पद हवे आहे. ते पुढे म्हणाले की, भुजबळ फक्त आपल्या स्वार्थासाठी ओबीसी, ओबीसी करत आहेत आणि इतर जातींना मराठ्यांपासून तोडण्याचे काम करत आहेत. हा भुजबळांचा डाव आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आला असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला.

**१९९४ च्या जीआरला आव्हान देणार**

जरांगे पाटील यांनी यावेळी ओबीसी आरक्षणासंदर्भात एक मोठा इशारा दिला. ते म्हणाले, तुम्ही जर आमच्या जीआरला काही करू शकलात, तर तुमच्या १९९४ च्या जीआरला आणि ५० टक्क्यांच्या वरच्या २ टक्के आरक्षणालाही धोका आहे, हे लक्षात ठेवा. तुम्ही याचिका दाखल करायला लागलात तर आम्ही सुद्धा आता १९९४ च्या जीआर संदर्भात याचिका दाखल करणार आहोत. त्यासाठी सर्व कागदपत्रे वकिलांनी तयार केली असल्याचे त्यांनी सांगितले. ५० टक्क्यांच्या वर २ टक्के आरक्षण ठेवता येत नाही, ही बाजूही ते न्यायालयात मांडणार असल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले.

**पंकजा मुंडेंच्या वक्तव्यावरून सावध राहण्याचा सल्ला**

पंकजा मुंडे यांच्या कथित वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना जरांगे म्हणाले, मी पंकजा मुंडे काय बोलल्या, ते ऐकले नाही, पण मला वाटत नाही की त्या असं बोलतील. जर त्या असं बोलल्याच असतील तर मराठ्यांनी सावध होणे गरजेचे आहे. मराठ्यांच्या मतांवर ज्यांचे राजकीय करिअर मोठे झाले, तेच नेते जर मराठा लेकरांच्या मुळावर घाव घालत असतील तर हे योग्य नाही. यावेळी त्यांनी मराठवाड्यातील आणि बीड जिल्ह्यातील मराठा नेत्यांना जातीचा विचार करून एकजुटीने काम करण्याचा सल्ला दिला. आपले खरे आरक्षण असून हे जर बोगस म्हणणारे असतील तर हे १६ टक्के बोगस आरक्षण खात आहेत, त्याविषयी सुद्धा आपल्याला आवाज उठवावा लागेल, असेही ते म्हणाले.

## पोलीस कर्मचाऱ्याने घेतला गळफास

राहत होते. गुरुवारी पहाटे दोनच्या सुमारास त्यांचे त्यांच्या पत्नीशी फोनवर बोलणे झाले. काही वादातून त्यांनी आता मी आत्महत्या करतो, असे रागात म्हटले. अडचणीच्या वेळी कामाला येईल म्हणून स्वप्नील यांनी त्यांच्या काही सहकार्याचे मोबाईल क्रमांक पत्नीला दिले होते. त्यामुळे स्वप्नील यांच्या पत्नीने घाबरून ही बाब स्वप्नील यांच्या एका सहकार्याला फोन करून दिली.

## अल्पवयीन मुलाने केला लैंगिक अत्याचार

माहिती समजल्यानंतर त्यांनी उरण येथील अल्पवयीन मुलाच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती. त्यावेळी अल्पयवीन मुलाने पीडित मुलीसोबत लग्न करण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर पीडित मुलीच्या आई वडिलांनी पीडित मुलीचे वय पूर्ण झाल्यानंतर तिचे लग्न अल्पवयीन मुलासोबत लावून देण्याची तयारी दर्शवली होती. तसेच तोपर्यंत पीडित मुलीला अल्पवयीन मुलाच्या घरी ठेवले होते.

दोघांमध्ये शरीरसंबंध निर्माण झाल्याने पीडित मुलगी गरोदर राहिली. त्यामुळे अल्पवयीन मुलाने व त्याच्या कुटुंबियांनी पीडित मुलीसोबत लग्न करण्यास नकार देऊन तिला घरातून हाकलून दिले. त्यानंतर पीडित मुलगी रसायनी येथील आपल्या आई वडिलांच्या घरी गेल्यानंतर तिने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरोधात लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याप्रकरणी तसेच पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी उरण पोलिसांकडे वर्ग केला. उरण पोलिसांनी या प्रकरणातील अल्पवयीन मुलाला ताब्यात घेऊन त्याची बाल सुधारगृहात रवानगी केली आहे.

## गुजरातच्या हातात महाराष्ट्राचं राजभवन

म्हणून काम करत आहेत. याआधी ते २०१५ ते २०१९ पर्यंत हिमाचल प्रदेशचे राज्यपाल होते.

महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून कार्यरत असलेले सीपी राधाकृष्णन ९ सप्टेंबर रोजी भारताच्या उपराष्ट्रपतीपदी निवडून आले आणि त्यांनी इंडिया ब्लॉकचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी, जे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आहेत, यांच्याविरुद्ध ४५२-३०० मतांनी विजय मिळवला. सीपी राधाकृष्णन हे भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे भारतातील दुसऱ्या सर्वोच्च संसदीय पदासाठी निवडलेले उमेदवार होते. ते अखेर उपराष्ट्रपती निवडणुकीत विजयी झाले.

**तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात**

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र.५७३/२०२५

सौ. शितल करण म्हसकर — वादी
रा.-पाली टेंभी
ता.सुधागड, जि.रायगड

विरूद्ध

नगरपंचायत अधिकारी - नगरपंचायत पाली — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सौ. शितल करण म्हसकर रा. पाली टेंभी ता. सुधागड, जि. रायगड यांनी यांचा मुलगा कु. रोहन करण म्हसकर याचा जन्म दि. २६/१०/२०२१ रोजी मौजे पाली टेंभी ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्याचा जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर रोहन करण म्हसकर त्याच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- १०/०९/२०२५

सही / -
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

**तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात**

क्र. फौजदारी/ कात-९/आवक क्र.    /२०२५

श्री. खेळु राया हिरवा — वादी
रा. पेंढरमाळ पो. घोटवडे
ता. सुधागड, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी - ग्रामपंचायत घोटवडे — प्रतिवादी
ता. सुधागड, जि.रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री. खेळु राया हिरवा रा. पेंढरमाळ पो. घोटवडे ता. सुधागड, जि. रायगड यांनी यांचे भाऊ कै.दाजी राया हिरवा यांचा मृत्यु दि. ०३/०२/२००६ रोजी मौजे-पेंढरमाळ पो.घोटवडे ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर दाजी राया हिरवा यांच्या मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :-१०/०९/२०२५

सही /-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

# निवडक



## पंचायतराज अभियानाची कार्यशाळा

**तळा** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची कार्यशाळा तळा पंचायत समिती कार्यलयात उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन तळा तहसिलच्या तहसीलदार स्वाती पाटील यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी महादेव शिंदे, शेळके, पुरुषोत्तम मुळे, डॉ. रघुनाथ पोवार, पंचायत समितीमधील विविध खात्याचे खाते प्रमुख, तळा तालुक्यातील २५ ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, डाटा ऑपरेटर, ग्रामसेवक तसेच तळा पंचायत समितीमधील ग्रामपंचायतच्या कृषी, शिक्षण, आरोग्य, बांधकाम, अर्थ, पशुवैद्यकीय अशा विविध खात्याचे खाते प्रमुख कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ रघुनाथ पोवार यांनी मानले. यावेळी गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांनी योग्य सूचना करीत मार्गदर्शन केले.

## हातमाग कापड भव्य प्रदर्शन

**अलिबाग** : सोलापूरच्या भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग कापड भव्य प्रदर्शन व विक्री ग्राहकांच्या आग्रहानुसार व नवरात्र सनानिमित्त १८ सप्टेंबर पर्यंत वाढवण्यात आले आहे. डोंगरे हॉल सार्वजनिक वाचनालय पोस्ट ऑफिस समोर अलिबाग येथे दि. १८ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे हातमाग कापड प्रदर्शनाचा अलिबागवासियांनी लाभ घ्यावा असे आवाहन पुरुषोत्तम पोतन यांनी केले. प्रदर्शनात कॉटन साडी, इरकल साडी, मधुराई साडी, खादी साडी, धारवाड साडी, मधूराई सिल्क साडी, सेमी पैठणी, खादी सिल्क साडी, प्रिंटेड ड्रेस, वर्क ड्रेस मटेरियल, पटोला ड्रेस, कॉटन परकर, टॉप पिस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन , सतरंजी, पंचा, टॉवेल, वुलनचादर, दिवाणसेट, प्रिंटेड बेडशीट, पिलो कव्हर, लुंगी, व शर्ट, कुर्ता, बंडी, गाहून, पैठणी, खादी सिल्क साडी, प्रिंटेड ड्रेस, वर्क ड्रेस मटेरियल, पटोला ड्रेस, कॉटन परकर, टॉप पिस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन, सतरंजी, पंचा, टॉवेल, वुलनचादर, दिवाणसेट, प्रिंटेड बेडशीट, पिलो कव्हर, लुंगी, व शर्ट, कुर्ता, बंडी, गाहून विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. सुती व खादी कापडाच्या विक्रीवर व सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २० टक्के सुट ठेवण्यात आली आहे असे आयोजकांनी सांगितले आहे.

## मुरुडमध्ये गढूळ पाणी पुरवठा

**कोर्लई** : मुरुडमध्ये गेल्या महिनाभरापासून गढूळ पाणी पुरवठा होत असल्यामुळे विविध प्रकारच्या आजारांनी अनेक जण बेजार झाले आहेत. गढूळ पाणी पुरवठा करुन नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याऱ्या नगरपरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात सामाजिक कार्यकर्ते पुढाकार घेणार असल्याचे बोलले जात आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरासाठी असलेली जलशुद्धीकरण यंत्रणा सुस्थितीत, व्यवस्थित ठेवणे जबाबदारी नगरपरिषदेची होती. गढूळ पाणी पुरवठा प्रश्नी स्थानिक लोकप्रतिनिधींनीही लक्ष दणे गरजेचे होते असे बोलले जात आहे. याला जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात सामाजिक कार्यकर्ते पुढाकार घेऊन दाद मागणार असल्याचे बोलले जात आहे. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे अलिबाग नगरपरिषदेचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत असल्याने, मुख्य नियुक्तीकडे त्यांचे दुर्लक्ष तर होत नाही ना, असा सवाल विचारला जात आहे तसेच मुरुडच्या विविध प्रश्नी काही सामाजिक कार्यकर्ते तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याच्या तयारीत असल्याचे समजते.



## संघर्ष समितीचे कर्जत आगार प्रमुखांना निवेदन

**माथेरान** : सर्वसामान्य लोकांना वाहतुकीसाठी शासनाची मिनीबस सेवा हा एक उत्तम स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाची हमी देणारा पर्याय उपलब्ध असून या बस सेवेच्या मार्गात अनेक विघ्न निर्माण होत असल्याने नेरळ (खांडा) येथील अरुंद मार्गावर चालक, वाहक यांनाही वाहन चालविताना अनेकदा नेरळ येथील वाहन चालकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. त्यामुळे चालकांनी सदर बस नेरळ खांडा या ठिकाणी शनिवार, रविवार या दोन दिवशी नेण्यास नकार दिल्याचे पर्यटन बचाव संघर्ष समितीला समजले होते.त्यामुळे सर्वसामान्य लोकांची गैरसोय होऊ नये यासाठी समितीच्या शिष्टमंडळाने (दि.१०) सप्टेंबर रोजी व्यवस्थापक आगारप्रमुख कर्जत यांची भेट घेऊन नेरळ खांडा येथील बस थांबा हलविण्यास आमचा विरोध राहील अशा प्रकारचे निवेदन देण्यात आले. यावेळी समितीचे कुलदीप जाधव, प्रदीप घावरे,चंद्रकांत जाधव, गिरीश पवार, राजेश चौधरी, दिनेश सुतार, मुकुंद रांजाणे हे सदस्य उपस्थित होते.

# जिते आरोग्य केंद्राला कुलूप



**ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्याची मागणी : इमारत तयार होऊन कोणत्याही सोयीसुविधांचा अभाव**

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील नेरळ जवळील जिते येथे आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात आली आहे. मात्र, इमारतीत कोणत्या प्रकारच्या दवाखान्याची आहे याबाबत मागील दीड वर्षांपासून कोणालाही कोणत्याही प्रकारची माहिती नाही. जिते गावाच्या बाहेर नवीन आरोग्य केंद्र जिल्हा परिषदेच्या माध्यमातून बांधण्यात आले असून दीड इमारत बांधकाम होऊन आजपर्यंत त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची आरोग्य सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे आरोग्य खात्याचा कारभार नक्की कोणत्या दिशेने चालला आहे याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेचे माजी स्वीकृत सदस्य राजेश जाधव यांनी या ठिकाणी तत्काळ दवाखाना सुरू करावा अशी मागणी केली आहे.

तालुक्यात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे सहा प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. त्यात प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात साधारण ३० हजार लोकसंख्या गृहात धरली जाते, त्यानुसार ठरलेल्या पॅटर्न नुसार तालुक्यात नेरळ, कळंब, आंबिवली, खांडस, कडाव आणि मोहाली अशा सहा ठिकाणी आरोग्य केंद्र आहेत. मात्र त्यापैकी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीत राहणाऱ्या लोकांची लोकसंख्या साधारण ८० हजाराच्या घरात आहे. त्यामुळे नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रावर कामाचा मोठा दबाव असतो. त्यात नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र नेरळ रेल्वे स्थानक आणि एसटी स्थानकाच्या जवळ हाकेच्या अंतरावर आहे. त्यामुळे रुग्णानाची संख्या या ठिकाणी जास्त असते तसेच दिवसभर रुग्णांची वर्दळ असते. त्यामुळे नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करावे अशी मागणी सातत्याने केली जात असते. त्यामुळे नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे विभाजन करून दोन प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात यावेत अशी मागणी देखील पुढे आली आहे.

या आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन दीड वर्षाहून अधिक काळ लोटला असून त्या आरोग्य केंद्राच्या इमारती मधून कोणत्याही प्रकारचा कारभार किंवा आत्या इमारतीचा कोणत्याही प्रकारे वापर केला जात नाही.

> शासनाच्या पॉलिसी प्रमाणे कोणत्याही नवीन आरोग्य केंद्र किंवा आरोग्य उप केंद्र यांच्या उभारणीमध्ये जागेची उपलबद्धता झाल्यानंतर इमारत बांधकाम केले जाते. त्यानंतर आरोग्य संचालक यांच्याकडून पाहणी झाल्यावर आरोग्य केंद्राची मंजुरी दिली जाते. इमारत बांधून पूर्ण झाली असून आरोग्य उप संचालक यांच्याकडून लवकरच तेथे कोणत्या प्रकारचा दवाखाना होणार हे जाहीर केले जाईल.
> –डॉ नितीन गुरव, तालुका आरोग्य अधिकारी

> नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती जवळ चार चाकी वाहन घेऊन जाणे म्हणजे मोठे कष्टाचे काम आहे. त्या ठिकाणी वाहने जाण्यास रस्ता अरुंद आहे, म्हणून जिते येथे आरोग्य केंद्राची इमारत बांधली आहे. परंतु सव्वा दोन कोटी खर्चून बांधलेल्या इमारतीमध्ये रुग्णसेवा देण्यास सुरुवात व्हावी अशी मागणी आहे.
> –राजेश जाधव, माजी स्वीकृत सदस्य रायगड जिल्हा परिषद

# खड्डे मुक्तीसाठी प्रशांत नाईक यांचा पुढाकार

**स्वखर्चाने खड्डे भरून जपली सामाजिक बांधिलकी**



| रायगड जिल्हा | प्रतिनिधी |

अलिबाग–वडखळ मार्गावरील अलिबाग शहरातील प्रवेशव्दार ते चेंढरे बायपास रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती करण्यास राष्ट्रीय महामार्ग विभाग उदासीन ठरले. अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी पुढाकार घेत चेंढरे बायपास ते शहरातील प्रवेशव्दारापर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती बुधवारी (दि.१०) स्वखर्चाने केली. या खड्डेमय रस्त्यावर डांबरीकरण करून रस्ता वाहतूकीसाठी सुसज्ज करण्याचा प्रयत्न केला.

अलिबाग शहराचे प्रवेशव्दार ते चेंढरे बायपास रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले होते. खड्डेमय रस्त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांसह नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. शहराच्या प्रवेशव्दारासमोरील रस्त्यांची अवस्था बिकट झाली होती. खड्डे वाचवितांना अनेकवेळा अपघात होत आहेत. रस्त्यावरून ये जा करताना विद्यार्थी व पालकांना कसरत करावी लागत आहे. खडड्यांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. अलिबाग हे जिल्हयाचे ठिकाण आहे. पर्यटकांसह नागरिकांची हजारोच्या संख्येने या ठिकाणी वर्दळ असते. शहराच्या प्रवेशव्दारा समोरच असलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांसह प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

अलिबागचे माजी नगराध्यक्ष नाईक यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी पाऊल उचलले. बुधवारी (दि.१०) त्यांनी कामाच्या ठिकाणी स्वतः उपस्थित राहून खड्डे डांबरांनी भरून घेतले. शासनाच्या निष्क्रियतेमुळे त्रस्त नागरिकांना एकदा दिलासा देण्यासाठी माजी नगराध्यक्ष नाईक यांनी पुढाकार घेतला. बिकानेर स्वीट्ससमोर व आसपासचे प्रचंड खड्डे त्यांनी स्वतःच्या प्रयत्नातून डांबरीने भरून घेतले. यापुर्वीदेखील त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत चेंढरे बायपास रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसवून घेतल होते.

# खड्डेमय रस्त्याविरोधात शेकाप आक्रमक



| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील खड्डेमय रस्त्याच्याविरोधात शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला आहे. शेकाप तालुका चिटणीस रवी घरत यांच्या नेतृत्वाखाली उरण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करावी. तसेच वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली. अन्यथा आंदोलन करावे लागेल असा इशारा दिला.

उरण तालुक्यातील खोपटा कोप्रोली रस्ता पिरकोन, आवरे, दास्तान फाटा ते दिघोडा रस्ता गव्हाण फाटा ते दिघोडा रस्ता या रस्त्यांची अवस्था दयनीय झालेली आहे. त्यामुळे अपघातांची संख्या वाढत आहे. तसेच रस्त्यावर उभे असलेल्या कंटेनरमुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते. तालुक्यातील रस्त्यांची अवस्था खोपटा कोप्रोली रस्ता खड्डेमय झालाय यामुळे वाहनधारकांना खूपच त्रास होत आहे या रस्त्यावरून अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असून सातत्याने छोटे–मोठे अपघात घडत आहेत खोपटा पुलावर असलेले खड्ड्यांमुळे वाहन चालकांचे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. खोपटा कोप्रोली रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात येते. मात्र, रस्त्याची अवस्था जैसे थे अशी आहे. खड्डेमय रस्त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. भेंडखळ पासून ते कोप्रोलीपर्यंत वाहतूक कोंडी भेडसावीत आहे. याचा फटका नियमीत प्रवास करणारे कामगार विद्यार्थी, व्यापारी वर्गाला बसत आहे. लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षेतेमुळे व प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे रस्ताची दुर्दशा झाली आहे. या रस्त्यासाठी निधी मंजूर होऊनही अजूनही रस्त्याचे काम होत नाही, याबाबत उरण पूर्व विभागामध्ये नाराजी आहे. लवकरच या रस्त्यांची कामे पूर्ण करावीत असा इशारा तालुका चिटणीस रवी घरत यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंतांना दिला आहे यावेळी अभियंता नरेश पवार, नरेश सोनवणे आधिकारी वर्ग उपस्थित होते. यावेळी मध्यवर्ती कमिटीचे सदस्य नरेश घरत ॲड सागर कडू, सरचिटणीस यशवंत ठाकूर, संदीप गावंड, सुरेश पाटील विजय कडू, शंकर भोईर, वैशाली पाटील, नयना पाटील तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते

# अनधिकृत कंटेनर यार्डमुळे उरणकर त्रस्त

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील बेकायदेशीर कंटेनर यार्ड व अनधिकृत पार्किंगचा कहर दिवसेंदिवस वाढत आहे. उरणकरांचे जीवन प्रदूषण, वाहतूक कोंडी व कंटेनर ताफ्यांच्या तडाख्यात अक्षरशः नरकयातनामय झाले आहे. एकेकाळी हिरवागार व भाताच्या दाण्यांनी भरलेला हा तालुका आज औद्योगिकरणाच्या नावाखाली धुरकट, आणि धोकादायक परिसरात बदलला आहे.

दिवसरात्र धावणाऱ्या कंटेनर व ट्रक ताफ्यांमुळे ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन उध्वस्त झाले आहे. रुग्णवाहिका वेळेत रुग्णालयात पोहोचत नाही, शाळकरी मुलं कोंडीत अडकून वेळेत पोचत नाहीत, नोकरदार वर्गाला प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागतो. अशा भयावह परिस्थितीत शासन व प्रशासन ठार गप्प बसले आहे.

पत्रकार संघाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, या गंभीर प्रश्नावर शासनाने तातडीने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. वाहतूक कोंडीवर तोडगा म्हणून रस्त्यावरील एक लाईन कायमस्वरूपी छोट्या वाहनांसाठी मोकळी ठेवण्यात यावी. ही मागणी ही फक्त नागरिकांची अपेक्षा नसून, आता जगण्याचा प्रश्न झाला आहे.

अनधिकृत कंटेनर यार्ड व बेकायदेशीर पार्किंगवर तात्काळ कारवाई करा, छोट्या वाहनांसाठी स्वतंत्र लाईन कायमस्वरूपी मोकळी ठेवा, वाहतूक कोंडी व प्रदूषणाच्या विळख्यातून तातडीने मुक्त करा. त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी शासन प्रशासनाचीच राहील. उरणकरांच्या जिवाशी केलेला खेळ आता सहन केला जाणार नाही असे बोलले जात आहे.

## ‘शिवा संघटने’कडून जनहित याचिका

**उरण** : मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात सामावून घेण्याबाबत महाराष्ट्र शासनाने २ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेला शासन निर्णय तात्काळ रद्द करावा, तसेच हैदराबाद गॅझेटनुसार जात नोंदींमध्ये होत असलेला फेरफार थांबवावा, या मागणीसाठी शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेतर्फे उच्च न्यायालयात जनहित याचिका ९ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाली आहे. प्रा. मनोहर धोंडे यांनी कायदेतज्ज्ञ ॲड. सतीश तळेकर यांच्या मार्फत दाखल केली आहे. ओबीसी समाजाच्या हक्कांवर गदा आणणारे व मूळ ओबीसींना अन्याय करणारे निर्णय कुठल्याही परिस्थितीत मान्य होऊ शकत नाहीत.

# शेकाप तर्फे जिल्हास्तरिय वक्तृत्व स्पर्धा

**मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५**

| रायगड प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांच्याजयंतीनिमित्त शनिवारी (दि.१३) अलिबागमध्ये शेतकरी भवन येथे जिल्हास्तरिय खुल्या वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले आहे. विजेत्यांना मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ देऊन गौरविण्यात येणार आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या स्व. मीनाक्षी पाटील यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व क्रिडा क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. विधानसभेत आमदारपासून ते राज्यमंत्री म्हणून त्यांनी सक्षमपणे भूमिका बजावली आहे. उत्तम वक्त्या तसेच संसदपटू म्हणून त्यांची ख्याती होती. यासाठी शेकापच्या वतीने त्यांच्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरिय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी विद्यार्थी संघटना अलिबाग, पुरोगामी युवक संघटना अलिबाग, शेकाप सांस्कृतिक सेल अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ वक्तृत्व स्पर्धा १३ सप्टेंबरला होणार आहे. स्थानिक प्रश्नांचे राज्यस्तरिय नेतृत्व मीनाक्षीताई पाटील, येवा कोकण आपलोच असा–पण विकासाचं काय? सावित्रीच्या लेकी चालल्या पुढे, संघर्षातून आत्मनिर्भरतेकडे, नफरत के बाजार मे मोहोब्बत बेच रहा हूं मै. सकारात्मक बदलाची सुरुवात– व्यक्तीच्या प्रयत्नातून समाजापर्यंत. रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग. या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला रोख ११ हजार रुपये व चषक, व्दीतीय क्रमांकाला रोख आठ हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकाला रोख पाच हजार रुपये व चषक, चतुर्थ क्रमांकाला रोख तीन हजार रुपये व चषक तसेच पंचम क्रमांकाला रोख दोन हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच प्रत्येकी एक हजार रुपये व चषक अशी पाच उत्तेजनार्थ बक्षीसे दिली जाणार आहेत. या स्पर्धेसाठी ४५ स्पर्धकांनी नोंदणी केली आहे. त्याची तयारी अंतिम टप्प्यात असून शनिवारी (दि.१३) स्व. मीनाक्षी पाटील यांची जयंती आहे. या जयंतीच्या निमित्ताने अलिबागमध्ये वक्तृत्व स्पर्धा होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.


## आठवा स्मृतिदिन



**कै. पुंडलिक वेटू थळे**
मृत्यू दि. १२/०९/२०१७

कष्टातून संसार फुलविला
उरली नाही साथ आम्हाला
आठवण येते क्षणा-क्षणाला
आज ही तुमची वाट पाहतो
यावे पुन्हा जन्माला

शोकाकुल
मुलगा : श्रीकांत पुंडलिक थळे, सुन : श्रृती श्रीकांत थळे, नात : श्रद्धा श्रीकांत थळे, नातू : श्रेयस श्रीकांत थळे व समस्त थळे परिवार
मु.पो. मोठे शहापूर, ता. अलिबाग, जि. रायगड


**पुरुषांपेक्षा महिलांची संख्या जास्त | रायगड जिल्ह्यातील ४४७ नागरिकांमध्ये जनजागृती**

# आत्महत्या करणाऱ्यांना समुपदेशनाचा आधार

| प्रमोद जाधव |
| रायगड जिल्हा |

मोबाईलच्या जगतामध्ये नागरिक एकमेकांपासून जवळ आला असला, तरीही एकमेकांचे संवाद कमी झाले आहे. विभक्त कुटुंब पध्दतीमुळे व्यक्त होण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या कारणामुळे नैराश्य निर्माण होण्याचे प्रमाण वाढत आहे. नैराश्यपोटी आत्महत्या करणाऱ्यांना समुपदेशनाचा आधार मिळाला आहे. २०२२ पासून आतापर्यंत ४४७ नागरिकांमध्ये जनजागृती करण्यास आरोग्य विभागाला यश आले आहे.

शारिरीक आजार हे सहज दिसून येणारे असतात. त्यावर उपचारही वेळेवर करता येतो. परंतु मानसिक आजार दिसून येत नाही. नैराश्याने अनेक जण जीवन संपविण्याचा प्रयत्न करतात. आत्महत्या हा एक क्षणाचा निर्णय आहे. मात्र त्यामुळे कुटुंबाची खुप मोठी हानी होते. मानसिक आजारावर उपचार म्हणजे आपण बोलके होणे आवश्यक आहे. व्यक्त होणे गरजेचे आहे. बदलत्या राहणीमानामुळे मनमोकळेपणाने संवाद करणे थांबले आहे. त्यामुळे मानसिक तणावातून आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे. नैराश्य हा मानसिक आजार आहे. मनाने खचून जाऊन अनेकजण आत्महत्या करणाऱ्यावर भर देतात. त्यात काहीजण फॉरेटसह फिनेल सारखे विषारी पदार्थ खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये १८ ते ४० वयोगटातील मंडळीची संख्या अधिक असते.

जिल्ह्यात २०२२ २०२५ या कालावधीत ४४७ जणांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. पुरुषांपेक्षा महिलांच्या संख्येत प्रचंड वाढ असल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे. जिल्हा रुग्णालयातील मानसोपचार तज्ञांमार्फत योग्य उपचार, आणि समुपदेशन करण्यात आले. त्यामुळे ४४७ लोकांचे प्राण वाचविण्यास त्यांना यश आले. त्यामध्ये १९५ पुरुष व २५२ महिलांचा समावेश आहे.

## जिल्ह्यात प्रतिबंधक सप्ताह सुरु

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन व आत्महत्या प्रतिबंध सप्ताह १० ते १६ सप्टेंबर या कालावधीत सुरू केला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार भारतात १५ ते २९ या वयोगटातील किशोरवयीन मुले आणि तरुणांमध्ये आत्महत्येने मृत्यू होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. म्हणूनच या वयोगटातील लोकांना मानसिक आरोग्य विषयक जनजागृती करण्यासाठी पुढील आठवड्यात अलिबाग शहरातील महाविद्यालयात चर्चासत्र व व्याख्याने घेण्यात येणार आहेत. चिंता, ताणतणाव व नैराश्य हे मानसिक आजार या विषयांवर चर्चा होणार आहे. आत्महत्या न करण्याचा संदेश वेगवेगळ्या फलकांमार्फत पोहचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जिल्हा रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागात आलेल्या रुग्णांना माहितीपर पत्रके वाटून मंगळवारी (दि.१६) सप्ताहाची सांगता होणार आहे. जिल्हा रूग्णालयातील ओपीडी नंबर २२ येथे मानसोपचार विभागात समुपदेशन व मानसोपचार सुविधा उपलब्ध आहेत या बाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## प्रोत्साहनपर बक्षिस

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण पंचायत समितीच्या निवृत्त कर्मचारी साधना काशिनाथ म्हात्रे यांनी आपला पुत्र विराज म्हात्रे याच्या स्मरणार्थ चिरनेर प्राथमिक केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांना अभ्यासात प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांच्या गुणांचा सत्कार करण्यासाठी एक लाख रुपयांचे फिक्स डिपॉझिट ठेवण्यात आहे. यात वार्षिक परीक्षेत गुणाानुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच शाळेतील अन्य विद्यार्थ्यांच्या बक्षिसांसाठी ही रक्कम वापरण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. दरवर्षी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करणे शक्य होणार आहे, ज्यामुळे त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळेल. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी एक प्रेरणादायी आदर्शही निर्माण झाला आहे.


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२
- नागावमधील होम स्टे/वाडी सांभाळण्यासाठी पर्मनंट जोडपे हवे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- ९८२०६०९४५०.
- Teachers Required : Full Time/Part Time Teachers are to be appointed Subjects : Science, Maths, English. Std : 8th,9th. Job location : Alibag. Attractive Salary. Apply : shikshaknokri@gmail.com
- ''जन्नावर हॉस्पीटल'' अलिबाग-मध्ये कामसाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# चांगली टक्कर दिली

उपराष्ट्रपतीपदी अपेक्षेप्रमाणे भाजपचे उमेदवार राधाकृष्णन यांची निवड झाली आहे. मात्र ती होताना काही मते फुटली. ती नेमकी कोणाची याबाबत चर्चा चालू आहे. ही मते इंडिया आघाडीची असल्याचे भाजपकडून पसरवले जात आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि ठाकरे सेना यांची काही मते फुटली असे सूचित केले जात आहे. मात्र याला काही अर्थ नाही. मतदान गुप्त होते. त्यामुळे नेमके कोणाचे मत कोणाला गेले हे कळणे कठीण आहे. इंडिया आघाडीने भाजपचीच मते फुटल्याचा दावा केला आहे. राजकारणाचा भाग म्हणूनच त्याकडे पाहायला हवे. पण इंडिया आघाडीचे उमेदवार सुदर्शन रेड्डी यांना ३२० च्या आसपास मते मिळतील असा अंदाज असताना ३००च मते मिळाली. म्हणजे सुमारे २० मते कमी झाली ही वस्तुस्थिती आहे. एकूण ७६७ पैकी १५ मते बाद ठरली. वास्तविक भाजप आघाडी व इंडिया या दोघांनीही मतदान कसे करावे यासाठी सर्व खासदारांना प्रशिक्षण दिले होते. आदल्या दिवशी चाचणी मतदानही झाले होते. तरीही १५ मते बाद असतील तर हा ठरवून केलेलाच प्रकार असावा. यात काही भाजप आघाडीचेही खासदार आहेत असे म्हणतात. भाजपला राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत तसेच काश्मीरसारख्या मुद्द्यांवर मदत करणारे बिजू जनता दल तसेच तेलंगणातील चंद्रशेखर राव यांचा पक्ष इत्यादींनी या निवडणुकीत तटस्थ भूमिका घेण्याचे आधीच जाहीर केले होते. तमिळनाडूतील अण्णा द्रमुकसारख्या पक्षांनी भाजपशी आता फारकत घेतली आहे. याच रीतीने उत्तर प्रदेशातील सुहेलदेव पार्टी किंवा अनुप्रिया पटेल यांचा पक्ष हेदेखील भाजपवर नाराज आहेत. त्यामुळे त्यांच्यापैकी काहींनी आपली मते बाद करून भाजपला इशारा दिला असण्याची भरपूर शक्यता आहे. इंडिया आघाडीत नसलेल्या पण रेड्डींना पाठिंबा देणाऱ्या आम आदमी पक्षाचे काही खासदार फुटले की काय अशी शंका आहे. त्यांच्या स्वाती मालीवाल यांनी तर उघड बंडखोरी केलेली आहे. झारखंडमधील काही खासदारांबाबतही साशंकता व्यक्त होत आहे. ते काहीही असले तरी इंडिया आघाडीने या निवडणुकीत भाजपला जोरदार टक्कर दिली यात शंका नाही.

## अधिक समन्वय हवा

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहातील खासदारांना मताचा अधिकार असतो. यापूर्वी जगदीप धनखड जेव्हा उपराष्ट्रपती झाले होते तेव्हा त्यांचा ३४६ मतांनी विजय झाला होता. हा फरक आता केवळ १५२ झाला आहे. तेव्हा विरोधकांच्या उमेदवार मार्गारेट अल्वा यांना १८२ मते होती. ती आता ३०० झाली आहेत. लोकसभेत विरोधकांनी आपले संख्याबळ वाढवल्याचा हा परिणाम आहे. पण यापूर्वी भाजपवाले सातत्याने विरोधकांची मते फोडत आले होते. राज्यसभेच्या खासदारांच्या निवडणुकीत विविध राज्यांमध्ये ते दिसले आहे. महाराष्ट्रात तर त्यावरूनच रामायण झाले व शिवसेनेत फूट पडून सत्ताबदल झाला. पण आता यावेळी इंडिया आघाडी भाजपच्या डावपेचांना पुरून उरली. राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे राज्यपाल असल्याने राज्यातील विरोधकांनीही त्यांनाच मतदान करावे असे अजब आवाहन केले होते. म्हणजे राधाकृष्णन यांच्या स्वतःच्या तमिळनाडू राज्यातील द्रमुक व अण्णा द्रमुकवालेसुद्धा त्यांना मतदान करणार नाहीत. आणि मराठी लोकांनी मात्र हे मारुन मुटकून लादलेले नाते निभवावे अशी देवेंद्रांची अपेक्षा होती. ती पूर्ण होणार नव्हतीच. पण मते फोडण्याचा तो एक डाव होता. तो फसला. मोदी व भाजप यांनी कितीही विजयाचे नारे दिले तरी या निमित्ताने संसदेतील एकूण खासदारांच्या सुमारे ४० टक्के खासदार भाजपच्या स्पष्टपणे विरोधात आहेत हेच ठळकपणे अधोरेखित झाले. संसदेला गृहित धरून जी विधेयके रेटण्याचा भाजप नेहमी प्रयत्न करीत असतो ते लोकशाहीचा खून करणारे असते हे या आकडेवारीवरून दिसते. अर्थात, नरेंद्र मोदी व भाजपला सत्तेची इतकी धुंदी चढलेली आहे की ते या आकड्यांची पर्वा करणार नाहीत ही गोष्ट वेगळी. विरोधकांनी थोडा अधिक समन्वय केला, सर्व पक्षांशी अधिक विचारविनिमय केला तर त्यांची ताकद आणखी वाढू शकते. बिजू जनता दल किंवा बीआरएस यांना खरे तर त्यांच्या राज्यात भाजपचा धोका अधिक आहे. तरीही ते काँग्रेसला अजूनही शत्रू मानत असतील तर त्यांची समजूत काढावी लागेल.

## पदाची प्रतिष्ठा राखा

उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिध्द अध्यक्ष असतात. तेथे भाजपला अजूनही हुकुमी बहुमत नाही. त्यामुळे तेथील कारभार चालवणे हे कसरतीचे काम असते. आधीच उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजापेक्षा राजनिष्ठ अशी भूमिका घेतली होती. मोदींना खूष करण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात हे दिसत होते. विरोधी सदस्यांना बोलून न देणे, खर्गे यांच्यासारख्या ज्येष्ठ सदस्यांचा देखील अपमान करणे, जया बच्चन यांचे नाव प्रत्येक वेळी जया अमिताभ बच्चन असे उच्चारून त्यांची टिंगल करणे असले पोरकट ते हलकट सर्व प्रकार त्यांनी केले. त्यामुळेच विरोधकांनी त्यांच्याविरुध्द अविश्वासाचा ठरावही आणला होता. धनखड यांनी आपल्या पदाची प्रतिष्ठा मातीला मिळवली. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी त्यांनी आपले गृहराज्य राजस्थानमध्ये सतत दौरे केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची ते सतत अनावश्यक व बेफाट स्तुती करत. वास्तविक ते घटनात्मक पदावर होते व त्यांनी काही मर्यादा पाळणे आवश्यक होते. पण ते बहुदा स्वतःला घटनेच्या वर मानू लागले. त्यातूनच त्यांनी सर्वोच्च न्यायालयावरही टीका केली. न्यायालयापेक्षा लोकांची संसद श्रेष्ठ असून संसदेचे कायदे घटनाबाह्य ठरवण्याचा अधिकार न्यायालयांना नाही असे ते म्हणू लागले होते. अखेर त्यांनी राजीनामा नेमका का दिला याचा खुलासा अजूनही झालेला नाही. राजीनामा दिल्यापासून ते अज्ञातवासात गेले आहेत. मध्यंतरी त्यांना भाजपने कैद करून ठेवले आहे असा आरोप विरोधकांनी केला होता. नवे उपराष्ट्रपती राधाकृष्णन नवीन वाद निर्माण करणार नाहीत अशी अपेक्षा आहे. ते तरुण वयापासून संघाचे स्वयंसेवक होते व दोन वेळा तमिळनाडूतील कोईमतूरमधून लोकसभेवर निवडून गेले आहेत. महाराष्ट्रात असताना त्यांनी भगतसिंग कोश्यारी यांच्यासारखा वाह्यातपणा तरी किमान केला नव्हता. मात्र आपली उमेदवारी घोषित झाल्यावर त्यांनी माननीय मोदीजी, माननीय शाहजी असे शब्द वापरून जे आभार मानले होते त्यावरून ते लाचारीमध्ये कमी पडणार नाहीत याची चुणूक मिळालेली आहे. धनखड हे हुशार वकील होते. पण ते भाजपसाठी जास्तच स्मार्ट ठरले. राधाकृष्णन स्वयंसेवक असल्यानने आज्ञेच्या बाहेर जाणार नाहीत. मोदी सरकारला सध्या असलेच लोक हवे आहेत. राज्यसभेचे काम काज चालवताना मात्र त्यांची चांगलीच कसोटी लागणार आहे. विरोधकांना ते किमान बोलू देतील अशी अपेक्षा.

**विचार**

# संबंध नव्या वळणावर; परंतु सावध!

***डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफनंतर भारताविषयी चीनला आपुलकी वाटू लागली आहे. चीनला शह देण्यासाठी अमेरिका भारताला जवळ करत होती. आता अमेरिका आणि भारतातील संबंध बिघडत असल्याने चीनने मैत्रीचा हात पुढे केला असला, तरी पूर्वानुभव पाहता भारताला सावध पवित्रा घ्यावा लागेल. नरेंद्र मोदी यांनी शांघाय सहकार्य परिषदेप्रसंगी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या घेतलेल्या भेटीतून ते दिसले.***




**प्रा. अशोक ढगे**

चीनच्या तियानजिन शहरात दोन महासत्तांच्या नेत्यांची बैठक झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली. मोदी यांनी चीनच्या दौऱ्याचे निमंत्रण आणि द्विपक्षीय बैठकीबद्दल जिनपिंग यांचे आभार मानले. आम्ही परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेच्या आधारावर परस्परसंबंध पुढे नेण्यास वचनबद्ध आहोत, हे त्यांचे उद्गार या दृष्टीने महत्वाचे ठरले. त्याच वेळी, चिनी अध्यक्षांनी द्विपक्षीय बैठकीदरम्यान परस्पर संबंध मजबूत करण्यावर भर दिला. ते म्हणाले, जग बदलाकडे वाटचाल करत आहे. अशा परिस्थितीत आशियातील दोन मोठ्या शक्तींनी मित्र बनणे, चांगले शेजारी असणे आणि ड्रॅगन-हत्ती एकत्र येणे खूप महत्वाचे आहे. भारताला हत्तीची उपमा देऊन जिनपिंग यांनी एक प्रकारे भारताची ताकद अधोरेखित केली. एकीकडे मोदी यांचे चीनमध्ये अभूतपूर्व स्वागत होत असताना दुसरीकडे मोदी आणि जिनपिंग यांच्या भेटीत पूर्वीसारखा जिव्हाळा नव्हता, औपचारिकता होती. हस्तांदोलनात मित्रत्त्वाची प्रचिती नव्हती, तर दोन देशांमधील नेते भेटतात, त्या वेळी राजशिष्टाचार म्हणून पाडावी लागणारी औपचारिकता पहायला मिळाली. पूर्वीसारखी मोदी आणि जिनपिंग यांची गळाभेट झाली नाही. त्याला गलवान खोऱ्यासह अन्य ठिकाणी चीनने केलेली आगळीक कारणीभूत आहे. असे असले, तरी दोन्ही देशांमधील व्यापार थांबला नव्हता. वाढतच होता. मध्यंतरी काही गोष्टींवर निर्बंध आणून कोंडी करण्याचे प्रयत्न झाले. त्यामुळे होणारे नुकसान आणि परस्पर अवलंबित्व लक्षात आल्याने वाटाघाटी सुरू झाल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्क वाढवल्यानंतर या प्रयत्नांना गती आली.

मोदी आणि जिनपिंग यांनी द्विपक्षीय चर्चेदरम्यान संबंध मजबूत करण्यावर भर दिला. तथापि, दोन्ही राष्ट्रप्रमुख भेटले, तेव्हा हस्तांदोलन करून एकमेकांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी शी जिनपिंग यांची गळाभेट घेतली नाही. अशा परिस्थितीत, त्यांच्या संबंधांमधला उबदारपणा संपला आहे का, असे प्रश्न उपस्थित झाले. हे प्रश्न उपस्थित होण्याला अनेक कारणे आहेत. अलिकडच्या काळात चीन आणि भारत यांच्यातील संबंध सुधारत असले, तरी भारत-पाकिस्तान संघर्षात ड्रॅगनने शेजारी देशाला पाठिंबा दिला होता, हे विसरता कामा नये. मोदी यांना चीनची शैली समजली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये चीनशी संबंध सामान्य झाले आहेत, हे मोदी विसरले नसतील. २०२० मध्ये पूर्व लडाख सीमेवरील तणावानंतर दोन्ही राष्ट्रांमधील संघर्ष वाढला. विमानांची थेट वाहतूक थांबवण्यासह अनेक कठोर निर्णय घेण्यात आले. तथापि, आता परिस्थिती बदलताना दिसते आहे. विशेषतः २०२४ च्या ब्रिक्स शिखर परिषदेत मोदी आणि जिनपिंग यांच्यात सकारात्मक बैठक झाली. या संबंधांमध्ये पुन्हा सुधारणा होण्याची आशा निर्माण झाली. त्यामुळेच सात वर्षांनी पंतप्रधान मोदी चीनला गेले. चीनलाही मोदी यांच्या या भेटीचे महत्त्व समजले आहे. मोदी आणि जिनपिंग यांच्यातील चर्चाही महत्त्वाची होती. ट्रम्प यांच्या टॅरिफ हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ती झाली. त्याचा परिणाम जगभरातील जवळजवळ सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांवर झाला आहे.

जिनपिंग यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीबद्दल मोदी यांनी सांगितले की, गेल्या वर्षी कझानमध्ये आमची खूप अर्थपूर्ण चर्चा झाली. आमच्या संबंधांना सकारात्मक दिशा मिळाली. सीमेवरील सैन्य मागे घेतल्यानंतर शांतता आणि स्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सीमा व्यवस्थापनाबाबत आमच्या विशेष प्रतिनिधींमध्ये एक करार झाला आहे. कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाली आहे. दोन्ही देशांमधील थेट उड्डाणेदेखील पुन्हा सुरू होत आहेत. दोन्ही देशांच्या २.८ अब्ज लोकांचे हित आमच्या सहकार्याशी जोडलेले आहे. यामुळे संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा मार्गही मोकळा होईल. परस्पर विश्वास, आदर आणि संवेदनशीलतेच्या आधारे संबंध पुढे नेण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. या प्रसंगी बोलताना चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला. दोन्ही नेत्यांनी एकमेकांना प्रतिस्पर्धी म्हणून नव्हे, तर भागीदार म्हणून पाहण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि परस्पर आदर आणि सहकार्याद्वारे विश्वास निर्माण करण्याच्या गरजेवर सहमती दर्शवली. जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला. हा करार नेहरू यांच्या काळात झाला होता. नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणावर, त्यातही चीनबाबतच्या धोरणावर मोदी सातत्याने टीका करत आहेत. त्यांच्यासमोरच जिनपिंग यांनी पंचशील कराराचा उल्लेख केला हा काव्यगत न्याय झाला. पंचशील करार हा शांततापूर्ण मार्गाने जगण्यासाठी पाच प्रमुख कल्पनांचा संच आहे. ही तत्त्वे मूलतः १९५४ मध्ये दोन्ही देशांमधील कराराचा भाग होती आणि परस्पर आदर आणि एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्यावर केंद्रित आहेत.

श्री. जिनपिंग पंचशील कराराचा उल्लेख भारत-चीन संबंधांसाठी मार्गदर्शक चौकट म्हणून करत असताना मोदी यांनी दोन्ही देशांमधील स्थिरता आणि दीर्घकालीन सहकार्याचा उल्लेख केला. त्यांनी परस्पर आदर, परस्परहित आणि परस्पर संवेदनशीलतेचे महत्त्व सांगितले. मोदी यांचा चीन दौरा दोन दिवसांच्या शांघाय सहकार्य परिषदेनिमित्ताने होता. या परिषदेत रशिया, मध्य आशिया, दक्षिण आशिया, आग्नेय आशिया आणि मध्य पूर्वेतील नेते एकत्र आले होते. या शिखर परिषदेकडे जागतिक दक्षिणेतील एकतेचे प्रदर्शन म्हणून पाहिले जात आहे. त्यात सदस्य राष्ट्रे प्रादेशिक सुरक्षा, आर्थिक सहकार्य आणि बहुपक्षीय संवादावर लक्ष केंद्रित करत आहेत. जिनपिंग यांच्या मनोगतामुळे दशकांपूर्वीच्या चौकटीकडे लक्ष वेधले गेले आहे. या चौकटीने एके काळी नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांमधील शांततापूर्ण संबंधांचे स्वप्न पाहिले होते. पंचशील, किंवा शांततापूर्ण सहअस्तित्वाची पाच तत्वे ही परस्परआदर आणि विनाहस्तक्षेपावर आधारित आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी एक चौकट आहे. २९ एप्रिल १९५४ रोजी चीन आणि भारताच्या तिबेट प्रदेशात स्वाक्षरी केलेल्या व्यापार आणि वाणिज्य करारात ते प्रथम औपचारिकपणे सादर करण्यात आले. एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौम त्वाचा आदर, दोन्ही बाजूंनी आक्रमकता न दाखवणे, एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, समानता आणि परस्पर लाभ, शांततापूर्ण सहअस्तित्व यांचा त्यात उल्लेख होता.

जून १९५४ मध्ये पंडित नेहरू आणि चीनचे पंतप्रधान झोउ एनलाई यांनी पंचशीलची व्याप्ती वाढवणारे संयुक्त निवेदन जारी केले. त्यानंतर ते केवळ भारत-चीन संबंधांचा आधार म्हणूनच नव्हे, तर जागतिक शांतता आणि राजनयिकतेचे एक मॉडेल म्हणूनदेखील प्रस्तावित करण्यात आले. या कराराचा उल्लेख जिनपिंग यांनी केला. दोन्ही नेत्यांमध्ये दहशतवाद, सीमा तणावात शांतता प्रस्थापित करणे आणि व्यापार यासह अनेक जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाली. दहशतवादाच्या मुद्दयावर मोदी यांनी चीनकडून पाठिंबा मागितला. त्यावर चीनने त्यांना पाठिंबा देण्याचे मान्य केले. यानंतर मोदी म्हणाले, की सीमेवर शांतता आणि सौहार्द राखणे हे संबंधांच्या एकूण विकासासाठी विम्यासारखे आहे. सीमेवरील परिस्थिती कोणत्या ना कोणत्या प्रकारे एकूण संबंधांवर परिणाम करेल. मोदी आणि शी यांनी भारत आणि चीनमधील मतभेद वादात बदलू देऊ नयेत, अशी भावना व्यक्त केली. जिनपिंग यांनी द्विपक्षीय संबंध आणखी सुधारण्यासाठी चार सूचना केल्या.

भारत-चीन संबंध दोन्ही देशांच्या २.८ अब्ज लोकांना लाभदायक ठरू शकतात यावर एकमत झाले. मोदी आणि जिनपिंग यांनी अनेक जागतिक समस्या आणि चालू आव्हानांवरही चर्चा केली. शुल्कांवर चर्चा करताना दोन्ही नेत्यांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक परिस्थितीवर चिंतन केले. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडी अनेक आव्हाने निर्माण करत आहेत. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांमध्ये सामंजस्य कसे विकसित करावे आणि या बदलत्या आव्हानांमध्ये परस्पर संबंध कसे पुढे नेऊ नयेत यावरही दोन्ही नेत्यांनी विचारविनिमय केला. भारत आणि चीनमधील व्यापारी भागीदारी जगात सर्वाधिक आहे. असे असले, तरी पाकिस्तान हा चीनचा व्यूहात्मक भागीदार आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत भारताच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन नंतर सीमेत घुसखोरी करण्याची त्याची पूर्वीची मानसिकता लक्षात घेऊन 'हिंदी चिनी भाई भाई' या घोषणेला किती महत्त्व द्यायचे, हे आपल्याला ठरवावे लागेल. त्याची जाणीव असल्यानेच मोदी यांनी गळाभेट टाळली असावी.

**चर्चा आजची**

# स्वदेशी शिक्षण क्रांतिकारक ठरेल

**सुयोग आंग्रे**

आजकाल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर ज्येष्ठ नागरिक देशवासियांना देशी वस्तूंचा अवलंब करण्यास उद्युक्त करीत आहेत. यासाठी, जीएसटी सुधारली गेली आहे आणि काही धोरणे बदलली गेली आहेत, जेणेकरून भारतीय नागरिकांनी त्यांच्या देशाच्या वस्तूंना प्राधान्य द्यावे, परंतु या 'स्वदेशी राग' मध्ये वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा इतर विषयांसारख्या शिक्षणाच्या क्षेत्रात स्वदेशी असलेले महत्त्व, वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा इतर विषयांच्या शिक्षणासाठी कोठेही उभे केले जात नाही. हे खरे आहे की स्वातंत्र्यानंतरही मुले परदेशात अभ्यास करण्यासाठी जात असत, परंतु त्यानंतर आमच्याकडे विद्यापीठांची संख्या नव्हती. सध्या आपल्याकडे सुमारे १००० विद्यापीठे आणि हजारो खासगी आणि सरकारी महाविद्यालये आहेत, तेव्हा परदेशात शिक्षणासाठी का जावे लागते याचा शोध घेणे गरजेचे आहे.

यामागील मुख्य कारण म्हणजे आज बहुतेक राजकारणी, नोकरशाही आणि विद्यापीठांचे प्राध्यापक, जे थोडे श्रीमंत आहेत, त्यांनी आपल्या मुलांना परदेशात पाठविण्याचा सोपा पर्याय निवडला आहे. आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की गेल्या पाच वर्षांत परदेशात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट झाली आहे. एका अंदाजानुसार, सुमारे १.५ दशलक्ष विद्यार्थी परदेशात शिकत आहेत, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमधील सर्वाधिक. युरोप, सिंगापूर आणि इतर देशांनीही परदेशात अभ्यास करण्याची भारतीय विद्यार्थ्यांच्या इच्छेनुसार विविध मोह धोरणे स्वीकारली आहेत. एकीकडे, देशातील तरुण वैद्यकीय अभ्यासासाठी भटकत आहेत, दुसरीकडे कोट्यावधी गावे आणि शहरे चांगले डॉक्टर शोधत आहेत. भारतीय विद्यार्थी ९० हून अधिक देशांमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. दरम्यान, आयआयटीची संख्या २३ पर्यंत वाढली आहे, परंतु सरकारी आकडेवारीवरून असे सूचित होते की त्यातील सुमारे ५० टक्के रिक्त आहेत आणि शिक्षकांच्या कमतरतेमुळे या संस्था तात्पुरत्या शिक्षकांवर अवलंबून आहेत. यामुळे, शिक्षण, अभ्यासक्रम आणि संशोधन कमी झाले आहे, ज्यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशात जाण्यास भाग पाडले जात आहे.

विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता, या सर्व देशांनी व्हिसा आणि विद्यापीठाच्या फी जवळजवळ दुप्पट केली आहे. प्रति विद्यार्थ्यांची किंमत एक ते दोन कोटी रुपयांपेक्षा कमी नसते. परदेशात अभ्यास करणे इतके सोपे आहे का? ८० टक्के लोकांना रेशन गहू आणि तांदूळ वर जगणे शक्य आहे का, त्यांना परदेशात जाणे शक्य आहे काय? होय, त्या नोकरशाही आणि उच्च पदांवर असलेल्या लोकांसाठी हे शक्य आहे, ज्यांना चांगला पगार आहे. ते आपल्या मुलांना परदेशात शिकण्यास प्रोत्साहित करतात, तर देशातील शैक्षणिक संस्था सुधारण्याच्या दिशेने कोणतीही ठोस पावले उचलत नाहीत. जेव्हा जेव्हा शिक्षक आणि शिक्षण सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातात तेव्हा काही शिक्षकांना सर्वात जास्त विरोध आहे, ज्यांना वर्ग घेऊ इच्छित नाही, किंवा मुलांच्या अभिप्रायावर किंवा प्राचार्यांच्या वार्षिक मूल्यांकनावर विश्वास ठेवला नाही. या सर्व कारणांमुळे आपली विद्यापीठे जागतिक क्रमवारीत पडत आहेत. मागील वर्षांमध्ये, या आव्हानांशी झगडत असताना मुले आत्महत्येच्या दिशेने वाटचाल करत आहेत. आयआयटी, आयआयएम सारख्या संस्थांमध्ये आत्महत्येच्या घटना हृदयविकाराच्या आहेत. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयातही पोहोचले आहे. यासाठी एक समिती देखील तयार केली गेली आहे, परंतु केवळ समिती तयार करून ही समस्या सोडविली जाईल? भारतातही अंमलबजावणी करता येण्याचे सरकार असे धोरण बनवू शकत नाही? सध्याच्या केंद्र सरकारने भारतीय भाषांच्या बाजूने चांगले काम केले आहे, परंतु संशोधन आणि इतर नवीन वैज्ञानिक बाबींवर अपेक्षित परिणाम अद्याप बाकी आहेत. जगातील सर्वात लहान लोकसंख्या असलेल्या देशाचे हेच चांगले भविष्य आहे आणि संपूर्ण जग त्यांच्या कठोर परिश्रमांवर विश्वास ठेवते. हे तरुण जेव्हा त्यांना योग्य दिशा मिळेल तेव्हाच बदल आणतील. यासाठी, आम्हाला शिक्षणामध्ये स्वदेशीचे व्रत देखील घ्यावे लागेल. शिक्षण हे जग आणि समाजातील बदलांचे सर्वात मोठे शस्त्र आहे. आपल्याला अशी पावले उचलण्याची गरज आहे जिथे धर्म, जात, गोत्र आणि प्रदेश, गुणवत्ता आणि गुणवत्ता प्राधान्य विसरणे आवश्यक आहे. नोबेल पुरस्कार विजेते वेंकट राम कृष्ण यांच्या वक्तव्याची आठवण आहे की संशोधन आणि शिक्षणाच्या दृष्टीने अमेरिकन विद्यापीठांमध्ये जाती किंवा धर्म नाही, किंवा आपण कोठून आला आहात. ते फक्त आपले ध्येय काय आहे ते पाहतात. या कारणास्तव, त्याने गेल्या २०० वर्षांपासून जगातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांमध्ये अव्वल स्थान मिळविले आहे. जर आपण शिक्षणात क्रांतिकारक सुधारणाकडे वाटचाल केली तर प्रत्येक क्षेत्रात स्वदेशीचे महत्त्व वाढेल.

**लोकसंसद**

## डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ कॉम्रेड सीताराम येचुरी

डाव्या विचासरणीचा बुलंद आवाज असे ज्यांचे वर्णन केले जाते ते कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार कॉम्रेड सीताराम येचुरी यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी १२ सप्टेंबर २०२४ रोजी सीताराम येचुरी यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ कायमची थंडावली. १२ ऑगस्ट १९५२ रोजी जन्मलेले सीताराम येचुरी हे भारतीय राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. विद्यार्थी दशेतच ते कम्युनिस्ट पक्षाकडे आकर्षित झाले. आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण हैद्राबाद येथे पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी त्यांनी दिल्ली गाठली. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्राची पदवी मिळवली. तिथेच ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियात सक्रिय झाले. या संघटनेचे ते तीन वेळा महासचिव बनले. पुढे त्यांना या संघटनेचे अध्यक्षपद मिळाले. त्यानंतर ते कम्युनिस्ट पक्षात सक्रिय झाले. कम्युनिस्ट पक्षात त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी अनेक आंदोलने केली. त्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल सरकारला घ्यावी लागली. त्यांच्या या कार्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने त्यांना केंद्रीय सचिव पदावर काम करण्याची संधी दिली. १९९२ साली चेन्नई येथे झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या १४ व्या काँग्रेसमध्ये त्यांची पक्षाच्या पॉलिट ब्युरो सदस्य म्हणून निवड करण्यात आली. कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्युरो सदस्य म्हणून त्यांनी भारतात कम्युनिस्ट पक्ष वाढवण्याचे मोठे कार्य केले. गावागावात, घराघरात कम्युनिस्ट पक्ष नेण्याचे प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या या प्रयत्नांना पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या राज्यात मोठे यश मिळाले. या राज्यात कम्युनिस्ट पक्षाची सरकारे आली. संसदेतही कम्युनिस्ट पक्षाचे अनेक खासदार निवडून आले. सीताराम येचुरी हे स्वतः संसदेत निवडून गेले. संसदेतही त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडले. त्यांच्या निधनाने केवळ डाव्या विचारसरणीचीच नव्हे तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकरी यांच्या हितासाठी आयुष्यभर झटणारा एक विचारवंत, तत्वनिष्ठ नेता देशाने गमवला आहे. त्यांची पक्षनिष्ठा आणि पक्षाच्या विचाराशी असलेली बांधिलकी हा राजकारणाचा क्षेत्रात आदर्श ठरणार आहे. राजकीय भुमिकांबाबत मतभिन्नता असूनही मनभेद असू नयेत अशी निखळ मानवतावादी वृत्ती जपणारे ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड सीताराम येचुरी यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

**दिनविशेष**

# साहित्य संशोधक विनायक लक्ष्मण भावे



विनायक लक्ष्मण भावे यांचा आज स्मृतिदिन. विनायक भावे हे मराठी साहित्य संशोधन आणि ग्रंथाकार होते. त्यांचा जन्म ६ नोव्हेंबर १८७१ रोजी कुलाबा (विद्यमान रायगड) जिल्ह्यातील पळस्पे या गावी झाला. त्यांचे मराठी व इंग्रजी शिक्षण ठाणे येथे झाले. मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून ते बी. एस्सी. झाले. ठाणे येथे माध्यमिक शिक्षण घेत असताना काव्येतिहाससंग्रह या मासिकाचे एक संपादक जनार्दन बाळाजी मोडक हे त्यांना मुख्याध्यापक म्हणून लाभले. जुन्या ग्रंथांचा जीर्णोद्धार करणे, मराठा काव्ये, जुन्या बखरी, इतिहासविषयक लेख प्रसिद्ध करणे हे काव्येतिहाससंग्रहाचे उद्दिष्ट होते. मोडकांचा सहवास व मार्गदर्शन यामुळे भावे यांना मराठी काव्ये वाचण्याची गोडी लागली. शालेय जीवनातच ते मराठी काव्ये आणि कविचरित्रे यांविषयी निबंध लिहू लागले होते. महाविद्यालयीन जीवनात विज्ञानाचा अभ्यास करीत असतानाही महीपति, श्रीधर, मुक्तेश्वर, अमृतराय यांसारख्या प्राचीन मराठी कवींची कविता ते वाचीत असत, तसेच प्राचीन मराठी साहित्याचे संशोधन करीत असत. विनायक भावे यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी आपले सारे आयुष्य महाराष्ट्र कवी नावाच्या मासिकासाठी अर्पण केले. या मासिकाने सलग चार वर्षे रसिकांच्या मनांवर अधिराज्य गाजविताना अनेक ग्रामीण व होतकरू कविंच्या व लेखकांच्या, उजेडात न आलेल्या कवितांना व इतर कलाकृतींना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. या मासिकाने अनेक मराठी काव्ये, बखरी, व इंग्रजी अमदानीच्या पुर्वी होऊन गेलेल्या कवींच्या कवीतांना पुन्हा उजाळा देऊन या सांस्कृतिक ठेव्याचे संवर्धन करण्याची धडक मोहिम राबवली होती. हे एकीकडे सुरु असताना, दुसरीकडे त्यांचे वाचून झालेल्या ग्रंथसंपदेचे विवेचनात्मक व रसभरित विश्लेषण करणेही चालूच होते. त्यांनी इतिहास संशोधनाची नवी व प्रगल्भ दालने इतरांसमोर उघडली होती. साहित्य व इतिहासाव्यतिरिक्त निसर्गातील प्राणी, पक्षी, किटक यांवर अतिशय उपयुक्त टिपणवजा माहिती त्यांनी संग्रहित करून ठेवलेली आहे. विनायक भावे यांनी आजवर अनेक जुने अप्रकाशित लेखक व कवींच्या, काव्य-लेखनसंपत्तीचे आभ्यासपुर्ण मंथन केले. आध्यात्मिक व वृत्तालंकारादी व्याकरणाच्या जंजाळात फसलेल्या कवितांपेक्षा, त्यांनी मुक्तेश्वरांच्या व शाहिरांच्या कवितांचे, रसग्रहण करण्यात अधिक धन्यता मानली. कारण या कवितांमध्ये भक्तीरसापेक्षा, त्या कवितेच्या आशयाला व भावनेला अधिक आपलेसे केले गेले होते. 'महाराष्ट्र सारस्वत' ही तर त्यांच्या काव्यप्रेमाने गाठलेली उत्कटतेची परिसीमा मानली जाते. ह्या कधीही विसरता न येणाऱ्या दर्जेदार साहित्य विवेचकी वृत्तीने रसिकांसमोर उलगडुन दाखविले होते.

महाराष्ट्र सारस्वताच्या पहिल्या आवृत्तीचे लेखन त्यांनी महाविद्यालयात शिकत असतानाच केले होते. १८९३ मध्ये ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाची त्यांनी स्थापना केली. १८९८ मध्ये भावे यांच्या वडिलांचे निधन झाले. नंतर वडिलांच्या मिठागरात लक्ष घालून त्यांनी मिठाचा व्यापार सुरू केला व त्यात यश मिळविले. १९१८ साली ते त्या व्यापारातून निवृत्त झाले व उर्वरित आयुष्य त्यांनी सर्वस्वी विद्याव्यासंगात घालविले. महाराष्ट्र सारस्वत हाच भावे यांचा पहिला ग्रंथ होय.


त्याची पहिली आवृत्ती विष्णू गोविंद विजापूरकर संपादित 'ग्रंथमाला' या मासिकात क्रमशः प्रसिद्ध झाली (मार्च १८९८ ते मे १८९९). त्यानंतर या ग्रंथाच्या पाच आवृत्त्या निघाल्या. अशा या थोर साहित्य संशोधकाचे १२ सप्टेंबर १९२६ रोजी निधन झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ सप्टेंबर

१) श्री.गणेश महादेव आठवले
श्रुतीसांग, अलिबाग १२-०९-१९३४
२)श्रीम.सुजाता पांडुरंग दळी
अलिबाग, १२-०९-१९४५
३)श्रीम.अनघा राजस लिमये
अलिबाग, १२-०९-१९६१

## सुवर्णकण



अखिल विश्वाने सुख साठवलेले आहे अशा जीवनपद्धतीला धर्म ही संज्ञा आहे धर्म हे जड असे कर्मकांड नाही त्यामध्ये विश्वाबद्दल जिव्हाळा आहे विश्वकल्याणाची तळमळ आहे अशा तऱ्हेचा जिवंत भाव ही धर्माची कसोटी आहे.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## अंध वृद्धाचा बुडून मृत्यू

**। पालघर । प्रतिनिधी ।**

नालासोपारा (पूर्व) येथील अचोळे तलाव परिसरात कुंपण तुटलेल्या अवस्थेत उघडेच ठेवण्यात आल्यामुळे एक दुर्दैवी अपघात घडला. पायी फेरफटका मारत असताना ७० वर्षीय अंध वृद्ध पाण्यात पडले आणि त्यांचा बुडून मृत्यू झाला. भरतकुमार मिस्त्री (वय ७०, मुंबई निवासी) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते आपल्या विवाहित मुलीला भेटण्यासाठी नालासोपारा येथे आले होते. सकाळी फिरायला बाहेर पडले असता तलावाजवळील तुटक्या कुंपणामधून ते थेट पाण्यात गेले. त्यांना वाचवण्याआधीच त्यांचा मृत्यू झाला. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, तलावाच्या भोवतीचे कुंपण अनेक ठिकाणी मोडकळीस आलेले असून याबाबत अनेकदा तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य वेळी दुरुस्ती न केल्याने ही दुर्घटना घडल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिस व अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी शोधमोहीम राबवून मृतदेह बाहेर काढला.

## दारूच्या नशेत वृद्ध आईची हत्या

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील वारगाव सोरफ-सुतारवाडी येथे दारूच्या नशेत चक्क पोटच्या मुलानेच आपल्या आईची हत्या केली आहे. प्रभावती रामचंद्र सोरफ (८०) असे घटनेतील मृत आईचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत मुलगा रवींद्र रामचंद्र सोरफ (४५) याला ताब्यात घेतले आहे. आरोपी रवींद्र याला दारूचे व्यसन आहे. सोरफ कुटुंबीय वारगांव सोरफ सुतारवाडी येथील एका घरात राहत असून या घरामध्ये पाच बिऱ्हाडे आहेत. बुधवारी (दि.१०) रात्रीच्या सुमारास प्रभावती व मुलगा रवींद्र यांच्यात काही कारणावरून वाद झाले. त्यातून संतप्त झालेल्या रवींद्र याने थेट कोयत्याने आईच्या डोक्यावर आणि ठिकठिकाणी वार केले. रवींद्र याने रक्तबंबाळ स्थितीतील आईला तसेच ओढतओढत घराच्या हॉलमध्ये आणले. घटनेची माहिती मिळताच कणकवली पोलीस पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र प्रभावती यांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यांच्या शरीरावर ठिकठिकाणी कोयत्याचे गंभीर वार करण्यात आले होते. अखेर पोलिसांनी संशयित रवींद्र याला ताब्यात घेतले.

# खड्डे भरूनही रस्त्यांची दुर्दशा

## ● संगमेश्वर-देवरुख मार्गावर जीवघेणा प्रवास; सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवादरम्यान संगमेश्वर ते देवरुख या मुख्य मार्गावरील खड्डे बुजवण्याचे काम करण्यात आले असले तरी प्रवाशांचे हाल काही थांबलेले नाहीत. बुरंबी ते लोवलेदरम्यान रस्त्यांवरील मोठमोठे खड्डे वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. या मार्गावर प्रवास करणे प्रवाशांसाठी जीवघेणे ठरत आहे. यातच या मार्गाची एका बाजूची साईडपट्टी धोकादायक बनली असून खाजगी कंपनीने केबल टाकल्यानंतर साईडपट्टीची दुरुस्ती न केल्याने अनेक वाहने यात अडकत आहेत. या सर्व बाबींकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत वाहनचालक आणि पादचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

सध्या हे खड्डे दगडी चिऱ्यांनी भरले जात आहेत; मात्र हे फक्त तात्पुरते उपाय असल्याचे स्थानिक सांगतात. पाऊस पडल्यानंतर हे खड्डे आधीपेक्षा अधिक धोकादायक बनत आहेत. या मार्गावरून सद्यस्थितीत दुचाकी वाहने अत्यंत धोकादायक बनले असून अनेक दुचाकीस्वार खड्ड्यातून वर आलेल्या खडीवरून घसरून अपघातग्रस्त होत आहेत. साडवली दरम्यान देखील रस्त्याला दोन ठिकाणी मोठे खड्डे आहेत. गणपतीच्या काळात लाखो भाविक या मार्गावरून ये जा करतात मात्र रस्त्याची अवस्था पाहता प्रशासनाची कार्यक्षमता पुन्हा एकदा संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. प्रशासनाने लवकरात लवकर ठोस उपाय करावा, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे. मुंबई-गोवा आणि मिऱ्या-नागपूर या दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा संगमेश्वर-साखरपा हा ३२ किलोमीटरचा मार्ग राजापूरकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग म्हणून देखील वापरला जातो. या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे वाहन चालकांसह प्रवाशांसाठी दररोजची शिक्षा ठरत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागासह लोकप्रतिनिधींचेदेखील या रस्त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

### अपघाताला निमंत्रण

एप्रिल आणि मे या दोन महिन्यात खासगी कंपनीने ऑप्टिकल फायबर केबल टाकताना या मार्गाच्या साईडपट्टीची पूर्णता दुर्दशा करून टाकली. साईडपट्टीवरील मोठमोठे दगड आजही अपघातास निमंत्रण देत आहेत. याबाबत मे महिन्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांची संपर्क साधला असता त्यांनी साईडपट्टीवर केबल टाकणाऱ्या ठेकेदाराकडून रोलर फिरवून घेणार असल्याचे सांगितले. मात्र प्रत्यक्षात या मार्गावरील साईडपट्टीवर कोठेही रोलर फिरवला नाही. असे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे.

## ‘एमआयडीसीने नुकसानग्रस्तांना तातडीने मदत द्यावी’

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

शहरानजीक फरशी येथे सोमवारी (दि.८) रात्री अचानक एमआयडीसीची पाईपलाईन फुटली. यामुळे आजूबाजूच्या दुकानदाराचे फार मोठे नुकसान झाले आहे. या दुकानदारांना एमआयडीसीने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी माजी सभापती शौकत मुकादम यांनी केली आहे.

एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांसमवेत माजी सभापती शौकत मुकादम यांनी भेट दिली व दुकानदारांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई एमआयडीसीने ताबडतोब करावी. पंचनामे करून त्यांना भरपाई द्यावी, अशा सूचना मुकादम यांनी अधिकाऱ्यांना केली व भविष्यात पाईपलाईन फुटणार नाही याची काळजी संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी असे ठणकावून सांगितले. वेळोवेळी पाईपलाईन फुटणे हे योग्य नाही. याचीदेखील काळजी घेतली पाहिजे, असेही सुनावले.

## राजापूर अर्बन बँकेचा अजब कारभार

**। राजापूर । प्रतिनिधी ।**

राजापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा अजब कारभार समोर आला आहे. या बँकेकडून कर्ज न घेतलेल्या अनेक नागरिकांना कर्ज घेतल्याच्या तर काहींना जामीन राहिल्याच्या नोटीसा आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला असून १०४ वर्षांचा इतिहास असलेल्या राजापूर को-ऑपरेटिव्ह बँकेच्याबाबत आता खातेदारांमध्ये उलट-सुलट चर्चा सुरू आहे.

राजापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे कर्ज घेऊन थकीत असल्याबाबतच्या नोटीसा काढण्यात आल्या आहेत. काहींना जामीन असल्याबद्दल नोटीसा काढण्यात आल्या आहेत. अनेकांनी आपण कर्जच घेतले नाही. तर काहींनी आपण जामीन राहिलो नाही अशा तक्रारी सहाय्यक निंबधक कार्यालयात मांडल्या. सहाय्यक निंबधक कार्यालयात सुनावणीदरम्यान आलेले नागरिक संतापले. वातावरण तापल्यानंतर पोलिसांना बोलावण्यात आले. त्यानंतर काही मंडळींनी जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. यापूर्वी तक्रारदारांनी १५ ऑगस्टला आंदोलन केले होते.




### ● कर्ज न घेता अनेकांना नोटीसा

# कृत्रिम तलाव बनले आरोग्याचा सापळा

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने महापालिकेने शहरभर कृत्रिम तलाव व कंटेनर उभारले. मात्र, आता यात पाणी साचून डासनिर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागल्याने ठाणेकरांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहिला आहे.



मूर्ती नदी, तलाव, खाडीत विसर्जित होऊन नैसर्गिक जलस्त्रोतांचा नाश होऊ नये म्हणून कृत्रिम तलाव आणि कंटेनरची व्यवस्था गणेशोत्सव काळात करण्यात आली होती. गणेशोत्सवानंतर कृत्रिम तलाव आणि कंटेनरमधील मूर्तींची माती काढण्यात आली. प्लास्टिक कापडही काढण्यात आले. मात्र, येथे पाणी तसेच साचून राहिल्याने ते खराब होऊन दुर्गंधीयुक्त झाले. परिणामी डासांची निर्मिती होऊन परिसरातील रहिवाशांच्या आरोग्याची समस्या उभी राहिली आहे. आधीच डेंग्यू-मलेरियाने त्रस्त असलेले नागरिक आता आणखी भयभीत झाले आहेत.

लाखो रुपये खर्च करून कृत्रिम तलाव आणि कंटेनरची व्यवस्था निर्माण करण्यात आली, पण प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे डासनिर्मिती होऊन ठाणेकरांना दवाखान्याची वाट धरावी लागत आहे.

प्रशासनाने हे कृत्रिम तलाव आणि कंटेनर तातडीने रिकामे करावेत, त्यांचे निर्जंतुकीकरण करावे आणि डेंग्यू-मलेरियावर नियंत्रणासाठी विशेष पथके तैनात करावी, अशी मागणी पर्यावरण अभ्यासक डॉ. प्रशांत सिनकर यांनी केली आहे. कररुपी पैशातून उभारलेले हे तलाव जर आज ठाणेकरांसाठी आरोग्याचा सापळा ठरत असतील, तर जबाबदार कोण? हा पर्यावरणपूरक उपक्रम की बेफिकीर प्रशासन?, असा प्रश्न सिनकर यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात उपस्थित करत ठाणे महापालिकेला तत्काळ निर्देश देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## मोकाट गुरांमुळे वाहनचालक त्रस्त

गुहागर : गुहागर तालुक्याची आर्थिक राजधानी असलेल्या शृंगारतळी बाजारपेठेत मोकाट गुरांचा प्रश्न उभा ठाकला आहे. स्थानिक प्रशासनानेही यावर अनेक उपाययोजना राबवल्या; मात्र, ते अयशस्वी ठरलेल्या आहेत. कोंडवाडे, गुरेमालकांना दंड असे उपायही करून पाहिले. मात्र, दिवसेंदिवस मोकाट गुरांचा उपद्रव सुरूच आहे. नोटिसा बजावूनही गुरांचे मालक दाद देत नाहीत. गुहागर शहरातही मोकाट गुरांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रानवी येथे रात्रीच्यावेळी गुरांचा कळप रस्त्याच्या मध्यभागी बसलेला असल्याने वाहने चालवणे कठीण होत आहे.



## सिद्धी शिंदेची भारतीय नौदलात निवड

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

मंदार एज्युकेशन सोसायटीचे शैलजा शिंदे वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील सिद्धी संतोष शिंदेची भारतीय नौदलात निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रांजणे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. या कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग व एम.बी.ए. कॉलेजचा प्राध्यापक वर्ग, वरिष्ठ आणि व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्राध्यापिका दीपा पाटील यांनी केले. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य उमेश कांबळी व एम.बी. ए. कॉलेजचे संचालक मिरजकर, तसेच वरिष्ठ महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक कुलकर्णी व नवले यांनी तिचे कौतुक करून अभिनंदन केले व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## वाहतूककोंडीमुळे शेकडो उमेदवारांची परीक्षा हुकली

### ● केडीएमसी मुख्यालयाबाहेर निदर्शने

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या ४९० पदांच्या परीक्षेसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. ठाणे, पालघर जिल्ह्यासाठी मुंबईतील पवई येथे परीक्षा केंद्र ठेवण्यात आले होते. मोठ्या संख्येने उमेदवार परीक्षा देण्यासाठी आले होते. मात्र वाहतूककोंडीमुळे परीक्षेला वेळेवर पोहोचता न आल्याने १५०हून अधिक उमेदवारांची परीक्षा हुकली. परीक्षा केंद्रांवर उशिरा पोहोचल्यामुळे या उमेदवारांना आत प्रवेश दिला नाही. त्यामुळे नाराज झालेल्या उमेदवारांनी बुधवारी (दि.१०) केडीएमसीच्या मुख्य कार्यालयात धाव घेऊन निदर्शने करत पुन्हा परीक्षा घेण्याची मागणी केली.

परीक्षेसाठी कल्याण, डोंबिवली, टिटवाळा, बदलापूर, कर्जत, उल्हासनगर आदी भागांतील उमेदवारांसाठी पवई येथे परीक्षा केंद्र ठेवण्यात आले होते. मात्र हे केंद्र त्यांच्या राहत्या ठिकाणांपासून खूप दूर असल्याने आणि वाहतूककोंडीमुळे अनेकांना सकाळी ९ वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचणे शक्य झाले नाही. काहींना लोकल लेट असल्याचा फटका बसला तर काहींचा कल्याण-शीळ रोडवरील खड्डे आणि वाहतूककोंडीने घात केला. पवई येथील आयॉन डिजिटल केंद्रावर जाण्यासाठी उमेदवारांना विद्याविहार, कांजूरमार्ग, नाहूर रेल्वे स्थानकातून रिक्षा, टॅक्सी मिळण्यात अडचणी आल्याचे मयूर राठोड या परीक्षार्थीने सांगितले. त्यांच्या भवितव्याशी प्रशासनाने खेळ केल्याचा संतापही त्याने व्यक्त केला.

> **“डोंबिवली अथवा कल्याणसारख्या मध्यवर्ती ठिकाणी परीक्षा केंद्र गरजेचे होते. पालिका प्रशासनाच्या नियोजन अभावाचा फटका आम्हाला बसला.**
> **- दिव्या सपकाळ, परीक्षार्थी”**

## नागरिकांना घरबसल्या शासनाच्या सेवा | ठाणे जिल्हा परिषदेचा स्तुत्य उपक्रम

# ‘डोअर स्टेप डिलिव्हरी’ प्रणालीला उत्तम प्रतिसाद

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

सामान्य नागरिकांना सरकारी सेवा त्यांच्या दारात सहज, सुलभ आणि जलदगतीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने काही महिन्यांपूर्वी ‘डोअर स्टेप डिलिव्हरी’ हा अभिनव उपक्रम सुरु केला. या उपक्रमाला ग्रामीण भागातील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत साडेतीन हजाराहून अधिक नागरिकांना घरपोच दाखले देण्यात जिल्हापरिषदेला यश आले आहे.

‘डोअर स्टेप डिलिव्हरी’ या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांना घरबसल्या शासनाच्या विविध सेवा मिळत आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम लोकाभिमुख आणि परिणामकारक ठरत आहे. सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या दारी सेवा उपलब्ध करून देणे, हेच खऱ्या अर्थाने सुशासनाचे प्रतीक आहे. या उपक्रमाद्वारे आम्ही प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करत आहोत. हा उपक्रम प्रत्येक गावात, प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा जिल्हा परिषदेचा संकल्प आहे.

या प्रणालीद्वारे नागरिकांना घरबसल्या ४०२ प्रकारच्या शासकीय सेवा मिळत आहेत. प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ४ हजार १३ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३ हजार ६५९ नागरिकांना घरपोच सेवा देण्यात आली आहे. उर्वरित १७० अर्जांवर काम सुरू असल्याबाबतची माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी दिली.

जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, उद्योग आधार, जीवन प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती अर्ज, पॅनकार्ड व दुरुस्ती, पासपोर्टसाठी शपथपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, शेत मोजणी अर्ज, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र, राजपत्र प्रकाशन, रहवासी प्रमाणपत्र, खाद्य परवाना जीवन प्रमाणपत्र, हयात प्रमाणपत्र, आयुष्यमान भारत कार्ड, शेत मोजणी अर्ज, डिश टीव्ही डिटीएच रीचार्ज, शिष्यवृत्ती अर्ज, केंद्र सरकार ओबीसी प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र, जीएसटी अर्ज, हॉटेल परवाना, टीकीट आरक्षण, निवासी शाळा, परदेशी शिष्यवृति, शासकीय वसतिगृह प्रवेश, अर्थ कुटुंब सहाय्य, नविन कौटुंबिक शिधापत्रिका, महाभरती, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय अंतर्गत येणाऱ्या नोंदणी, भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्रासाठी अर्ज या सेवा घरपोच दिल्या जातात.

### सेवा मंजूर झाल्यास प्रमाणपत्र घरपोच

ग्रामपंचायतींच्या कार्यरत केंद्रचालक यांना ही जबाबदारी दिली असून यासाठी आपले सरकार सेवा केंद्रमधील केंद्रचालक यांच्यामार्फत कार्यान्वित आहेत. केंद्रचालक नागरिकांकडून वेळ ठरवून त्यांच्या घरी येतात, आवश्यक कागदपत्र स्कॅन करतात आणि ऑनलाइन सेवा प्रक्रिया पूर्ण करतात. सेवा मंजूर झाल्यावर संबंधित प्रमाणपत्र पुन्हा घरपोच पोचवले जाते.

## निवडक

## गुहागर एसटी डेपोचा गलथान कारभार

### बसेस उशिरा सोडून प्रवाशांची कुचंबना

**चिपळूण :** गुहागर आगारातून गणेशोत्सव झाल्यानंतर लांब पल्ल्याच्या सोडण्यात येणाऱ्या गाड्या दोन-दोन तास उशिराने सोडत आहेत. चालक-वाहक रिकाम्या गाड्या नेतात. चिवेली फाटा, घोणसरे, गुढेफाटा, तांबी, निर्व्हाळ या बसथांब्यावर चालक-वाहक गाड्या थांबवत नाहीत. त्यामुळे शाळेचे विद्यार्थी, वृद्ध, व्यापारी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक यांची कुचंबना होत आहे. गुहागर आगाराचा अत्यंत गलथान कारभार सुरू आहे. गुहागर-स्वारगेट गाडी ९.१५ मि. सोडतात. परंतु, बुधवारी (दि.१०) दोन तास झाले तरी गाडी आलेली नव्हती. गुहागर आगरातील नियंत्रण कक्षातील फोन बंद आहे. त्यामुळे संपर्क साधता येत नाही. यामुळे प्रवासाची कुचंबना होत आहे. गुहागरमधून लांब पल्ल्याच्या गाड्यांना कोयनानगर येथे जेवणासाठी थांबा आहे. परंतु, चालक-वाहक मनमानी कारभार करून काशिळ येथे हॉटेलात थांबवतात. गुहागर-स्वारगेट गाडी काशिळला ४ वाजता पोहोचते. डायबिटीस रुग्ण यांना उपाशी बसावे लागते. त्यामुळे त्यांना त्रास होतो. डेपो मॅनेजर गुहागर यांनी चालक वाहकांची मनमानी थांबवावी, अशी मागणी प्रवासी अनिलकुमार जोशी यांनी केली आहे.



## पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन

**पालघर :** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या ताफ्यात काही दिवसांपूर्वीच मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली आहे. यापूर्वी फॉरेन्सिकची टीम मुंबईवरून बोलावली जात होती. मात्र, आता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात शासनामार्फत मोबाईल व्हॅन उपलब्ध असल्याने स्पॉट पंचनामा व गुन्ह्याचा तपास करणे सोपे जाणार आहे. गुन्हा घडलेल्या ठिकाणाहून पुरावे गोळा करण्यात, पॅकिंग करण्याकरता या फॉरेन्सिक व्हॅनचा उपयोग होणार आहे. लवकरच आणखी दोन मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन आयुक्तालयाला मिळणार आहेत. सध्या ही व्हॅन परिमंडळ एक कार्यालयात उभी असून आयुक्तालयाच्या हद्दीत वसई-विरारमध्ये जर काही गंभीर गुन्हा घडल्यास उपलब्ध मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन पाठवण्यात येणार आहे. या व्हॅनकरता एकुण चार जणांची नेमणूक करण्यात आली असून प्रत्येकी १२ तासाला दोन असे तज्ञ कर्मचारी उपलब्ध आहेत. मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमध्ये अनेक प्रकारच्या गोष्टी उपलब्ध आहेत. त्यात प्रामुख्याने एखादा गुन्हा घडल्यास त्या ठिकाणी मार्किंग करण्याकरता लागणारे टेप, कोण उपलब्ध आहेत, अशी माहिती पोलीस गुन्हे शाखेचे उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिली आहे.

## गणेशोत्सवात एसटीला विक्रमी उत्पन्न

**पालघर :** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एसटी महामंडळाने विशेष बससेवा पुरवून यशस्वीपणे वाहतूक केली आहे. पालघर एसटी विभागाच्या माध्यमातून कोकणाकडे आणि परतीसाठी एकूण ७०६ विशेष बसगाड्या सोडण्यात आल्या, ज्यामुळे तब्बल ३१,५४६ प्रवाशांनी सुरक्षित प्रवास केला. या विशेष नियोजनामुळे एसटी महामंडळाला सुमारे १ कोटी ८० लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळाले आहे. गणेशोत्सव आणि गौरी उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची सोय लक्षात घेऊन, पालघर एसटी विभागाकडून विशेष बससेवांचे नियोजन करण्यात आले होते. २३ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट या कालावधीत कोकणाकडे जाणाऱ्या बसगाड्यांची गर्दी लक्षात घेता, विभागाकडून ६५५ बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये पालघर विभागाच्या स्वतःच्या १४२ बसेससह इतर विभागांकडूनही अतिरिक्त बसेस मागवण्यात आल्या होत्या. यामध्ये नागपूर प्रदेशातून १५०, अमरावती प्रदेशातून १७३ आणि रत्नागिरी विभागातून ९९ बसेसचा समावेश होता.



## फुरूस-पोयनार रस्त्याला भगदाड

**खेड :** खेड तालुक्यातील फुरूस-पोयनार रस्त्याच्या मध्यभागी मोठे भगदाड पडल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षीच या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले होते. खेड-दापोली मुख्य मार्गालगत असलेल्या फुरूस गावातून पोयनारकडे जाण्यासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, या भगदाडाखाली मोठ्या स्वरूपाचे भुयारदेखील तयार झाले आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांना मोठा धोका निर्माण झाला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. नुकत्याच बांधण्यात आलेल्या या रस्त्याची झालेली दुर्दशा हा कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारा प्रकार असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये रंगली आहे.






## वाशिष्ठी नदीचे पाणी दूषित

**चिपळूण :** चिपळूण शहरातून धावणाऱ्या वाशिष्ठी व शिवनदीच्या काठावर अनेक सार्वजनिक व खाजगी शौचालये बांधण्यात आली आहेत. त्याचे सांडपाणी नद्यांमध्ये सोडण्यात आले आहे. यामुळे पाणी दुषित होत असतानाच आता बाजारपूल व मच्छि-मटण मार्केटमधील नादुरूस्त शौचालयाचा मैला व सांडपाणी वाशिष्ठी नदीत जात असल्याचे उघडकीस आले आहे. यावर नगरपरिषद करीत असलेली दुरूस्ती तकलादू असल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. शहराचा विचार करता दोन नद्या शहरातून वाहतात. काही वर्षे मागे जाता या दोन्ही नद्यांच्या पात्रात घाणीचे साम्राज्य दिसत होते. चिकन, मटणचे टाकावू अवशेष, कचरा, प्लास्टिकच्या बाटल्यांचा खच दिसून येत आहे. यामुळे वाशिष्ठीच्या पाण्याला दुर्गंधी येत असल्याने शहरात अनेकदा साथीचे आजार पसरले होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी नगर परिषदेसह काही सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला. यातून शिवनदीच्या पुलावर जाळी मारण्यात आली तर वाशिष्ठीत कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई सुरू झाली आहे.

# जासई–खारकोपर मार्गाची दुरवस्था

## अवजड वाहनांची मार्गावर रेलचेल

| चिरनेर | प्रतिनिधी |

नव्याने विकसित होत असलेल्या उलवे नोड परिसरात तसेच येथील खारकोपर रेल्वेस्थानकाला जोडणाऱ्या जासई नाका ते गव्हाण खारकोपर मार्गाची खड्ड्यांमुळे दुरवस्था झाली आहे. या मार्गाच्या दुरुस्तीचे काम तातडीने करण्याची मागणी येथील प्रवासी व स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. या ठिकाणी काही प्रमाणात काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. तर, काही ठिकाणी काम पूर्ण झाले आहे. मात्र, या मार्गावर अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढली आहे. त्यामुळे खड्ड्यांचे प्रमाणही खूपच वाढले आहे.

जासई–गव्हाण रस्ता सार्वजनिक बांधकाम अलिबाग व सिडको यांच्या कात्रीत सापडला आहे. या रस्त्याबद्दल अनेक तक्रारी करूनसुद्धा प्रशासनाकडून कोणतीही दाद मिळत नाही. या रस्त्याच्या नादुरुस्तीमुळे या ठिकाणी अपघात होण्याची दाट शक्यता आहे. पावसाळ्यात खड्ड्यात पाणी साचल्यानंतर स्थानिक प्रवासी, रिक्षा चालक, चार चाकी वाहनधारक तसेच दुचाकी चालविणाऱ्यांना अंदाज येत नसल्यामुळे अपघातांना तोंड द्यावे लागते. खड्ड्यांमुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली झालेली आहे. त्यामुळे लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे.



### रस्त्याची चाळण, अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**जासई–गव्हाण रस्ता सार्वजनिक बांधकाम अलिबाग व सिडको यांच्या कात्रीत सापडला आहे. या रस्त्याबद्दल अनेक तक्रारी करूनसुद्धा प्रशासनाकडून कोणतीही दाद मिळत नाही. संबंधित विभागाच्या दुर्लक्षतेमुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, वाहनचालकांना प्रवास करणे कठीण होऊन बसले आहे.**

सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबागच्या अधिकाऱ्यांची या रस्त्याच्या कामाबाबत विचारणा केली असता निधीची कमतरता असल्याचे सांगाण्यात आले. या विभागात सिडकोने भूसंपादन केलेले आहे. सिडकोचे अनेक प्रकल्प या विभागात चालू आहेत. यामध्ये प्रामुख्याने न्हावा शिवडी सी लिंक, मास हाऊसिंग प्रकल्प, विमानतळ, नेरूळ उरण रेल्वे मार्ग असे अनेक प्रकल्प या ठिकाणी चालू आहेत. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती करण्याची जबाबदारी सिडकोची आहे. हा रस्ता लवकरात लवकर सिडकोकडे हस्तांतरित करावा, अशी मागणी केली आहे. यासाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी सिडकोकडे मागणी केली होती. त्यानुसार या मार्गाच्या दुरुस्तीचे काम सिडकोच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे.

> “ हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. त्यातील २ हजार ४०० मीटरच्या काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून, सहाशे मीटरचे काम पावसाळ्यानंतर सुरू होईल.
> – नरेश पवार, अतिरिक्त अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ”

# मास्टर ट्रेनर्सचे निवासी प्रशिक्षण यशस्वी



| अलिबाग | प्रतिनिधी |

धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत दि. ८ ते १० सप्टेंबरदरम्यान तालुकास्तरीय मास्टर ट्रेनर्ससाठी निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, रामनिधी, खोपोली येथे करण्यात आले. या प्रशिक्षणाचे उद्घाटन दि.९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, तहसीलदार कर्जत डॉ. धनंजय जाधव, गटविकास अधिकारी संदीप कराड, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पेण तेजस्विनी गलांडे हे मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. जावळे यांनी प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना सांगितले की, रायगड जिल्ह्यातील ११३ आदिवासी वाड्यांमध्ये सर्वसमावेशक योजना राबवून वाड्यांचा समृद्ध विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी त्यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आणि मास्टर ट्रेनर्सना आवश्यक त्या उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकारी स्वतः प्रत्येक तालुक्यातील दोन वाड्यांना भेट देऊन ग्राम विकास आराखड्यांचा आढावा घेणार असून, सर्व ११३ वाड्यांचे आराखडे स्वतः तपासून शासनाकडे सादर करण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या तीन दिवसीय प्रशिक्षणामध्ये तालुकास्तरावरील ७१ मास्टर ट्रेनर्सना जनजातीय गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक कौशल्य व माहिती प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील आदिवासी वाड्यांच्या शाश्वत आणि समावेशी विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले असून, या उपक्रमामुळे स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग वाढून, योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.

# खालापूर तालुक्यातील शेतकऱ्याला ट्रॅक्टरचा लाभ

## जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते ट्रॅक्टर प्रदान



| वावोशी | प्रतिनिधी |

शेती अधिक फायदेशीर व्हावी आणि शेतकऱ्यांनी नवनवीन प्रयोग करत यांत्रिकीकरण स्वीकारावे, असा प्रेरणादायी संदेश देत रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रामेती प्रशिक्षण संस्था, खोपोली येथे आयोजित कार्यक्रमात राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत मंजूर ट्रॅक्टरचा लाभ खालापूर तालुक्यातील शेतकरी महेश लक्ष्मण पवार यांना प्रदान केला.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्राचार्य रामेती श्रीमती राजपूत, तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर, मंडळ कृषी अधिकारी नाजीम मुलाणी, उप कृषी अधिकारी सुरेश उघडा, कृषी सेवक सुमित भगत आदी मान्यवरांसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळंबोली वसाहतीतील प्रभाग १० उजळला

## विजय खानावकरांच्या पाठपुराव्याला यश

| पनवेल | प्रतिनिधी |

कळंबोली वसाहतीतील प्रभाग १० अखेर प्रकाशमान झाला आहे. माजी नगरसेवक विजय खानावकर यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे प्रभागातील तब्बल २४ ठिकाणी हायमास्ट दिव्यांचे लोकार्पण करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या दीर्घकाळच्या अंधाराच्या समस्येवर पूर्णविराम मिळाला असून, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कळंबोलीत उत्सवी वातावरण उजळून निघाले आहे.

कळंबोली वसाहतीतील अनेक चौकांमध्ये पथदिवे असले तरी काही महत्त्वाच्या ठिकाणी अंधाराचे साम्राज्य होते. यामुळे नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन माजी नगरसेवक विजय खानावकर यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांनी वारंवार पत्रव्यवहार करून आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करत हायमास्ट दिवे बसवण्याचा प्रस्ताव पुढे रेटला. अखेरीस सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर २४ हायमास्ट दिव्यांचे लोकार्पण करण्यात आले. दरम्यान, हायमास्ट बसवण्यात आलेल्या ठिकाणांमध्ये विठ्ठल मंदिर चौक, सेक्टर ३, हनुमान मंदिर चौक, सेक्टर ३, गणपती मंदिर सेक्टर २, प्रदीप स्पोर्ट सेक्टर २, ए.आ.जी. २ सेक्टर २, रॉयल येस पी.एच. सेक्टर २, शिव प्लाझा बिल्डिंग सेक्टर १, सूर्य विहार बिल्डिंग सेक्टर १, जाधववाडी, चौधरी आळी, पोपेटा आळी, चव्हाठा, काळभैरव मंदिर, मोहिते आळी, भगत आळी, पाटील आळी (कळंबोली गाव) यांचा समावेश आहे.



# वसंत साळुंखेंचा तुडील केंद्राकडून सत्कार

| महाड | प्रतिनिधी |

महाड तालुक्यातील कुंबळे गावचे भूमीपुत्र, अप्पर तुडील केंद्राचे केंद्रप्रमुख तथा रा. जि.प. आदर्श शाळा सापेतर्फे तुडील शाळेचे शिक्षक वसंत साळुंखे यांना नुकताच रायगड जिल्हा परिषदेचा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल अप्पर तुडील केंद्र सर्व शाळांच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार अप्पर तुडील केंद्र शाळा येथे करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापक राजेंद्र बनसोडे, हेमंत सरदळ, राम जंगम, मिलिंद सरदळ, प्रदीप शिंदे, ज्ञानेश्वर हुंबे, दगडु कोळेकर, भूषण ढगे, संदीप पवार,अनिल मदने, सुरेश तवळे, मुख्याध्यापिका प्रज्ञा धोत्रे, शीतल मकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# एनएसएसच्या विद्यार्थ्यांचा गणेश विसर्जनामध्ये सहभाग



| महाड | प्रतिनिधी |

दीड, सात आणि दहा दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन नुकतेच करण्यात आले. शहरातील विविध सामाजिक संघटनांनी पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाचे आवाहन केले होते. या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला असून, यामध्ये एम.एम. जगताप महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. यातून पर्यावरण संवर्धनाच्या या चळवळीला नवीन गती मिळाली आहे.

घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये मोठ्या प्रमाणात निर्माल्य म्हणजे फळ, फुले, फुलहार, उदबत्या इत्यादी हे गणेशासोबत नदीमध्ये विसर्जन केले जाते. यामुळे जल प्रदूषण होऊन पर्यावरणाची हानी होत असल्याचे अनेक अभ्यासक आणि तज्ज्ञांनी दाखवून दिले आहे. ही बाब लक्षात घेऊन महाड नगर परिषदेने मुख्य ठिकाणी कृत्रिम तलाव निर्माण केले होते. त्यासोबतच निर्माल्य कलशदेखील उभारले होते. गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावामध्ये करण्याचे भावनिक आवाहन नागरिकांना जगताप कॉलेजच्या एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी केले. या उपक्रमासाठी नागरिकांचा चांगल्या प्रकारचा प्रतिसाद लाभला. या विसर्जित मूर्तींची माती स्थानिक मूर्ती कारखान्यांना देण्यात येणार असून, निर्माल्याचा उपयोगातून सेंद्रिय खतांच्या निर्मितीत वापर केला जाणार आहे.

एमएम जगताप कॉलेजसोबतच सीस्केप, रोटरी क्लब आणि इतर संस्थांनीदेखील यात सहभाग घेतला. हा उपक्रम राबवण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य डॉ. अंजय धनवडे व राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख अनामिका मनोहर तांबडे यांनी मेहनत घेतली. अशा पद्धतीने पर्यावरण जपण्यासाठी हे उचललेले पाऊल स्वागतार्ह असल्याचे सांगत लोकविकास सामाजिक संस्थेचे चेअरमन हनुमंत जगताप यांनी समाधान व्यक्त केले.

# मुरुड आगारातील अंतर्गत रस्त्याची दुर्दशा



| आगरदांडा | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील महत्त्वाच्या एस आगारांपैकी एक असलेल्या मुरुड एसटी आगाराच्या अंतर्गत रस्त्याची मोठी दुर्दशा झाल्याने प्रवाशांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मुरुड जंजिरा हे जागतिक कीर्तीचे पर्यटनस्थळ असल्याने देश–विदेशातून पर्यटक ये –जा करीत असतात. आगाराचे काँक्रिटीकरण अर्धवट अवस्थेत असल्याने दर पावसाळ्यात आगार परिसरात मोठे खड्डे पडतात. त्यामुळे प्रवाशांना चालणे कठीण होत आहे.

# कामगारांच्या वेतनवाढीचा करार

## कोकण श्रमिक संघाच्या माध्यमातून मिळाला न्याय



| उरण | प्रतिनिधी |

मे. आय.एम.सी. लि., जेएनपीटी, न्हावा शेवा, ता. उरण, जि. रायगडमधील कामगारांच्या वेतनवाढीचा करार शनिवार, दि. ६ सप्टेंबर रोजी झाला. या कंपनीमध्ये कोकण श्रमिक संघ ही मान्यता प्राप्त युनियन आहे.

नवीन वेतन वाढीचा करारनामाबाबत कामगार नेत्या जनरल सेक्रेटरी अ‍ॅड. श्रुती म्हात्रे, सेक्रेटरी एकनाथ ठोंबरे, स्थानिक युनिट अध्यक्ष रवींद्र भोईर, धर्मेंद्र ठाकूर, रवींद्र ठाकूर, किरण घरत, कामगार कमिटी व कंपनीचे अधिकारी हरेष सविता, व्हॉइस प्रेसिडंट सरतेज यादव, जनरल मॅनेजर, नवलेश कुमार रिजनल हेड, नेहरु सुब्रम्हण्यम सि. मॅनेजर फायन्सस, जी.के. श्रीधरन, आय.आर. यांनी वारंवार चर्चा केल्या. चर्चेअंती दि. ६ सप्टेंबर रोजी सदर वेतनवाढीच्या करारनाम्यावर सह्या करण्यात आल्या. पाच वर्षे कालावधीकरिता कामगारांना एकूण २१,०००/– पगारवाढीचा करार करण्यात आला.

## नागरिकांना घडवली खड्ड्यांची सफारी | पनवेल महापालिकेला आली जाग

# खड्ड्यांविरोधात मनसेचे उपहासात्मक आंदोलन

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

‘खड्डे तुमच्या दारात, पैसे कंत्राटदाराच्या घरात’, ‘यावंच लागतंय, खड्ड्यात पडावंच लागतंय’ अशा प्रकारचे फलक झळकावत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने बुधवारी (दि. १०) पनवेल शहरात अनोखे आंदोलन करण्यात आले. पालिका हद्दीतील अंतर्गत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे अनेक लहान–मोठे अपघात घडत आहेत. नागरिकांना होत असलेल्या या त्रासाची दखल प्रशासनाने घेऊन लवकरात लवकर खड्डे बुजवावेत, या मागणीकरिता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमार्फत ‘खड्डे सफारी’चे आयोजन करण्यात आले. आंदोलनात यमराजाच्या वेशात सामील झालेल्या कार्यकर्त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. मनसे प्रवक्ते योगेश चिले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या आंदोलनात प्रवाशांनी भरलेली बस घेऊन पनवेल एसटी स्टॅन्ड, पनवेल शहर तसेच पालिका कार्यालयासमोरील रस्त्यावरील खड्ड्यांची सहल प्रवाशांना घडवण्यात आली. पनवेल पालिकेच्या माध्यमातून पालिका हद्दीतील रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच काही ठिकाणी रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचे कामदेखील करण्यात येत आहे.




> “ रायगड जिल्ह्याला छत्रपती शिवाजी महाराजांची पावन भूमी म्हणून ओळख आहे. याच रायगड जिल्ह्यामध्ये पनवेल महानगरपालिकेचा समावेश आहे. जसा रायगडच्या गडकिल्ल्यांचा इतिहास नागरिकांना ठाऊक आहे, तसाच पनवेलमधल्या वर्षानुवर्षे जुन्या असलेल्या खड्ड्यांचादेखील इतिहास माहिती व्हावा, त्याची माहिती सर्वसामान्य नागरिकांना व्हावी यासाठी हे अनोख्या आंदोलन आम्ही केले आहे.
> – योगेश चिले, प्रवक्ते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना ”

## निवडक



### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रायगड** : साखर चौथ गणेशोत्सवनिमित्त अलिबाग तालुक्यातील वेश्वी गावातील ओमकार क्रीडा मंडळ आणि जिल्हा रुग्णालयाच्यावतीने बुधवार, दि. १० सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ओमकार क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनंत मुलुस्कर, रवींद्र पाटील, ग्रामस्थ संदीप घरत, सुरेश शेळके, यशवंत पाटील, राघव गुरव, प्रकाश चवरकर, राकेश राऊळ, अमोल नलावडे, सुशांत नलावडे, केदार नलावडे, अतिष पाटील, रोहित शिंदे, विरेंद्र मगर, निकेश शेळके, काका शेळके, राकेश धनवी, समाधान नलावडे, गजानन मगर, महेश मुलुस्कर, सौरभ नलावडे, पंकज गुरव आदी उपस्थित होते.




### जनसुरक्षा कायदा रद्द करा, उरणमध्ये निदर्शने

**उरण** : जनविरोधी घटना विरोधी लोकशाही हक्क नाकारणारा जनसुरक्षा कायदा रद्द करा या मागणीसाठी उरणमध्ये शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा, भाकप, माकप, समजवादी पक्ष, भारिप, सकप आदी पक्षाकडून उरण शहरातील गांधी चौकात आंदोलन निदर्शने करण्यात आली. त्यानंतर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. घटना विरोधी कायदा रद्द करा, अशा घोषणांनी संपूर्ण उरण शहर दुमदुमून गेले होते. आज उरण शहरामध्ये गांधी चौकात महाविकास आघाडी तसेच सर्व पक्ष एकत्र येत निदर्शने करण्यात आली. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, उल्का महाजन, शेकापचे तालुका चिटणीस रवि घरत, भावना घाणेकर, कामगार नेते भूषण पाटील, सुधाकर पाटील यांच्यासह इतर अनेक नेत्यानी आपल्या भाषणात सरकारचा खरपूस समाचार घेत सरकारचा निषेध केला. सर्व नेत्यांच्या भाषणानंतर मोर्चा गांधी चौकातून गणपती चौकाकडून जरी मरी मंदिरमार्गे तहसील कार्यालयावर नेण्यात आला. त्यानंतर तहसीलदार उद्धव कदम यांना निवेदन देण्यात आले.



### पत्रकारांकडून पालिका आयुक्तांचा सन्मान

**पनवेल** : पनवेल तालुका पत्रकार विकास मंच इंडियन ऑइल आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने साक्षरता दिनाच्या औचित्याने ‘वृक्षसंवर्धन साक्षरता दिन’ साजरा करण्यात आला. यावेळी इंडियन ऑइल कंपनीचे उच्चपदस्थदेखील उपस्थित होते.उच्चपदस्थ व्हिडिओ कॉन्फरन्स सुरू असल्यामुळे आयुक्त मंगेश चितळे या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. परंतु, त्यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागाने अत्यंत काटेकोर पद्धतीने नियोजन केल्यामुळे कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला. त्यामुळे पनवेल तालुका पत्रकार मंचाच्यावतीने अध्यक्ष मंदार दोंदे, खजिनदार संजय कदम, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, सरचिटणीस हरेश साठे आणि सदस्य प्रवीण मोहोकर यांच्या शिष्टमंडळाने आयुक्त मंगेश चितळे यांना शाल प्रदान करून, ‘माझे झाड’ या अभियानाचे सन्मानचिन्ह भेट दिले. तसेच या कार्यक्रमाला ईद–ए–मिलादनिमित्त निघालेल्या जुलूससाठी पोलीस बंदोबस्ताचे पर्यवेक्षण करणारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनादेखील शाल व सन्मानचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

### कुणबी समाजाला तात्काळ प्रमाणपत्र द्या : बागुल



**कोलाड** : जर सरकार मराठवाड्यातील मराठा समाजाला हैदराबाद ग्रॅजेटप्रमाणे कुणबी प्रमाणपत्र देत असेल, तर कोकणातील कुणबी समाज हा कुणबी असुनसुद्धा कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी जुनी मागणी असूनही यासाठी अनेक मोर्चे काढले गेले तरी त्यांची मागणी मान्य झाली नाही, मग कोकणवासियांवर शासन अन्याय करत असल्याची खंत कोलाड (वरसगाव) येथील सामाजिक कार्यकर्ते विश्वास बागुल यांनी व्यक्त केली आहे. कोकणात असणारा कुणबी समाजालाही हैदराबाद गॅजेटप्रमाणे एक गावात एक कुणबी असल्यास संपूर्ण गाव कुणबी म्हणून शासकीय अधिकाऱ्यांमार्फत सर्वे करून कुणबी प्रमाणपत्र वितरित करा, कारण आमची मागणी करणारा कोकणात आमच्या कुणबी समाजाचा एकही आमदार नाही, ही खंत आहे. यासंदर्भात लेखी निवेदन जिल्हाधिकारी रायगड यांना देण्यात येणार असल्याची माहिती विश्वास बागुल यांनी दिली.

### रिक्षाच्या ठोकरीने एक इसम जखमी

**पनवेल** : रिक्षाच्या ठोकरीने एक इसम जखमी झाल्याची घटना पनवेल शहरातील उरण नाका सर्कल येथे घडली आहे. देवानंद म्हात्रे (४९) रा. नवीन पनवेल हे पनवेल शहरातील उरण नाका सर्कल येथे उभे असताना टपालनाका येथून आलेल्या रिक्षा चालकाने त्यांना ठोकर मारून झालेल्या अपघातात त्यांच्या पायाला मोठी दुखापत करून तो पसार झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, फरार रिक्षा चालकाचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# प्लास्टिक व्यापारात भारताची निर्णायक उडी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जागतिक प्लास्टिक व्यापारात भारत निर्णायक उडी घेण्यासाठी सज्ज आहे. मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड या ध्येयदृष्टीखाली, ऑल इंडिया प्लास्टिक्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने भारतातील प्लास्टिक फिनिश्ड प्रॉडक्ट्सच्या निर्यातीला चौपट वाढवण्याची महत्वाकांक्षी रणनीती जाहीर केली आहे.

२४ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबईत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेची घोषणाही करण्यात आली. चेअरमन अरविंद मेहता म्हणाले, हा फक्त व्यापार विस्तार नसून, भारताला जागतिक प्लास्टिक हब बनवण्याचा राष्ट्रीय मिशन आहे. मेहता यांनी सांगितले की, योग्य धोरणांमुळे २-३ नवीन पॉलिमर प्लांट्स, प्लास्टिक मशिनरी व सहयोगी युनिट्समध्ये १००% वाढ, एमएसएमई-आधारित उत्पादनात मोठी भर पडू शकते. रोजगार व कौशल्यविकासात भर पडेल. चीनच्या कॅन्टन फेअरच्या उदाहरणावरून योग्य शासकीय धोरणे निर्यात कशी बदलू शकतात हे स्पष्ट होते.भारतातील प्लास्टिक उद्योग प्रामुख्याने एमएसएमई आधारित आहे. देशभरात ५०,००० हून अधिक युनिट्स कार्यरत असून या क्षेत्रात सुमारे ४.६ दशलक्ष लोक थेट व अप्रत्यक्षरित्या रोजगार करतात. निर्यात लक्ष्य साध्य झाले तर रोजगार संधी ६ दशलक्षांवर पोहोचू शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

---

### तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र. ३७४/२०२५

श्री. भिमसेन दौलत शिंदे
रा.- फणसवाडी पो. नांदगाव — वादी
ता. सुधागड, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी - ग्रामपंचायत गोमाशी — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री. भिमसेन दौलत शिंदे रा. फणसवाडी पो. नांदगाव ता. सुधागड, जि. रायगड यांनी यांचा जन्म दि. ०१/०५/१९६५ रोजी मौजे फणसवाडी पो. नांदगाव ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर भिमसेन दौलत शिंदे यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- १०/०९/२०२५

सही /-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

---

### तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र. / २०२५

श्री. खेळु राया हिरवा — वादी
रा. पेंढरमाळ पो. घोटवडे
ता. सुधागड, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी-ग्रामपंचायत घोटवडे — प्रतिवादी
ता.सुधागड, जि.रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री. खेळु राया हिरवा रा. पेंढरमाळ पो. घोटवडे ता. सुधागड, जि. रायगड यांनी त्यांचे भाऊ कै. काशिराम राया हिरवा यांचा मृत्यु दि. ०९/१२/२००७ रोजी मौजे-पेंढरमाळ ता.सुधागड, जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर काशिराम राया हिरवा यांच्या मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- १०/०९/२०२५

सही / -
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

---

### तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र./ २०२५

श्री. खेळु राया हिरवा
रा.पेंढरमाळ पो.घोटवडे — वादी
ता.सुधागड, जि.रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी - ग्रामपंचायत घोटवडे — प्रतिवादी
ता.सुधागड, जि.रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री. खेळु राया हिरवा रा. पेंढरमाळ पो. घोटवडे ता. सुधागड, जि. रायगड यांनी यांचे भाऊ कै. कानु राया हिरवा यांचा मृत्यु दि.०३/०२/२००६ रोजी मौजे-पेंढरमाळ पो. घोटवडे ता.सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर कानु राया हिरवा यांच्या मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- १०/०९/२०२५

सही / -
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

---

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकती श्रीमती गौरी राजेश केतकर व श्री. राजा राजेश केतकर, राहणार मुलुंड (पश्चिम), मुंबई यांच्या निर्वेध मालकी हक्काच्या असून, सदरील जमिन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती गौरी राजेश केतकर व श्री. राजा राजेश केतकर यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला त्यांस देण्यात येईल व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतींचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव, ता. अलिबाग. | २१२५/१ | ०-१४-०० एकूण | २-४१ |
| नागाव, ता. अलिबाग. | २१२३/३ | ०-१६-०० एकूण | ३-०६ |

अलिबाग,
दिनांक : ११/०९/२०२५.

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

---

## चेतावनी

हम, खादी और ग्रामोद्योग आयोग (केवीआईसी), संसद के अधिनियम (1956 की संख्या 61, जैसा कि 1987 के अधिनियम संख्या 12 और 2006 के अधिनियम संख्या 10 द्वारा संशोधित किया गया है) के तहत पंजीकृत एक सांविधिक निकाय हैं, जिसका मुख्यालय ग्रामोदय, 3, इरला रोड, विले पार्ले (पश्चिम), मुंबई–400 056, भारत में स्थित है और इसका राज्य कार्यालय, मुंबई–20 (महाराष्ट्र) में है।

आम जनता और अन्य व्यक्तियों के संज्ञान में एतद् द्वारा लाया जाता है कि केवीआईसी, खादी एवं ग्रामोद्योग कार्यक्रमों/गतिविधियों के संचालन हेतु समितियों और धर्मार्थ ट्रस्टों (जिन्हें सामान्यतः 'खादी संस्था' कहा जाता है) को उनकी निर्मित अचल संपत्तियों को केवीआईसी के पक्ष में गिरवी रखकर वित्तीय और तकनीकी सहायता प्रदान करता है। न केवल भूमि को धर्मार्थ उद्देश्यों के लिए दिया गया है, बल्कि सरकारी निधि से कई कल्याणकारी सहायता के उपाय भी वर्षों से किए जा रहे हैं, जो अपने आप में देश/राज्य को करदाताओं द्वारा भेजी गई धनराशि का भंडार भी है। इसलिए, केवीआईसी जनहित का प्रतिनिधित्व करते हुए विशिष्ट उपयोग के लिए निर्मित इन परिसंपत्तियों पर प्राधिकार रखता है।

आम जनता को एतद् द्वारा सचेत किया जाता है कि खादी संस्थाओं की संपत्तियाँ केवीआईसी की लिखित अनुमति के बिना न तो खरीदी और न ही उनसे लीज़ पर ली जानी चाहिए। जो कोई भी व्यक्ति केवीआईसी की लिखित अनुमति के बगैर खादी संस्थाओं की संपत्तियाँ खरीद रहा है, वह ऐसा अपने जोखिम पर कर रहा होगा और इसके परिणामों के लिए स्वयं जिम्मेदार होगा।

यदि किसी को इस प्रकार का कोई कदाचार दिखाई देता है तो उनसे अनुरोध है कि वे केवीआईसी और अपने क्षेत्राधिकार वाले राजस्व प्राधिकारी को इसकी सूचना अवश्य दें।

**खादी और ग्रामोद्योग आयोग**
(सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार)
नेशनल इन्शुरेंन्स बिल्डिंग, 4थी मंजिल, 14 जे.टी. रोड, चर्चगेट, मुंबई – 400 020
**टेलि/फेक्स:** +91 22 22817449 **मोबाईल:** 7738327449 **ई–मेल:** somumbai.kvic@gov.in

---

### ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु.माणगाव, ता.माणगांव, जि.रायगड.

**जाहीर निविदा** — **दिनांक :**

ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु. यांचेकडील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन/स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२/१५ वित्त आयोग/स्वनिधी अंतर्गत खालील कामाकरिता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामांचे नांव | निधीचास्त्रोत | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी (रू.) | इसारा फी १% (रू.) | निविदा मिळणेची तारीख | निविदा उघडणे चा दिनांक व वेळ | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | घरोशी येथे पाणीपुरवठा योजना दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | ८४९७५/- | २००/- | ८५०/- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |
| २ | घरोशी येथे नळपाणीपुरवठा योजना दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | २७९६८/- | २००/- | २८०- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |
| ३ | पळसगाव बु. ग्रा.प कार्यालयासमोर गटार बांधणे | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | २४९९० /- | २००/- | २५०/- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |
| ४ | पळसगाव बु. आदिवासीवाडी येथे पाणी साठवण टाकी दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | १३१९६७/- | २००/- | १३२०/- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |
| ५ | घरोशीवाडी नळपाणी योजना दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | १००००० /- | २००/- | १०००/- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |
| ६ | घरोशी पाणी साठवण टाकी दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | ५०६२४/- | २००/- | ५०६/- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |
| ७ | ग्रा.प.कार्यालय पत्राशेड बांधणे. | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | १५०००/- | २००/- | १५०/- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |
| ८ | पळसगाव बु. सामाजिक सभागृह शौचालय दुरुस्ती | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | ३९९९०/- | २००/- | ४००/- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |
| ९ | पळसगाव बु. अंगणवाडी रंगकाम करणे | १५ वा वित्त आयोग २०२५-२६ | २३०००/- | २००/- | २३० /- | १२/०९/२०२५ | १९/०९/२०२५ | ६ महिने |

**अटी व शर्ती :-** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. १८/०९/२०२५ असून अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा.उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांधकाम) माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा. सरपंच ग्रा.पं. पळसगाव बु. यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

सही/-
**सौ.सोनानी नि.आंब्रे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पळसगांव बु.**

सही/-
**श्रीम. ऋतुजा बा.साळुंखे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पळसगांव बु.**

---

### तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.४६५/२०२५

श्री. मंगेश दुर्गेश हंबीर
रा. गौळमाल ठाकुरवाडी पो. पाच्छापुर — वादी
ता. सुधागड, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत अडुळसे — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री. मंगेश दुर्गेश हंबीर रा. गौळमाल ठाकुरवाडी पो. पाच्छापुर ता. सुधागड, जि. रायगड यांनी त्यांची आजी कै. बबी बाबू हंबीर यांचा मृत्यु दि. २६/०३/२०१२ रोजी मौजे - गौळमाल ठाकुरवाडी ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर बबी बाबू हंबीर यांच्या मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :-१०/०९/२०२५

सही / -
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

---

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे माणगाव तर्फ वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अरूण भिवा गरुडे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे माणगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ५२ | २ | ०-४०-०० पैकी खरेदी करणेचे क्षेत्र ०-२०-०० | ६-२८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्रे अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १२-०९-२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

---

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि; अलिबाग
### निविदा सूचना

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि; तर्फे दिपावली सणानिमित्त दिपावली भेटवस्तू खरेदी करणेची आहेत.

वर नमूद केल्याप्रमाणे भेटवस्तू खरेदी करणेकरीता सप्लायर्स/विक्रेते यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

तरी ज्या निविदाधारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या निविदा दिनांक २२.०९.२०२५ पर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचेकडे सादर कराव्यात. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल.

कोणतेही कारण न देता कोणतीही अगर सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक : १२.०९.२०२५

---

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि; अलिबाग
### निविदा सूचना

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि; तर्फे दिपावली सणानिमित्त दिपावली शुभेच्छा ग्रिटींग व बॅनर्स छपाई करणेची आहेत.

वर नमूद केल्याप्रमाणे दिपावली शुभेच्छा ग्रिटींग व बॅनर्स खरेदी/छपाई करणेकरीता सप्लायर्स/विक्रेते यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

तरी ज्या निविदाधारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या निविदा दिनांक २२.०९.२०२५ पर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचेकडे सादर कराव्यात. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल.

कोणतेही कारण न देता कोणतीही अगर सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक : १२.०९.२०२५

---

### रायगड बाजार
### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खालील कामांचा विचार करणेसाठी शनिवार दिनांक २६-०९-२०२५ रोजी सकाळी ९-३० वाजता पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटी, मध्यवर्ती कार्यालय, राऊतवाडी, वेश्वी, अलिबाग येथे मा. चेअरमन नृपाल जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**: सभेपुढील कामे :**

१) मागील दिनांक २८-९-२०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) ३१ मार्च २०२५ अखेर संपणाऱ्या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्विकारणे.
३) ३१ मार्च २०२५ अखेरची जमाखर्च पत्रके (ताळेबंद, नफा-तोटा) अवलोकनी घेऊन त्यास मंजूरी देणे.
४) २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५) सन २०२५-२०२६ सालाकरीता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०२४-२०२५ चा शासकीय हिशेब तपासणीसांचा तपासणी अहवाल अवलोकनी घेणे.
७) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता संस्थेचे सभासदांना पर्चेस रिबेट कुपन्स बाबत विचार करणे.
८) सन २०२५-२०२६ या वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी सहकार खाते पॅनलवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

अलिबाग
दि. १२/९/२०२५

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
**प्रमोद ना. घासे**
उपाध्यक्ष

सूचना : १) गणसंख्येच्या (कोरमच्या) अभावी सभा तहकूब राहिल्यास सदर सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरेल व त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.

---

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे ओलमण, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन : मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| थॉमस लूईस फर्नांडिस | १४७ | ० | ०-६३-७० | ४-०६ |

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.
दि.१२/०९/२०२५.

**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.-९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९८५०७६७५६८

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक श्री जयराम अनंत भगत, श्री अविनाश अनंत भगत यांचे नावे सातबारा अभिलेखामध्ये दर्शविण्यात आलेले क्षेत्र खरेदी घेणेचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ६३१ | ०-११-९० <br> पो.ख. ०-०२-०० <br> ०-१३-९० | ४-५६ |

पैकी श्री जयराम अनंत भगत, श्री अविनाश अनंत भगत यांचे नावे सातबारा अभिलेखात नोंदविण्यात आलेले क्षेत्र ०-०६-३० हे. आर., पो.ख ०-०१-०० हे. आर. एकुण ०-०७-३० हे. आर, आकार रू. २-४१ पै. ही मिळकत

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस फळावे.

दिनांक :- १२/०९/२०२५

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
'गुरूकृपा' अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नं. ५१२, एकूण क्षेत्र १-९५-३० हे. आर., आकार ४४.१९ रू. पै. पैकी क्षेत्र ०-२०-०० हे. आर. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक विजयकुमार गजानन भगत, रा.बोरवली, मुंबई यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ११/०९/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

---

### नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. संतोष प्रभाकर पाटील, रा. तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. धीरज पी चौधरी, रा. जे एन ४ बिल्डींग नंबर ११ घर नंबर ०६, सेक्टर ९, लक्षदीप हॉस्पीटल समोर, वाशी नवी मुंबई यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-आसरे, तालुका-सुधागड, जिल्हा-रायगड**

| गट नंबर | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू.पै. |
|---|---|---|
| १८ | एकूण क्षेत्र २-०८-००, यापैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ००-२०-०० हे. आर. प्रति विक्री क्षेत्र | ० रु ८६ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. १२/०९/२०२५

सही/-
**ॲड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.नं. ९८८११३२२४८

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-सातिर्जे, ता.अलिबाग, जि.रायगड, येथील गट नं.३२१, एकूण क्षेत्र १-३८-४० हे.आर., आकार २६.८१ रू.पै., पैकी क्षेत्र ०-८१-०० हे.आर. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक आत्माराम गोविंद ठाकुर, उर्मिला लक्ष्मण पाटील, महेश शांताराम ठाकुर, सपना नयन वाकडे, संजय शांताराम ठाकुर, संजिवनी सुरज ठाकुर, स्मिता प्रशांत म्हात्रे व स्वयम सुरज ठाकुर रा.मु.सातिर्जे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.


अलिबाग,
तारीख ११/०९/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

---

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### नगराध्यक्षपदी फरीन बशारत, उपनगराध्यक्षपदी अनिकेत पानसरे

**म्हसळा :** म्हसळा नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्षपदाची अधिकृत घोषणा गुरुवारी करण्यात आली. दरम्यान, नगराध्यक्षपदी नगरसेविका फरीन अ.अजीज बशारत, तर उपनगराध्यक्षपदी अनिकेत पानसरे यांचे एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची अधिकृत घोषणा उपविभागीय अधिकारी महेश पाटील यांनी केली. म्हसळा नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता असून, आपल्या अन्य सहकारी सदस्यांना लोकप्रतिनिधित्व मिळावे यासाठी नगराध्यक्ष संजय कर्णिक, उपनगराध्यक्ष संजय दिवेकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असता रिक्त जागांवर पार पडणाऱ्या निवडणुकीते नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षपदासाठी नगरसेविका फरीन अ. अजीज बशारत आणि उपनगराध्यपदासाठी नगरसेवक अनिकेत पानसरे यांना संधी देण्यात आली आहे.



### सेवानिवृत्त संघटनेकडून रोह्यातील शिक्षकांचा सन्मान

**रोहा :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून शासकीय, निमशासकीय सेवानिवृत्त संघटनेकडून रोह्यातील माध्यमिक व प्राथमिक सेवानिवृत्त शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. मारुती राऊत यांच्या अध्यक्षतेखाली सेवानिवृत्त संघटनेची सभा संपन्न झाली. यावेळी ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष पी.बी. सरफळे, एस.एन. गायकवाड, उपाध्यक्ष सुरेश मोरे, शरद गुडेकर, एम.डी. भोईर, भगवान, बामुगडे, भादेकर सर, जाधव सर, माधुरी डफळ, सचिव एन.पी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थित २० शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच सप्टेंबर महिन्यात ज्यांचा वाढदिवस आहे, त्या मंडळींचा वाढदिवसदेखील साजरा करुन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान, १३ सप्टेंबर रोजी पोलादपूर येथे होणार असलेल्या वार्षिक सभेसाठी जास्तीत जास्त सभासदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले. पी.बी सरफळे, राऊत, एस.एन. गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

### विरेश्वर कॉलनी सदस्यांची सभा उत्साहात

**श्रीवर्धन :** महाडमधील तांबड भुवनातील विरेश्वर कॉलनी सदस्यांची सभा बुधवार, दि. १० रात्रौ संपन्न झाल्याचे सल्लागार अ.वि. जंगम यांनी सांगितले.राजू जंगम यांच्या अध्यक्षतेखाली सभेत सचिव बाळाराम धोत्रे यांनी मागील इतिवृत्तास वाचून मंजुरी घेतली. सदस्यांनी वार्षिक उपक्रम, निधी आणि विविध सांस्कृतिक व धार्मिक, साहित्यिक कार्यक्रम राबवावे, असे गणेश जंगम यांनी सुचविले. किशोर टमके यांनी विधायक सूचना करून अर्थबळ कसे वाढविता येईल यावर विचार मांडले. नितीन पाटील यांनी एकतेचा सुपरिणाम कसा असतो हे रस्त्याच्या डांबरीकरणावरून सांगितले. मंत्री भरत गोगावले व सुनील आगरवाल आदींना धन्यवाद दिले. श्री. कवडे व जयराम तांबे यांनी पवनसुत अपार्टमेंटमधील जबाबदारी स्वीकारून चर्चा केली. रुपेश धोत्रे व गणेश जंगम यांनी, नव्याने कार्यरत राहणाऱ्या सदस्यांचे नाव सुचविले. अलोक कोटिया हे नवे सदस्य कार्यरत राहणार आहेत.खजिनदार तांबे यांनी नितीन पाटील यांनी आपली वास्तु सभा-संमेलनासाठी दिल्याबद्दल व सर्व सदस्यांनी हजर राहून सकारात्मक चर्चा केल्याबद्दल सर्वांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

### गोल्डन मॅनकडून गुंडावर हल्ला

**नवीन पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याचे हद्दीत गँगवॉरने पुन्हा एकदा डोकं वर काढले असून, खुटारी येथील गोल्डन मॅन अनिकेत म्हात्रे याच्याकडून राजकुमार म्हात्रे याच्यावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गुंड राजकुमार म्हात्रेसह सूरज म्हात्रे हे गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अनिकेत एकनाथ म्हात्रे, प्रणित किसन म्हात्रे, शैलेश किसन म्हात्रे, प्रतीक प्रकाश म्हात्रे, अनिश लक्ष्मण म्हात्रे, मोनीश लक्ष्मण म्हात्रे, किरण यशवंत म्हात्रे, भावेश यशवंत म्हात्रे, वीरेंद्र सिताराम म्हात्रे, बंटी तुकाराम म्हात्रे (सर्व रा. खटारी गाव) आणि निखिल भोईर (वेतोडे गाव) आणि इतर दोन ते तीन अनोळखी इसमांविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याचा आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी सुरज गणेश म्हात्रे आणि राजकुमार म्हात्रे हे बैलांच्या संदर्भात चर्चा करत उभे होते. यावेळी आरोपी अनिकेत म्हात्रेने राजकुमारला जुन्या जागेच्या वादातून रिव्हॉल्व्हरने हवेत दोन राऊंड फायर केले. त्यावेळी त्याच्यासोबत असलेल्या १३ आरोपींनी हॉकी स्टिक, तलवार, लोखंडी रोड, लाकडी दांडक्यांनी मारहाण केली.

### पोलीस अंमलदार बेपत्ता

**पनवेल :** रबाळे पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस शिपाई बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. सोमनाथ काशीनाथ फापाळे (३१) असे या पोलीस शिपायाचे नाव असून, तो गेल्या ४ सप्टेंबर रोजी रात्रपाळी करून आपल्या घरी जातो, असे सांगून गेला होता. मात्र, तो घरी पोहोचलाच नाही. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात सोमनाथ फापाळे बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली असून, पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे. सोमनाथ फापाळे हा कळंबोलीतील रोडपाली भागात पत्नी वैशाली हिच्यासोबत राहात आहे. ४ सप्टेंबर रोजी रात्री सोमनाथ हा वाशी येथे झोन वन स्ट्रायकिंगच्या गाडीवर कार्यरत होता. याबाबतची माहिती त्यांनी त्यांच्या पत्नीला कामावर जाण्यापूर्वी दिली होती. त्यानंतर मध्यरात्री वैशाली यांनी त्यांना फोनवर संपर्क साधला असता त्यांनी झोन वन स्ट्रायकिंगच्या गाडीवर वाशी येथे असल्याचे सांगितले होते. त्यानंतर वैशाली यांनी सोमनाथ यांना संपर्क साधला असता त्यांनी नंतर कॉल करतो, असे सांगून फोन कट केला होता.

# कामगारांच्या बारा तास कामाचा निर्णय मागे घ्या



## भारतीय मजदूर संघाची मागणी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारने कामगारांसाठी जारी केलेल्या १२ तास कामाच्या परिपत्रकाचा भारतीय मजदूर संघाकडून तीव्र निषेध करण्यात येत आहे. याबाबत राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची भेट घेत हा निर्णय मागे घेण्याची मागणी मजदूर संघाने केली आहे.

या निर्णयामुळे कामगारवर्गावर अन्याय होणार असून, त्याचे गंभीर परिणाम होतील. यातून आठ तास काम व ४८ तास आठवड्याची मर्यादा हा कामगारांच्या कायद्यातील मूलभूत हक्क हिरावल्याचा आरोप करण्यात आला आहे. कामगार मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात १२ तास कामकाजामुळे कोणते परिणाम होतील यावर काही मुद्दे मांडण्यात आले आहेत. देशात बेरोजगारीचा प्रश्न आ वासून उभा असताना, अशा प्रकारे कामाचे तास वाढविल्यास किंवा एका व्यक्तीकडून अधिक काम करून घेतल्यास, कामाचा दर्जा कमी आणि रोजगाराच्या संधीही कमी होतील. कामगारांवर कामाचं ताण आणि दबाव वाढेल. यामुळे कारखानदार व ठेकेदारांकडून होणारे शोषण वाढेल. दीर्घकाळ काम केल्यामुळे शारीरिक, मानसिक थकवा अपघातांचे प्रमाण, आजार व अकाली मृत्यूचे प्रमाण वाढण्याचा धोका निर्माण होईल. कामाचे तास वाढले तर महिलांना दीर्घ वेळ काम करणे अत्यंत कठीण जाणार आहे. तसेच कुटुंब, मुले आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांची तारांबळ होणार असून, परिस्थिती अधिक बिकट होईल. यातून कुटुंबाला वेळ देता न येणे, मुलांच्या शिक्षणावर परिणाम, सामाजिक जीवन धोक्यात येईल, असेही मुद्दे मांडण्यात आले.

> **या भेटीत भारतीय मजदूर संघाच्यावतीने प्रदेशातील प्रमुख पदाधिकारी, विविध जिल्ह्यांतील कामगार संघटनांचे नेते व संबंधित औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधींनी आपले मत मांडले. कामगारांचे हक्क, रोजगाराची हमी आणि कुटुंबीयांचे आरोग्य यासाठी आमचा संघर्ष सुरूच राहील.**
> **– सुरेश पाटील, राष्ट्रीय सचिव, बीएमएस**



# बोरघरमधील असंख्य कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश

- **चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते प्रवेशकर्त्यांचे स्वागत**
- **अलिबाग येथे पार पडला पक्ष प्रवेश सोहळा**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या कार्यप्रणालीवर खुश होत बोरघर ग्रामपंचायत सदस्या अश्विनी भगत यांच्यासह भिलजी गावातील असंख्य तरुण मंडळींनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. नुकतेच अलिबागमध्ये नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी बाळू पाटील, विक्रांत वार्डे, मोहन धुमाळ, मधुकर ढेबे, नवशाद मुजावर, उत्तम रसाळ, यशवंत भगत, अनंत पुनकर, महेश झावरे, विश्वनाथ झावरे, नितीन जानकर, अक्षय डिकले आदी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नवनिर्वाचित कार्यकर्ते, महिला उपस्थित होत्या.

अश्विनी भगत या गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणात सक्रीय आहेत. गेली दहा वर्षे बोरघर ग्रामपंचायतीच्या सदस्य म्हणून कार्यरत आहेत. शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वावर खुश होऊन अश्विनी भगत यांनी त्यांचे पती प्रशांत भगत व इतर कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. चित्रलेखा पाटील यांच्या वेश्वी येथील निवासस्थानी सोमवारी (दि.८) रात्री छोटेखानी कार्यक्रमात पक्ष प्रवेश सोहळा पार पडला.

आपल्या गावाचा आणि परिसराचा विकास शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातूनच होऊ शकतो, असा विश्वास यावेळी प्रवेशकर्त्यांनी केला.



# अघोरी विद्येचा डाव हाणून पाडल्याचा राग

## आदिवासी तरुणाला मारहाण; संघटना आक्रमक



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील हालिवली येथील स्मशानभूमीमध्ये जाऊन अघोरी विद्या करण्याचा प्रयत्न स्थानिक आदिवासी लोकांनी हाणून पाडला होता. त्यामुळे अघोरी विद्या करण्यासाठी आलेले लोक संतापले आणि त्यांनी आदिवासी तरुणाला मारहाण केली. दरम्यान, त्याबद्दल आदिवासी संघटना आक्रमक झाली असून, त्यांनी कर्जत पोलीस ठाण्यात जाऊन संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

कर्जत तालुक्यातील हालीवली आदिवासीवाडीतील स्मशानभूमीत दोन महिन्यांपूर्वी जादूटोणा आणि अघोरी कृत्याला विरोध करण्याची घटना घडली होती. त्यावेळी संबंधित लोकांनी तेथील एका आदिवासी युवकाला मारहाणदेखील केली होती. अघोरी विद्येचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली. मात्र, संबंधित व्यक्तींवर ॲट्रॉसिटी ॲक्ट तसेच अंधश्रद्धा जादूटोणा, अघोरी कृतीसंदर्भात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी आदिवासी संघटनेने केली आहे. ११ जुलै २०२५ रोजी हालिवली गावातील ग्रामस्थ राजेश गोपाळ शिंदे आणि त्याचे सहकाऱ्यांना कातकरवाडी येथील स्मशानभूमीमध्ये जादूटोणा आणि अघोरी कृत्य करताना आदिवासी बांधवांनी विरोध दर्शविला होता. ही तक्रार कर्जत पोलीस ठाण्यात दाखल झाली, त्यावेळी कर्जत पोलिसांनी हस्तक्षेप करीत हा प्रकार उधळवून लावला होता. त्यामुळे अघोरी विद्या करण्याचा डाव फसल्याने संतापलेल्या शिंदे याने मनात राग धरून जादूटोणा अघोरी कृत्याला विरोध करणाऱ्या समाजाच्या विष्णू गणपत वाघमारे या युवकाला रस्त्यात गाठून जबर मारहाण केली.

या घटनेची माहिती मिळताच आदिवासी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे कोकण प्रदेशाध्यक्ष मालू निरगुडे तसेच बिरसा ब्रिगेडचे जिल्हा अध्यक्ष अनंता वाघमारे, जिल्हा सचिव सचिन वाघमारे, दिलीप डाके, खालापूर तालुका कमिटीचे अध्यक्ष नारायण निरगुडे, सचिव रवी बांगारे, सहसचिव राजू सुतक, देहू दरवडा, तुळशीराम कवठे, अनिल पारधी, संजय पवार, रवी पवार, अविनाश वाघमारे, शंकर वाघमारे, नितीन पवार आदी कर्जत पोलीस ठाणे येथे जमले. आदिवासी समाज मोठ्या संख्येने कर्जत पोलीस ठाण्यात जाऊन आदिवासी तरुणाच्या मारहाणीचा निषेध केला. त्यानंतर कर्जत पोलिसांनी राजेश गोपाळ शिंदे यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्ट, अंधश्रद्धा जादूटोणा, अघोरी कृतीसंदर्भात गुन्हा दाखल केला आहे.

### अंबा नदीपात्रात अनोळखी मृतदेह

**। पाली बेणसे । प्रतिनिधी ।**

पाली येथील अंबा नदी पात्रात गुरुवारी (दि.११) सकाळी एका अनोळख्या व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. यासंदर्भात पाली पोलिसांचा तपास सुरु आहे.

पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली लागलीच पोलीस अधिकारी व पोलीस या ठिकाणी पोहोचले व पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. या अज्ञात व्यक्तीचे वय साधारण ५० ते ५५ च्या दरम्यान असून, अंगावर निळ्या कलरचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. या अज्ञात व्यक्तीला कोणी ओळखत असल्यास पाली पोलिसांना ९१२१४२२४२२२३ या क्रमांकावर कळवावे.

# लायन्स क्लब अलिबागकडून मोफत आरोग्य तपासणी

## नेत्र, मधुमेह, मोतीबिंदू शस्त्रक्रियेसह रक्तदान शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब ऑफ अलिबाग आणि सूर्योदय साखरचौथ गणपती मंडळ, थळ पालथी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र, मधुमेह आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिरासह रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन केले.



साखरचौथ गणपतीच्या औचित्याने लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे अलिबाग लायन्स अध्यक्ष प्रदीप नाईक यांनी फीत कापून उद्घाटन केले. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत अश्रूग्रंथी, तिरळेपणा, मोतिबिंदू या नेत्रविकारांवर मोफत उपचार आणि शस्त्रक्रियांसाठी संदर्भित करण्यात आले. यावेळी ८० रुग्णांची मोतिबिंदू तपासणी करण्यात येऊन, त्यातील चाळीस जणांना संदर्भित करण्यात आले. तर, ८९ मधुमेह रुग्णांची तपासणी करण्यात येऊन, मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तर, ७३ बॉटल्स एवढ्या मोठ्या प्रमाणावर रक्त संकलित करण्यात आले.

यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रदीप नाईक, माजी अध्यक्ष अविनाश राऊळ, नितीन शेडगे, संजय माळी, प्रकाश देशमुख, समीर कवळे, विकास घरत, मनोज ढगे, संतोष पाटील, लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबागच्या डॉ. शीतल कुडतलकर, इतर वैद्यकीय स्टाफ, तर सूर्योदय साखरचौथ गणपती मंडळाचे अध्यक्ष योगेश म्हात्रे, खजिनदार स्वप्निल म्हात्रे, इतर सदस्य, नेत्र आणि मधुमेह तपासणीसाठी आलेले रुग्ण तसेच थळ व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साखरचौथच्या गणरायाची स्थापना

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीसुद्धा श्रीबाग नागरी सेवा संघटना आणि ऑल कॅप्टन ग्रुपच्यावतीने साखरचौथ गणपती बाप्पाची बुधवार, दि. १० सप्टेंबर रोजी उत्साहात स्थापना करण्यात आली आहे.

सतत पंधरा वर्षे श्रीबागमध्ये विविध प्रकारचे देखावे सादर करून अलिबागकरांसाठी हा गणपती बाप्पा आकर्षण ठरला आहे. यावर्षीसुद्धा संत तुकाराम यांचा सदेह वैकुंठ प्रवास यावर आधारित चलचित्र अलिबागकरांसाठी विशेष आकर्षण ठरले आहे. हजारो अलिबागकरांनी रात्री उशिरापर्यंत गणपती दर्शनासाठी मोठ्या रांगा लावल्या होत्या. देखाव्याला साजेशी गणपती मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. सुहास बागडे यांनी देखावा सदर केला आहे, तर राकेश थळे यांनी इतर सजावट केली आहे.




### महेश साळुंखेंनी घेतले बाप्पांचे दर्शन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी गुरुवारी गौरा गणेशोत्सवानिमित्त विविध मंडळांना भेटी दिल्या. त्यामध्ये त्यांनी पनवेल येथील कुंभारवाडा, लाईन आळी, मिरची गल्ली, वाणी आळी, रोहिदास वाडा इत्यादी ठिकाणी गौरा गणेशाचे दर्शन घेतले.

त्यावेळी त्यांचा सत्कार रमेश गुडेकर, संजय जैन, कुणाल कुरघोडे, भरत खुटले, अनिल खुटले, सोमनाथ पवार, परेश ठाकूर, श्री. ठाकरे, वावा मिठाईवाले, परेश शेट्टे, रमेश चातुरे, समीर मोहोकर आदींनी शाल व पुष्पगुच्छ देऊन महेश साळुंखे यांचा सत्कार केला.

**रंगरंगोटी, आखणीच्या कामात कारागीर मग्न | मूर्तीशाळांमध्ये देवीच्या मूर्ती बनविण्याची लगबग**

# मूर्तीकारांना लागले नवरात्रोत्सवाचे वेध

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पितृपक्ष सुरू झाला की वेध लागतात ते नवरात्रोत्सवाचे. घटस्थापनेला आता अवघे काही दिवस शिल्लक राहिले असून, मूर्तीशाळेत मूर्तिकारांची लगबग होताना दिसू लागली आहे. २२ सप्टेंबर रोजी घरोघरी घटस्थापना होणार असून, नऊ दिवस दुर्गा, कालिका अशा रुपात देवी विराजमान होणार आहेत. यासाठी नवी मुंबईतील मूर्तीशाळेतही मूर्तिकारांची लगबग सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. परंतु, मागील वर्षीच्या तुलनेन यंदा देवीच्या मूर्तीच्या किमतीत २० ते २५ टक्क्यांनी दरवाढ झाल्याचे मूर्तिकारांकडून सांगण्यात येत आहे.



येत्या काही दिवसातच नवरात्रोत्सवाला सुरुवात होणार आहे. शहरातील अनेक भागात मूर्ती बनवण्याचे काम सुरू असून, देवीच्या मूर्ती लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आता हे कारागीर अधिक मेहनत घेत आहेत. त्यात पनवेल परिसरातील मूर्ती शाळेतील मूर्तिकार मूर्तीचे दुसऱ्या टप्प्यातील कामात मूर्तीची रंगरंगोटी करण्यात व्यस्त दिसत आहेत. गणेशोत्सवानंतर फार कमी अवधीत देवीच्या मूर्ती घडवायची असते. देवी हे स्त्री रूप असल्याने डोळे, चेहरा, हास्य आदी कामे मूर्तिकारांना बारकाईने करावी लागतात. त्यानुसार सध्या देवीच्या मूर्तीना कृत्रिम पापण्या लावण्याचे तसेच हिऱ्याची सजावट हे कारागीर करत आहेत.

### मूर्तीचे काम अंतिम टप्प्यात

घरगुती देवी मूर्ती तयार झाल्या असून, सध्या मोठ्या मूर्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे. घटस्थापनेसह देवी मूर्तीची स्थापना करण्याची परंपरा असल्याने मूर्तिकारांकडून देवीच्या मूर्ती साकारण्याच्या काम गतीने केले जात आहे. साधारण ८ इंचापासून १२ फुटांपर्यंत देवी मूर्ती साकारण्यांत येत आहेत. सप्तशृंगी, दुर्गा, रेणुका, महालक्ष्मी, कालिकादेवी, महिषासुरिनी, माँ वैष्णवदेवी, भवानी, एकवीरा माता अशा विविध मूर्ती तयार करण्यात येत आहेत. दुर्गा देवीची सर्वाधिक मागणी असून, त्यापाठोपाठ सप्तशृंगी देवी मूर्तीस जास्त मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले आहे.

### किमतींमध्ये २० ते २५ टक्क्यांची वाढ

यंदा मूर्तीच्या किमतीत २० ते २५ टक्क्यांनी वाढ मूर्ती तयार करण्यासाठी लागणारे प्लास्टर ऑफ पॅरिस, रंग, नारळाच्या काथ्या, मजुरी आदींमध्ये वाढ झाल्याने यंदा मूर्तीचे भावही २० ते २५ टक्क्यांनी वाढले आहेत. नवरात्रोत्सव मंडळाकडून बुकिंग सुरू झाली आहे. भाविकांच्या मागणीनुसार आदिशक्तीच्या मूर्ती घडवाव्या लागतात. उत्पादन खर्च वाढल्याने यंदा देवीच्या मूर्तीच्या किमतींमध्ये वाढ झाली असून, ५०० रुपयांपासून ते ४० हजार रुपयांपर्यंत देवीच्या मूर्तीच्या किमती असल्याचे मूर्तिकारांचे म्हणणे आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : जुनी येणी वसुल होतील. गृहोपयोगी वस्तुंची खरेदी होतील. कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न होतील.
- **वृषभ** : कौटुंबिक समस्या भेडसावतील. प्रेम प्रकरणात मतभेदाची शक्यता आहे. स्पर्धामध्ये यश मिळेल.
- **मिथुन** : आश्चर्याची सुखद अनुभूती येईल. उत्सवी वातावरणात समाधान लाभेल. बाकी चिंता करू नये.
- **कर्क** : आजचा दिवस धावपळीचा राहील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. अनपेक्षित धनलाभ संभवतो.
- **सिंह** : नवीन ओळखी होतील. कामानिमित्त प्रवास फायदेशीर ठरेल. स्थावर प्रश्न पुन्हा प्रलंबित राहतील.
- **कन्या** : गुंतवणूक विचारानं करावी. वाद-विवादात अकारण मध्यस्थी नको. वैवाहिक नात्यात सुख लाभेल.
- **तूळ** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कौटुंबिक कामं प्रलंबित राहतील. नोकरीत प्रगतीला वाव मिळेल.
- **वृश्चिक** : नवीन संकल्पनांना चालना मिळेल. प्रिय व्यक्तिंचा सहवास लाभेल. ग्रहमानाची अनुकूलता राहील.
- **धनु** : आध्यात्मिक प्रगती होईल. दूरच्या नातेवाईकांच्या भेटी होतील. बोलताना शब्दांचा वापर जपून करा.
- **मकर** : घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. वाहन चालवताना काळजी घ्या. विचारानं रहा.
- **कुंभ** : वैवाहिक जीवनात मतभेद संभवतात. मुलांचे प्रश्न चिंता वाढवतील. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **मीन** : आर्थिक अडचणींवर मात करता येईल. विवाहविषयक प्रयत्नांना अनुकूलता राहील. चिंता नसावी.

स्टाईल मंत्रा

## नखरा पारंपरिक प्रावरणांचा

विशेष प्रसंगासाठी साडी नेसली जाते. पण कालौघात साडी ड्रेपिंगच्या पद्धतीत अनेक बदल होत गेले. अनेक स्त्रियांना साडीमध्ये जाड दिसण्याची भीती असते. त्यामुळे त्या साडी नेसणं टाळतात. अशा स्त्रियांनी रेशमी किंवा शिफॉनची साडी नेसावी. त्यामुळे त्यांची शरीरयष्टी वजनदार दिसणार नाही. या महिला म्हैसूर सिल्क साडीही नेसू शकतात. ही साडी जास्त जड नसल्याने कॅरी करणं सोपं जाईल. पण शरीरयष्टी बारीक असेल तर कॉटन, टिश्यु, टसर साड्यांचा पर्याय आहे. या साड्या अंगाभोवती फुगत असल्याने बारीक महिला भरीव दिसू शकतील. साडी अलीकडे प्लेन साडी आणि हेवी डिझायनर ब्लाउजचा ट्रेंड सर्वत्र आहे. प्लेन साडीसोबत फुल नेट स्लीव्हज ब्लाऊज तुमच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव देईल. तुमची उंची जास्त असेल तर हे ब्लाउज ट्राय करायला विसरू नका. अलीकडे वेगवेगळ्या स्टायलिंगच्या ब्लाउजचा ट्रेंड आहे. त्यातही 'बो' स्टायलिंगची प्रचंड क्रेझ दिसून येत आहे. ब्लाउजच्या फ्रंट किंवा बॅकला 'बो' स्टायलिंग करून तुम्ही खास लूक मिळवू शकता. याशिवाय ब्लाउजमध्येही कोल्ड शोल्डर स्टाईल आणणं शक्य आहे. याशिवाय प्री- स्टिच साडीचा पर्यायही तुम्ही वापरू शकता.

## १२ सप्टेंबर

दिनविशेष

- **१९१२ :** इंदिरा गांधी यांचे पती फिरोज गांधी यांचा जन्म.
- **१९९६ :** नाट्य, चित्रपट अभिनेत्री श्रीमती पद्मा चव्हाण यांचा मृत्यू.
- **२००२ :** 'मेटसॅट' या भारताच्या उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण.
- **२०१३ :** केवळ १५ राज्यांमध्ये स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन दल असल्याची माहिती.
- **२०१४ :** आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेती धावपटू पिंकी प्रामाणिकवरील गुन्हे मागे घेतले.

फन टाईम

## इक्वेस्ट्रियन आणि कुरश

इक्वेस्ट्रियन आणि कुरश हे दोन हटके क्रीडाप्रकार. हे क्रीडाप्रकार नेमके काय आहेत? पाहू या...

घोडेस्वारी आपल्याला माहित आहे. इक्वेस्ट्रियन म्हणजे घोडेस्वारीचाच एक प्रकार. या खेळात घोडेस्वाराला बरीच मेहनत घ्यावी लागते. घोड्याला विशिष्ट पद्धतीने उडी मारायला लावणं, घोड्यासोबत अडथळे पार करणं असं बरंच काही करावं लागतं. हा खेळ खेळण्यासाठी कौशल्याची गरज असते.

कुरश म्हणजे कुस्तीसारखाच क्रीडाप्रकार. तुर्कीमध्ये कुस्तीला कुरश असं म्हटलं जातं. मध्य आशिया खंडातल्या देशांमध्ये कुरश खूप लोकप्रिय आहे. या खेळात प्रतिस्पर्धी खेळाडूला टॉवेलने पकडून जोरात खाली पाडावं लागतं. यासाठी ताकद आणि कौशल्य दोन्हींची गरज असते. यात हलाल, यंबोश आणि चला अशा तीन पद्धतींनी गुण मिळतात. या खेळातही पेनल्टी असते. पहिल्या पेनल्टीला तंबिक, दुसरीला डक्की असं म्हटलं जातं. तिसरी पेनल्टी म्हणजे गिरोम. यानंतर खेळाडूला स्पर्धेच्या बाहेर केलं जातं.

### पंचांग

**शुक्रवार, १२ सप्टेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
भाद्रपद कृष्ण ५, नक्षत्र : भरणी,
चंद्रराशी : मेष, योग : व्याघात,
सूर्योदय : ६.२८, सूर्यास्त : ६.४२

### फॉरवर्डस

ना तेरी अदा समझ आतीं हैं...
ना आदत-ए-ज़िन्दग़ी...

तू हर ऱोज नयीं सीं...
हम रोज़ वहीं उलझें सें...

आरोग्यमंत्र

## संसर्ग टाळण्यासाठी...

पावसाळ्यात पोटाच्या तक्रारी वाढतात. केसांसंबंधीच्या समस्यांमध्ये वाढ होते. हवेतल्या दमटपणामुळे या काळात त्वचेच्या तक्रारीही उद्भवतात. बुरशीजन्य आणि जीवाणूजन्य संसर्गाचा धोकाही बराच वाढतो. त्यामुळेच काळजी घ्यायला हवी. मान्सूनकाळात हवेतल्या दमटपणात प्रचंड वाढ होते. यामुळे शरीरात अतिरिक्त तेलाची निर्मिती होऊ लागते. यामुळे त्वचेला खाज सुटणं, केस आणि त्वचेसंबंधीच्या तक्रारी, जीवाणूजन्य आणि बुरशीजन्य संसर्ग आदी समस्या निर्माण होतात. यावर उपाय करण्यासाठी सलून किंवा ब्युटी पार्लरमध्ये जाणं अयोग्य ठरतं. या समस्यांच्या निराकरणासाठी आधी त्वचारोगतज्ज्ञांची मदत घ्यावी. या काळात त्वचेच्या साध्या तक्रारींकडेही दुर्लक्ष करू नये. प्रशिक्षित डॉक्टर्सच तुमच्या समस्येवर योग्य वैद्यकीय उपाय सुचवू शकतात. अतिरिक्त घाम, डिहायड्रेशन, सूर्याच्या अतिनील किरणांचे दुष्परिणाम, यामुळे त्वचेला बुरशीजन्य आणि जीवाणूजन्य संसर्ग होऊ शकतो. हा धोका टाळण्यासाठी पावसात भिजणं टाळावं. अतिरिक्त बाष्पाचा त्वचेवर नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे त्वचेचं संरक्षण करणाऱ्या क्रीम्सचा वापर करावा. पावसाळ्यात कायम छत्री सोबत ठेवावी. त्वचा कोरडी ठेवण्याचा प्रयत्न करावा. ओले कपडे, पादत्राणं घालून वावरु नये. संसर्ग टाळण्यासाठी जीवाणूविरोधी पावडरचा वापर करावा.



### फॅशन पॅशन

फॅशन अंगिकारताना कोणत्या गोष्टी टाळायला हव्या याविषयी...

✻ कधीही पादत्राणांचा क्रॉक्स हा प्रकार ट्राय करू नका. आरामदायी पादत्राणं घालायची असतील तर तुम्ही फ्लिप फ्लॉप किंवा सँडलचा पर्याय निवडू शकता.

✻ तुम्ही सर्वात फॅशनेबल आणि ट्रेंडी टी शर्ट घालून फिरलात तरी तो जीन्समध्ये इन करुन फिरत आहात तोपर्यंत हवा तसा परिणाम मिळणार नाही. टी शर्ट इन केल्याने तुम्ही वयापेक्षा जवळपास दहा वर्षं मोठे दिसता. इतकंच नाही तर टी शर्टचा लूकही खराब होतो. **(क्रमश:)**

## कारकिर्दीचा उत्तम पर्याय

करिअरवाटा

फिजिओथेरपी हे फार जुनं शास्त्र आहे. रोमन साम्राज्यामध्ये शारीरिक हालचालींच्या माध्यमातून काही विकार दुरुस्त करण्याची पद्धत विकसित करण्यात आली. तिचंच पुढं शास्त्र झालं. फिजिओथेरपीचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना भारतातच नव्हे तर परदेशातही करिअर करण्याची संधी मिळते. मात्र, अमेरिका किंवा ब्रिटन या देशांमध्ये हे अभ्यासक्रम फार महाग पडतात. त्या मानानं भारततली फी बरीच कमी असते. फी कमी असली तरी अभ्यासक्रमाचा दर्जा चांगला आहे आणि भारतातल्या अभ्यासक्रमाला जगभरात मान्यता आहे. म्हणूनच भारतातील तरुणांना या क्षेत्रात खूप मोठी संधी उपलब्ध आहे. जीवशास्त्र हा विषय घेऊन पदवी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रात चांगली गती मिळते. त्यातल्या त्यात पदव्युत्तर पदवी आणि डॉक्टरेट मिळवल्यास उत्तम व्यवसाय करता येतो. हा व्यवसाय करणाऱ्यांना आधी स्वत:चं शरीर तंदुरुस्त ठेवावं लागतं. तसं ते लवचिक आणि बांधेसूद ठेवणं उपयुक्त ठरू शकतं. या संदर्भात बॅचलर ऑफ फिजिओथेरपी आणि मास्टर्स इन फिजिओथेरपी अशा दोन पदव्यांचं शिक्षण विविध संस्थांकडून दिलं जातं. त्यानंतर नोकरी तसेच व्यवसायाच्या चांगल्या संधी उपलब्ध होतात.



खेचाखेची

### मान देणं

आजकाल पाहुण्यांचे पाय धरण्याची गरज नाही...

.
.
.
.
.
.

त्यांना पाहून मोबाईल बाजूला ठेवणं सुद्धा त्यांना मान देण्यासारखंच आहे...

### वेगळं काही

फिलाडेल्फियातल्या किटक संग्रहालयातून चोराने किटक चोरून नेला. त्याने जगातल्या सर्वात विषारी कोळ्याची चोरी केली. यासोबतच त्याने इतर काही किटकही चोरले. त्यात दुर्मीळ प्रजातीच्या विंचवांचा समावेश आहे. या संग्रहालयात ७००० पेक्षा जास्त किटक आहेत. त्यांच्यातलाच हा एक कोळी होता. ही चोरी दिवसाढवळ्या झाली. इथल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यानेही ही घटना आणि चोराला टिपलं. त्यानंतर तो गाडी घेऊन पळून गेला. या किटकांपैकी हा विषारी कोळी अत्यंत दुर्मीळ समजला जातो. हा कोळी तब्बल ४० हजार डॉलर एवढ्या किंमतीचा आहे. सँड स्पायडर असं या विषारी कोळ्याच्या प्रजातीचं नाव आहे. त्याला सहा डोळे असतात.

## इडलीची सख्खी बहीण!

रुचिरा

इडल्या उरल्या तर त्यांचं काय करायचं हा प्रश्न असतो. पेपर इडली हे त्याचं उत्तर आहे. तेव्हा चमचमीत पेपर इडली कशी बनवायची ते पाहू या.

**साहित्य** : उरलेल्या इडल्या, पाव वाटी चिरलेला टोमॅटो, अर्धी वाटी चिरलेला कांदा, पाव वाटी चिरलेली भोपळी मिरची, ३ टेबलस्पून सोया सॉस, एक टेबल स्पून ग्रीन चिली सॉस, आल्याची पेस्ट, लसूण पेस्ट, दोन टेबलस्पून तेल, दोन चिमटी काळी मिरी पूड, कढीपत्ता, चवीनुसार मीठ, कोथिंबीर इत्यादी.



**कृती :** सर्वप्रथम उरलेल्या इडल्यांचे छोटे तुकडे करा. कढईत किंवा पॅनमध्ये तेल गरम करा. त्यात ३० ते ४५ सेकंदांपर्यंत इडल्या परतून घ्या. आता इडल्या काढून घ्या. त्याच कढईत थोडं तेल घाला आणि कांदा परतून घ्या. नंतर चिरलेली भोपळी मिरची आणि टोमॅटो घालून परतून घ्या. आता त्यात सोया सॉस, चिली सॉस, आलं-लसूण पेस्ट, मीठ, कढीपत्ता, काळी मिरी पूड घालून नीट हलवून घ्या. नंतर यात परतलेल्या इडल्या घाला. छान मिसळून घ्या. वरून थोडी कोथिंबीर घालून सर्व्ह करा.

## सुडोकू २

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | २ | | | | | | |
| | | ६ | | ७ | | | ४ | |
| ५ | | | | ९ | | | | |
| २ | | ८ | ६ | ३ | ७ | | ९ | |
| | ५ | | ८ | | ४ | | ६ | |
| | ४ | | ५ | १ | ९ | ३ | | ८ |
| | | | | ८ | | | | ४ |
| | ६ | | | ५ | | २ | | |
| | | | | | | ६ | १ | ९ |

टीप -

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ८ | ९ | ५ | ७ | ४ | १ | २ |
| ५ | १ | ७ | २ | ६ | ४ | ८ | ९ | ३ |
| २ | ४ | ९ | १ | ८ | ३ | ५ | ७ | ६ |
| ३ | ६ | ४ | ५ | ९ | ८ | १ | २ | ७ |
| ७ | ८ | २ | ६ | ४ | १ | ३ | ५ | ९ |
| ९ | ५ | १ | ७ | ३ | २ | ६ | ८ | ४ |
| १ | २ | ५ | ३ | ७ | ६ | ९ | ४ | ८ |
| ४ | ७ | ६ | ८ | १ | ९ | २ | ३ | ५ |
| ८ | ९ | ३ | ४ | २ | ५ | ७ | ६ | १ |

## शब्दकोडे क्रमांक २



**आडवे शब्द :-**

१) भारतात चार दिशांना चार मठ स्थापन करणारे पहिले हिंदू धर्मगुरु
६) जन्म-मृत्यू
९) युक्ती
१०) विद्यादान करणारा
११) बातमी
१३) टपाल
१४) मधमाशी
१७) खीर, दूध
२१) सगळीकडे
२३) फणसाचा एक प्रकार
२६) गव्हाची एक उत्कृष्ट जात
२७) नुकसान सोसावे लागणे (वा.प्र.)
३०) पदरावरती जरतारीचा ✻✻ नाचरा हवा, आई मला नेसव शालू नवा!
३१) माझा
३२) स्तुती करणारा
३४) करपलेला भाग
३६) राबता
३८) सिद्धता
४०) नस, धमनी
४२) सत्वांश
४४) उकल, स्पष्टीकरण
४५) अभंगातील जनाबाई
४६) चाणक्यनीती
४९) एक चतुर्थांशाचा पाढा
५०) छोटा
५२) प्रत्येक गावात
५४) तात्काळ
५६) अटीची भाषा
५८) चाकर
६०) टिकून राहणे
६१) फुरसत
६३) पार्वतीनंदन
६५) व्यापारी फायदा
६६) नदीचा काठ
६७) मृत्युदेवता
६८) सर्वात खालचे पाताळ

**उभे शब्द :-**

१) द्वेष
२) गौरी-हर
३) मडके
४) मीठ
५) सूत काढण्याची फिरकी, लोखंडी सळई
६) कथिल व शिसे यांच्या पासून बनलेला एक धातू
७) मऊ
८) साधारण
१०) फक्त, केवळ
१२) मक्षिका
१३) फिकीर
१५) श्रेष्ट, अग्रभाग, जबाबदारी
१६) संथ चालणारा उभयचर प्राणी
१८) जेथे (सं)
१९) सूत, धागा तयार करण्याचे एक साधन
२०) मरणोन्मुख
२१) कारण
२२) जमिनीखाली येंणारे फळ
२३) संकट
२४) व्यवस्थापक, कारभार पाहणारा
२५) उपकार
२७) उद्याच्या नंतरचा दिवस
२८) सीतापती
२९) पाण्याची लहर
३०) भुरळ घालणारी स्त्री
३३) रंग बदलणारा प्राणी
३५) रुधिर
३६) भावाची पत्नी
३७) टवटवीत
३९) चिखलाची भुसभुशीत जमीन
४१) सवाद्य मिरवणूक
४३) सदोदित
४४) आडवेच्या विरुद्ध
४६) सज्जन
४७) बेदाणे
४८) अश्रुंनी डोळे भरणे
५१) सोने
५२) गावठी
५३) वीरमरण
५५) कोलकाताचे विमानतळ
५७) आवड, द्रव
५९) अर्धा किलो
६२) उम्र
६३) हत्ती
६४) बाण

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## निवडक

### सिंधूचा धक्कादायक पराभव

**हाँगकाँग :** दोन वेळची ऑलिंपिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू हिला हाँगकाँग ओपन सुपर ५०० या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये महिला एकेरीत पराभवाचा धक्का बसला. बिगरमानांकित खेळाडू लिन ख्रिस्तोफरसन हिच्याकडून तीन गेममध्ये हार पत्करावी लागली. सिंधूने पहिल्या गेममध्ये ३-१ अशी आघाडी मिळवली. त्यानंतर दोन्ही खेळाडूंमध्ये कडवी झुंज पाहायला मिळाली. सिंधूकडे १४-१३ अशी एका गुणाची आघाडी होती. सिंधू हिने त्यानंतर आपला खेळ उंचावत २१-१५ असा पहिला गेम आपल्या नावावर केला. दुसऱ्या गेममध्ये सिंधू हिच्याकडे १३-१२ अशी आघाडी होती; पण यानंतर सिंधूच्या खेळामध्ये चुका झाल्या..दुहेरीमध्ये संमिश्र यशदुहेरीमध्ये भारतीय खेळाडूंना संमिश्र यशाचा सामना करावा लागला. ऋतपर्ण पंडा व स्वेतपर्ण पंडा या जोडीने हाँगकाँगच्या जोडीला २८ मिनिटांमध्ये पराभूत करीत पुढे पाऊल टाकले; मात्र ध्रुव कपिला व तनीषा क्रॅस्टो या जोडीला चीन तैपईच्या जोडीकडून हार पत्करावी लागली. ध्रुव व तनीषा या जोडीचा ३१ मिनिटांमध्ये पराभव झाला. लक्ष्य, प्रणोय पुढल्या फेरीतलक्ष्य सेन व एच. एस. प्रणोय यांनी पुरुष एकेरीमध्ये पुढल्या फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत ३४व्या स्थानावर असलेल्या प्रणोय याने चीनच्या लु गुआंग झु याच्यावर २१-१७, २१-१४ असा सरळ दोन गेममध्ये विजय साकारला.

### अर्जुन तेंडुलकर मैदानात उतरला

**मुंबई :** अर्जुन तेंडुलकरने देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपल्या गोलंदाजीची छाप सोडली आहे. सात महिन्यांच्या प्रदीर्घ कालावधीनतंर अर्जुन तेंडुलकर प्रोफेशनल क्रिकेटमध्ये आपली छाप सोडण्यात यशस्वी झाली आहे. आयपीएल स्पर्धेनंतर थेट आता देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसत आहे. आयपीएलच्या मागच्या पर्वात अर्जुन तेंडुलकरला काही खेळण्याची संधी मिळाली नव्हती. संपूर्ण सिझन त्याने बेंचवर बसून काढला. त्यानंतर सरावादरम्यान दुखापत झाली आणि उर्वरित स्पर्धेला मुकावं लागलं होतं. त्यामुळे त्याला पुन्हा एकदा सिद्ध करण्यासाठी देशांतर्गत क्रिकेटशिवाय दुसरा पर्याय नाही. आता अर्जुन तेंडुलकर फिट अँड फाईन आहे. अर्जुन कर्नाटकातील प्रसिद्ध डॉक्टर केटी मेमोरियल स्पर्धेत गोव्याकडून खेळत आहे. या सामन्यात त्याने जबरदस्त कामगिरी केली. अर्जुन तेंडुलकरने पाच विकेट्स घेतल्या आणि फलंदाजीतही जबरदस्त कामगिरी केली. त्याने ३६ धावा केल्या.विशेष म्हणजे अर्जुन तेंडुलकरने पहिल्याच चेंडूवर विकेट काढली. त्यानंतर सामना संपेपर्यंत त्याच्या नावावर पाच विकेट घेण्यास यशस्वी झाला. अर्जुन तेंडुलकरची खास गोष्ट म्हणजे त्याने शॉर्ट बॉलने फलंदाजांना त्रास देत होता आणि त्याच चेंडूवर विकेट देखील मिळाली. अर्जुनला 'लेडी लक' नशिबाचं दार खुलं झाली अशी चर्चा आता सोशल मीडियावर रंगली आहे.



### नूपुरचे पहिले पदक पक्के

**नवी दिल्ली :** भारताच्या नूपुरने आपली विजयाची मालिका कायम ठेवत लिव्हरपूलमध्ये सुरू असलेल्या जागतिक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत बुधवारी भारताचे पहिले पदक पक्के केले. महिलांच्या ८० किलोवरील गटातील उपांत्यपूर्व फेरीत तिने उझबेकिस्तानच्या ओल्टिनॉय सोतिंबोएव्हा हिचा ४-१ गुणफरकाने पराभव केला.डावपेचांनी रंगलेल्या या लढतीत नूपुर आणि ओल्टिनॉय या दोघींनाही जास्त पकड केल्याबद्दल प्रत्येकी एक गुण गमवावा लागला. नूपुरने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला, मात्र जागतिक युवा रौप्यपदक विजेती व अस्तानामधील कांस्यपदकविजेती सोतिंबोएव्हा दुसऱ्या फेरीत थोडीशी बरोबरी साधण्यात यशस्वी झाली. तरीही निर्णायक तिसऱ्या फेरीत नूपुरने दमदार हल्ला करत प्रतिस्पर्धीला रोखले आणि उपांत्य फेरीत धडक दिली.

### भारत-पाकिस्तान सामन्याची तिकिटे शिल्लक

**नवी दिल्ली :** आशिया कपमधील सर्वात मोठ्या सामन्याची, भारत-पाकिस्तान सामन्याची तिकिटे, सिंगल तिकीट फॉरमॅट लागू झाल्यानंतरही विकली जात नाहीत. भारत आणि पाकिस्तानमधील हा हाय-व्होल्टेज सामना १४ सप्टेंबर रोजी खेळला जाणार आहे. सामन्यासाठी फक्त तीन दिवस शिल्लक आहेत, परंतु वरच्या आणि टॉप-टीअर स्टँडची तिकिटे अजूनही उपलब्ध आहेत. आशिया कपमधील सर्वात मोठ्या सामन्याची, भारत-पाकिस्तान सामन्याची तिकिटे, सिंगल तिकीट फॉरमॅट लागू झाल्यानंतरही विकली जात नाहीत. भारत आणि पाकिस्तानमधील हा हाय-व्होल्टेज सामना १४ सप्टेंबर रोजी खेळला जाणार आहे. सामन्यात फक्त तीन दिवस शिल्लक आहेत भारत विरुद्ध पाकिस्तान आशिया कप सामन्याची तिकिटे विक्री २०२५ अपडेट भारत आणि पाकिस्तानमधील हा हाय-व्होल्टेज सामना १४ सप्टेंबर रोजी खेळला जाणार आहे. सामन्यात फक्त तीन दिवस शिल्लक आहेत, परंतु वरच्या आणि वरच्या दर्जाच्या स्टँडची तिकिटे अजूनही उपलब्ध आहेत.

### दीपिका मोठ्या मंचावर अपयशी

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिंपिक २०२४ नंतर, भारताची रिकर्व्ह तिरंदाजी पुन्हा एकदा मोठ्या मंचावर अपयशी ठरली. बुधवारी, दीपिका कुमारीच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघ जागतिक तिरंदाजी स्पर्धेत कांस्यपदकाच्या सामन्यात कमी फरकाने पराभूत झाला. इतकेच नाही तर, आपले रिकर्व्ह तिरंदाज मिश्र जोडी आणि पुरुष गटाच्या वैयक्तिक स्पर्धांमध्येही पदके जिंकू शकले नाहीत. वर्ल्ड चॅम्पियनशिप रिकव्हरी आर्चरी २०२५ ब्रॉन्झ मेडल मॅच प्लेऑफ अपडेट वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या मंचावर भारताची रिकर्व्ह आर्चरी पुन्हा एकदा अपयशी ठरली. बुधवारी, भारतीय महिला संघाला ब्रॉंझ मेडल मॅच प्लेऑफमध्ये दक्षिण कोरियाकडून पराभव पत्करावा लागला. आमच्या आर्चर्सना मिश्र जोडी आणि पुरुष गटातील वैयक्तिक स्पर्धांमध्येही पदके जिंकता आली नाहीत.

# पॉवर प्लेमध्येच संपविला सामना

## अशिया कपमध्ये भारताचा सोपा विजय



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया कप टी-२० स्पर्धेत भारतीय संघाने संयुक्त अरब अमिराती (यूएई) संघाचा एकतर्फी पराभव केला. यूएईने विजयासाठी ठेवलेले अवघ्या ५८ धावांचे लक्ष्य भारताने केवळ ४.३ षटकांत आणि फक्त एक गडी गमावून आरामात पूर्ण केले. फलंदाजांचा तुफान मारा ५८ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी भारताकडून अभिषेक आणि गिल सलामीला आले.

अभिषेकने पहिल्याच चेंडूवर षटकार आणि त्यानंतरच्या चेंडूवर चौकार ठोकत आपल्या आक्रमक इराद्यांचे संकेत दिले. त्याने पहिल्या षटकात १० धावा चोपल्या. अभिषेकने आपली आक्रमक फलंदाजी सुरूच ठेवत अवघ्या १५ चेंडूत ३० धावा फटकावल्या. त्याच्या या धडाकेबाज खेळीत ३ षटकार आणि २ चौकारांचा समावेश होता. जुनैद सिद्दीकीने त्याला बाद करून भारताला पहिला धक्का दिला. त्यानंतर मैदानात आलेल्या सूर्यकुमारने पहिल्याच चेंडूवर षटकार मारून भारतीय संघाची विजयाची भूक दाखवून दिली. दुसरीकडे, सलामीवीर गिलने अभिषेकला चांगली साथ दिली. ९ चेंडूत १ षटकार आणि १ चौकार लगावत नाबाद २० धावा केल्या. गिलनेच विजयी चौकार मारत भारताच्या विजयावर शिक्का मोर्तब केला. या सामन्यात भारताने केवळ २७ चेंडूतच लक्ष्य गाठले, ज्यामुळे क्रिकेट विश्वात एक नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. भारतीय गोलंदाजांनी केलेल्या भेदक माऱ्यानंतर फलंदाजांनीही तुफानी खेळी करून हा विजय अधिक दिमाखदार बनवला.

भारताच्या घातक गोलंदाजीसमोर युएईचे फलंदाज आपली पकड टिकवू शकले नाहीत आणि संघ फक्त ५७ धावांवरच गारद झाला. त्यांच्या आठ फलंदाजांना दुहेरी आकडा गाठता आला नाही. युएईचा डाव कर्णधार मोहम्मद वसीम आणि अलिशान शराफू यांनी सुरू केला, परंतु भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच दबाव निर्माण केला. संघाला पहिला धक्का २६ धावांवर बसला, जेव्हा जसप्रीत बुमराहने अलिशान शराफू (२२ धावा) ला बाद केले. त्यानंतर २९ धावांवर दुसरा झटका बसला. मोहम्मद जोहेब (२ धावा) देखील वरुण चक्रवर्तीच्या चेंडूवर बाद झाला. नवव्या षटकात कुलदीप यादवने कहर केला. त्याने एकाच षटकात तीन बळी घेतले. यात राहुल चोप्रा (३), कर्णधार मोहम्मद वसीम (१९) आणि हर्षित कौशिक (२) यांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर युएईने ५० धावांवर पाच बळी गमावले. शिवम दुबेने ५१ धावांवर सहावा धक्का दिला. त्याने आसिफ खान (२)ला बाद केले. त्यानंतर ५२ धावांवर अक्षर पटेलने सिमरनजीत सिंग (१)च्या रुपात बळी घेतला. हा युएईला सातवा झटका होता. लवकरच दुबेने ध्रुव पराशर (१) आणि जुनैद सिद्दीकी (२) यांनाही बाद केले. शेवटचा धक्का कुलदीप यादवने दिला. त्याने हैदर अली (१)ला संजू सॅमसन करवी झेलबाद केले. भारताकडून कुलदीप यादवने सर्वाधिक ४ बळी घेतले, तर शिवम दुबेने ३ बळी घेतले. जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांना १-१ विकेट मिळाली.

## पोर्तुगालचा हंगेरीवर विजय



**। बुडापेस्ट । वृत्तसंस्था ।**

युफा विश्वचषक पात्रता फेरीत पोर्तुगालने हंगेरीवर ३-२ असा रोमहर्षक विजय मिळवला. जोआओ कॅन्सेलोने सामन्याच्या अखेरच्या क्षणी निर्णायक गोल करत पोर्तुगालला विजयापर्यंत नेले. या विजयासह पोर्तुगालचा संघ 'ए' गटात दोन विजयांसह अव्वल स्थानावर पोहोचला आहे.सामन्यात पोर्तुगालने पिछाडीवरून पुनरागमन करत आघाडी घेतली; पण हंगेरीने बरोबरी साधल्यानंतर लगेचच कॅन्सेलोने गोल करत संघाचा विजय निश्‍चित केला. या विजयामुळे पोर्तुगालने अर्मेनियावर मिळवलेल्या ५-० विजयानंतर आणखी तीन गुण मिळवले. सामन्याच्या २१ व्या मिनिटाला बार्नाबास वर्गीने इसोल्ट नागीच्या पासवर गोल करून हंगेरीला आघाडी मिळवून दिली, पण पोर्तुगालने १५ मिनिटांनी बर्नार्डो सिल्वाच्या गोलने बरोबरी साधली. त्यानंतर प्रतिस्पर्ध्यांच्या धक्का बुक्कीमुळे रोनाल्डोला पेनल्टी मिळाली आणि त्याने गोल करून संघाला आघाडीवर आणले. हा गोल रोनाल्डोचा विश्‍वचषक पात्रता स्पर्धेतील ३९ वा गोल ठरला. यासह त्याने ग्वाटेमालाच्या कार्लोस रुईझची बरोबरी साधली. रोनाल्डोने त्याच्या २२३ व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात १४१ गोलचा आंतरराष्ट्रीय विक्रमही नोंदवला. आयर्लंडविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधणाऱ्या हंगेरीने ८४ व्या मिनिटाला वर्गीच्या दुसर्या गोलने पुन्हा बरोबरी साधली; पण अवघ्या दोन मिनिटांनंतर बर्नान्डो सिल्वाच्या पासवर कॅन्सेलोने क्षेत्ररक्षकाच्या बाहेरून शानदार गोल करून पोर्तुगालचा विजय निश्चित केला. या स्पर्धेत पाच सामने खेळल्यानंतर नॉर्वे १५ गुणांसह 'अ' गटात अव्वल स्थानावर आहे. दुसऱ्या स्थानावर असलेल्या इटलीपेक्षा ते ६ गुणांनी पुढे आहेत.

## बॅडमिंटन स्पर्धेत महाराष्ट्राचा डंका




**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

वेस्ट झोन बॅडमिंटन स्पर्धेचा निकाल अखेर लागला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात आणि छत्तीसगडने विजयी पताका फडकवली. महाराष्ट्राच्या पुरुष सांघिक आणि ज्युनियर मुलींच्या सांघिक गटाने बाजी मारली. महाराष्ट्राच्या पुरुष संघाने छत्तीसगडवर ३-१ असा विजय मिळवला. छत्तीसगडच्या रौनक चौहानने महाराष्ट्राच्या वरूण कपूरला ८-२१, १५-२१ असे पराभूत केले होते. पण त्यानंतर महाराष्ट्राने जबरदस्त कमबॅक केले. दर्शन पुजारीने हर्षित ठाकूरचा २१-१५, २१-१६ असा पराभव केला, तर दुहेरीत विप्लव कुवळे आणि विराज कुवळे या जोडीने एमव्ही अभिषेक आणि सुजे तांबोळी या जोडीवर २१-११, १८-२१, २१-१४ अशी मात केली. तिसऱ्या एकेरीत संकल्प गुरालाने हर्षल भोयरवर २१-१३, २१-१४ असा विजय मिळवून महाराष्ट्राच्या विजेतेपदावर शिक्का मोर्तब केला.

## अल्कराझचा अमेरिकन ओपनवर कब्जा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अल्कराझने दमदार सुरुवात करत पहिला सेट ६-२ ने जिंकला. मात्र, सिनरने लढत देत दुसऱ्या सेटमध्ये ६-३ अशी बाजी मारली. तिसरया सेटमध्ये अल्कराझने आपली आक्रमक खेळी दाखवत फक्त एक गेम गमावला आणि ६-१ असा सेट संपवला. चौथ्या सेटमध्ये सिनरने परतफेडीचा प्रयत्न केला, पण अखेरीस अल्कराझने ६-४ अशी मात देत किताबावर आपले नाव कोरले. ही अल्कराझची कारकिर्दीतील सहावी ग्रॅण्डस्लॅम ट्रॉफी ठरली. सामन्यानंतर तो भावुक झाला. या विजयानंतर अल्कराइझने एटीपी क्रमवारीत सिनरला मागे टाकत जगातील नंबर वन टेनिसपटूचा दर्जा मिळवला.

## अयान पुणेरी पलटनवर पडला भारी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



प्रो कबड्डी लीग स्पर्धेच्या १२ व्या हंगामातील २२ वा सामना पुणेरी पलटन आणि पटना पायरेट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पटना पायरेट्सकडून दमदार खेळ पाहायला मिळाला. दोन्ही संघातील चढाईपटूंनी एकसमान गुण कमावले. पण बचावत पुणेरी पलटनचा संघ मागे पडला. अयान एकटाच पुणेरी पलटनवर भारी पडला. हा सामना पटना पायरेट्सने ४८- ३७ च्या फरकाने आपल्या नावावर केला. .या सामन्यात पटना पायरेट्सकडून अयानने एकट्याने २१ गुणांची कमाई केली. तर मिलन दहियाने ५ गुण कमावले. पुणेरी पलटनकडून सचिन तन्वरने ६ आणि अभिषेक गुंगेने ५ गुणांची कमाई केली. पण एकटा अयान पुणेरी पलटनवर भारी पडला. या सामन्यातील दुसऱ्या चढाईत अयानने १ गुण घेत पटना पायरेट्सला दमदार सुरुवात करून दिली. प्रत्युत्तरात पंकज मोहितेने १ गुण घेत पुणेरी पलटनला खातं उघडून दिले. अयानने पटना पायरेट्ससाठी दुसरी चढाई करताना सुपर रेड करत संघाला आघाडी मिळवून दिली. पटना पायरेट्सचा संघ ४१-२४ गुणांसह १७ गुणांनी आघाडीवर होता. सामन्यातील शेवटच्या मिनिटापर्यंत पटना पायरेट्सचा संघ आघाडीवर होता. सामन्यातील शेवटच्या मिनिटाला पटना पायरेट्सचा संघ दुसऱ्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने आघाडी ४६-३६ ने कमी केली. हा सामना पुणेरी पलटनने ४८-३७ ने आपल्या नावावर केला.

## अभिमन्यूने भेदला गुकेशचा चक्रव्यू

**। ताश्कंद । वृत्तसंस्था ।**

सर्वसाधारणपणे कोणत्याही किशोरवयीन मुलाला विद्यमान विश्वविजेत्याला आव्हान देण्याची कल्पनाही रोमांच आणणारी; पण अमेरिकेच्या १६ वर्षीय बुद्धिबळपटू अभिमन्यू मिश्राने मात्र त्याही पुढे पाऊल टाकत अवघ्या बुद्धिबळ विश्वाला आश्चर्याचा धक्का दिला. उझबेकिस्तान येथे सुरू असलेल्या 'ग्रँड स्विस' स्पर्धेत अतिशय शांत चित्ताने, एकाग्रतेने आपला गेमप्लॅन पटावर उतरवत त्याने चक्क विद्यमान विश्वजेत्या डी. गुकेशला धूळ चारण्याचा पराक्रम गाजवला.



अभिमन्यूने ग्रँड स्विसच्या पाचव्या फेरीत गुकेशला ६१ चालींमध्ये पराभूत करून क्लासिकल बुद्धिबळात विश्वविजेत्याला हरवणारा सर्वात कमी वयाचा खेळाडू बनण्याचा मान मिळवला.

२०२४ मध्ये वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी चीनच्या डिंग लिरेनला हरवून गुकेशने सर्वात कमी वयात विश्वविजेतेपद पटकावून इतिहास रचला होता. त्याआधी तो वयाच्या १७ व्या वर्षी सर्वात कमी वयात फिडे कॅंडिडेटस्फ जिंकणारा खेळाडू ठरला होता.

मिश्राने यावेळी गुकेशला नमवताना ३३ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला. याआधी हा विक्रम अमेरिकेचाच ग्रॅंडमास्टर गाटा काम्सकीच्या नावावर होता. त्याने १७ व्या वर्षी गॅरी कास्पारोव्हला हरवले होते.

विश्वविजेता असल्याने गुकेशला २०२६ च्या कॅंडिडेंटस्फ स्पर्धेत थेट प्रवेश मिळणार होता. तरीही, स्वतःची तयारी तपासण्यासाठी आणि फॉर्म टिकवण्यासाठी त्याने ग्रँड स्विसमध्ये खेळण्याचा निर्णय घेतला; पण या सामन्याने त्याला एक मोठा धडा शिकवला. काळ्या प्याद्याने खेळताना गुकेशने १२ व्या चालीत एक चुकीची चाल खेळली. यामुळे तो सुरुवातीपासूनच अडचणीत आला. या सामन्याकडे हॉलमधील १६ ग्रँडमास्टर्सचे बारीक लक्ष होते.

मिश्राने लहानपणापासूनच अनेक विक्रम मोडले आहेत. त्याने ग्रॅंडमास्टर सर्जेई कर्जाकिनचा १९ वर्षांचा विक्रम मोडला. कर्जाकिन १२ वर्षे आणि ७ महिन्यांचा असताना ग्रॅंडमास्टर बनला होता. मिश्रा १२ वर्षे, ४ महिने आणि २५ दिवसांचा असताना ३० जून २०२१ रोजी ग्रॅंडमास्टर बनला. तो आजपर्यंतचा सर्वात कमी वयाचा ग्रॅंडमास्टर आहे.

## भारताची दक्षिण कोरियावर मात

**। हँगझोऊ । वृत्तसंस्था ।**



भारतीय महिला हॉकी संघाची आशियाई करंडकातील विजयी मालिका बुधवारीही कायम राहिली. भारतीय महिला हॉकी संघाने मागील स्पर्धेतील उपविजेत्या दक्षिण कोरियन संघावर ४-२ असा विजय मिळवला व 'सुपर फोर' फेरीमध्ये तीन गुणांची कमाई केली. वैष्णवी फाळके, संगीताकुमारी, लालरेमसियामी व ऋतुजा पिसाळ यांनी गोल करीत भारतीय महिला संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. भारत-दक्षिण कोरिया यांच्यामध्ये गोंगशू कनाल स्पोर्ट्स पार्क स्टेडियममध्ये लढत पार पडली. या लढतीतील दुसऱ्याच मिनिटाला वैष्णवी फाळके हिने पेनल्टी कॉर्नरवर गोल करीत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

उदिताकडून मारण्यात आलेला फटका दक्षिण कोरियन गोलरक्षकाकडून अडवण्यात आला. त्यानंतर वैष्णवी हिने त्याच मिळालेल्या संधीचे सोने केले व गोल करताना उल्लेखनीय खेळ केला. ३० मिनिटांचा खेळ संपल्यानंतर भारतीय महिला संघाकडे १-० अशी आघाडी कायम राहिली.तिसऱ्या सत्रातील सुरुवातीलाच भारतीय महिला हॉकी संघाने दुसरा गोल केला. संगीताकुमारी हिने यावर गोल करीत भारतीय महिला संघाला २-० असे पुढे नेत विजय मिळविला.

### स्टार खेळाडू आशिया कपमुळे व्यस्त | युवांना सिद्ध करण्याची सुवर्णसंधी

# दुलीप करंडकाची अंतिम झुंज सुरु

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दुलीप करंडक आता शेवटच्या टप्प्यात पोहोचली असून गुरुवारपासून दक्षिण विभाग आणि मध्य विभाग यांच्यात अंतिम सामना सुरु झाला आहे. या सामन्यात भारतातील स्टार खेळाडू आशिया कपमुळे व्यस्त असल्यामुळे अनेक तरुण खेळाडूंना आपली चमक दाखवण्याची संधी मिळणार आहे.

मध्य विभागाचा कर्णधार रजत पाटीदार वगळता इतर कोणताही स्टार खेळाडू अंतिम सामन्यात दिसणार नाही. परिणामतः तरुण खेळाडूंची कामगिरी केंद्रस्थानी राहणार आहे. कर्नाटकचा रविचंद्रन स्मरण हा या अंतिम सामन्यात विशेष लक्षवेधी ठरू शकतो. त्याने सात प्रथम श्रेणी सामन्यांत ६४.५० च्या सरासरीने ५१६ धावा केल्या आहेत, ज्यात दोन शतकांचा समावेश आहे.



लिस्ट-ए व टी-२० क्रिकेटमध्येही त्याचा विक्रम उल्लेखनीय आहे. स्मरण या २२ वर्षीय खेळाडूला बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स मैदानावर राष्ट्रीय निवड समितीसमोर चमक दाखवण्याची प्रबळ इच्छा आहे.

मध्य विभागाच्या दानिश मालेवारने याआधीच्या सामन्यांत चमकदार कामगिरी केली आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्याने २०३ आणि उपांत्य फेरीत ७६ धावा केल्या. विदर्भचा हा २१ वर्षीय फलंदाज आजवर ११ प्रथम श्रेणी सामन्यांत ५९ च्या सरासरीने १०७७ धावा व तीन शतकं ठोकली आहेत. त्याचबरोबर तामीळनाडूचा १९ वर्षीय आंद्रे सिद्धार्थ हाही चर्चेत आहे. त्याने आपल्या प्रथम श्रेणी पदार्पणाच्या हंगामात (२०२४-२५) तब्बल ६१२ धावा केल्या होत्या, सरासरी ६८ अशी होती.

दक्षिण व मध्य विभागांची फलंदाजी मजबूत असली तरी गोलंदाजी विभागात काही अडचणी आहेत. मध्य विभागाकडून दीपक चहर खेळणार असून तो हिंदुस्थानी संघात पुनरागमनासाठी उत्सुक आहे. मात्र खलील अहमद, यश ठाकूर व हर्ष दुबे हे तिघेही भारत 'अ' संघात असल्याने मध्य विभागाला त्यांच्या अनुपस्थितीची उणीव भासेल. दक्षिण विभागालाही देवदत्त पडिक्कल आणि नारायण जगदीशन यांच्या अनुपस्थितीत खेळावे लागणार आहे.

आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाने विजयी सुरुवात केली असताना देशांतर्गत क्रिकेटमध्येही भारतीय खेळाडू चमकत आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा कर्णधार रजत पाटीदार याच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या मध्य विभाग संघाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कुमार कार्तिकेय व सारांश जैन यांच्या टिच्चून माऱ्यासमोर दक्षिण विभागाचा पहिला डाव ६३ षटकांत १४९ धावांवर गडगडला. या सामन्यात रजतने घेतलेल्या अविश्वसनीय झेलने सर्वांचे लक्ष वेधले. प्रथम फलंदाजीला आलेल्या दक्षिण विभागाकडून तन्मय अग्रवाल व एम आर काळे यांनी सावध सुरूवात केली. या दोघांनी ९७ चेंडू खेळून काढताना २७ धावांची भागीदारी केली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्‍वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)